# 2 इतिहास

## विवेकबुध्दीसाठी शलमोनाची प्रार्थना

1 परमेश्वर देवाची शलमोनाला साथ असल्यामुळे दाविदाचा पुत्र शलमोन एक बलाढ्य राजा झाला. परमेश्वराने शलमोनाला थोर केले.

2 शलमोन सर्व इस्राएल लोकांशी म्हणजेच, सरदार, अधिकारी, न्यायाधीश, इस्राएलमधील प्रमुख मंडळी या सर्वांशी बोलला. 3 मग तो आणि त्याच्या बरोबरची ही सर्व मंडळी गिबोन येथील उच्चस्थानी गेली. परमेश्वराचा सभामंडप तेथे होता. परमेश्वराचा सेवक मोशे आणि इस्राएल लोक वाळवंटात असताना मोशेने तो बनवला होता. 4 दावीदाने परमेश्वराचा करारकोश किर्याथ यारीमाहून यरुशलेम येथे आणला होता. यरुशलेममध्ये तो ठेवण्यासाठी दावीदाने जागा तयार केली होती. करारकोशासाठी त्याने यरुशलेममध्ये तंबू उभारला होता. 5 उरीचा मुलगा बसलेल याने पितळी वेदी केली होती. ती वेदी गिबोन येथील परमेश्वराच्या निवासमंडपासमोर होती. म्हणून शलमोन आपल्या बरोबरच्या इस्राएल लोकांसह गिबोन येथे परमेश्वराचा सल्ला घेण्यासाठी गेला. 6 परमेश्वराच्या निवासमंडपासमोरील पितळी वेदी वर शलमोनाने 1,000 होमार्पणे केली.

7 त्यारात्री देवाने शलमोनाला दर्शन दिले. तो म्हणाला, "शलमोन, मी तुला काय द्यावे अशी तुझी इच्छा आहे ते मला माग."

8 शलमोन परमेश्वराला म्हणाला, "माझे वडील दावीद यांच्यावर तुझी फार कृपा दृष्टी होती. त्यांच्याजागी तू मला नवीन राजा म्हणून निवडलेस. 9 आता, हे परमेश्वर देवा, त्यांना तू दिलेले वचन पूर्ण कर. एका फार मोठ्या राष्ट्राचा तू मला राजा केले आहेस. त्यातील प्रजेची संख्या धरतीवरील रज:कणांसारखी विपुल आहे. 10 एवढ्या लोकांना उचित मार्गाने नेण्यासाठी मला शहाणपण आणि ज्ञान दे. तुझ्या मदतीखेरीज एवढ्या बहुसंख्य लोकांवर राज्य करणे कोणालाच जमणार नाही."

11 तेव्हा परमेश्वर शलमोनाला म्हणाला, "तुझे म्हणणे बरोबर आहे. तू धनसंपत्ती, ऐश्वर्य किंवा मानसन्मान यांची मागणी केली नाहीस. शत्रूंचा नि:पात व्हावा असेही मागितले नाहीस. स्वत:साठी दीर्घायुष्य मागितले नाहीस. यापैकी काहीही न मागता ज्यांचा मी तुला राजा केले त्या प्रजेसाठी धोरणीपणाने निर्णय घेता यावेत म्हणून तू शहाणपण आणि ज्ञान मागितलेस. 12 तेव्हा ते मी तुला देईनच पण त्याखेरीज मालमत्ता, ऐश्वर्य आणि मानसन्मानही देईन. तुझ्या आधीच्या कोणाही राजाला मिळाले नसेल एवढी संपत्ती व मानसन्मान देईन. पुढेही तुझ्याएवढे कोणत्याही राजाला मिळणार नाही." 13 तेथून शलमोन गिबोन येथे उच्चस्थानी गेला. सभामंडपाकडून तो पुन्हा राजाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी यरुशलेम येथे गेला.

## शलमोनाचे सैन्यबल आणि संपत्ती

14 शलमोनाने सैन्यासाठी घोडे आणि रथ यांची जमवाजमव सुरु केली. त्याच्याकडे 1,400 रथ आणि 12,000 घोडेस्वार जमा झाले. त्यांना त्याने पागा आणि रथांसाठी जागा असलेल्या नगरांमध्ये ठेवले. काहींना त्याने आपल्याजवळ यरुशलेम येथेच ठेवून घेतले. 15 यरुशलेममध्ये त्याने चांदीसोन्याचा भरपूर साठा केला. सोने चांदी सामान्य दगडांसारखी विपुल होती तर गंधसरुचे लाकूड पश्चिमेकडच्या डोंगराळ भागात उंबराचे लाकूड असे तितके विपुल होते. 16 मिसर आणि क्यू येथून शलमोनाने घोडे आणवले होते. राजाचे व्यापारी क्यू येथे घोड्यांची खरेदी करत. 17 या व्यापाऱ्यांनी मिसरमधून 600 शेकेल चांदीला एकेक रथ आणि 150 शेकेल चांदीला घोडा या प्रमाणे ही खरेदी केली. हित्ती आणि अरामी राजांना मग ते हे रथ आणि घोडे विकत.

## शलमोनाचे मंदिराचे बांधकाम

2 परमेश्वराच्या नावाच्या सन्मानार्थ एक मंदिर तसेच स्वत:साठी एक राजमहालही बांधायचे शलमोनाने ठरवले. 2 डोंगरातून दगडाचे चिरे काढायला 80,000 पाथरवट आणि 70,000 मजूर त्याने नेमले. मजुरांच्या कामावर देखरेख करण्यासाठी शलमोनाने 3600 मुकादम नेमले.

3 सोराचा राजा हिराम याला शलमोनाने निरोप पाठवला, "माझे वडील दावीद यांना केलीत तशीच मला मदत करा. त्यांचे निवासस्थान बांधायला उपयोगी पडावे म्हणून तुम्ही गंधसरुचे लाकूड पाठवले होते. 4 मी माझ्या परमेश्वर देवाच्या नावाच्या सन्मानार्थ एक मंदिर बांधणार आहे. तेथे आम्ही रोज परमेश्वरासमोर सुगंधी धूप जाळू तसेच एका खास मेजावर पवित्र भाकर ठेवू. शिवाय, रोज सकाळ

संध्याकाळ, शब्बाथच्या दिवशी, दर नव चंद्रदर्शनी आणि आमचा देव परमेश्वराने नेमून दिलेल्या सहभोजनाच्या दिवशी आम्ही होमार्पणे वाहू. इस्राएल लोकांनी सर्वकाळ पाळायचा हा नियमच आहे.

[5]“आमचा परमेश्वर हा सर्व देवतांपेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून मी त्याच्यासाठी भव्य मंदिर उभारणार आहे. [6]खरं म्हणजे परमेश्वरासाठी निवासस्थान बांधणे कोणालाही झालं तरी कसं शक्य आहे? स्वर्ग किंवा संपूर्ण विश्वही त्याला सामावून घ्यायला अपुरे आहे. तेव्हा त्याच्यासाठी म्हणून मंदिर बांधणे मलाही शक्य नाही. मी आपला त्याच्या प्रीत्यर्थ धूप जाळण्यासाठी फक्त एक ठिकाण बांधू शकतो. एवढेच

[7]“तर, सोने, चांदी, पितळ आणि लोखंड या धातुकामात प्रवीण असा कारागिर तुम्ही माझ्याकडे पाठवून दिलात तर बरे. त्याला जांभळे, किरमिजी आणि निळे वस्त्र करता यावे. कोरीव कामाचेही त्याला चांगले शिक्षण मिळालेले असावे. माझ्या वडलांनी निवडलेल्या इतर कारागिरांबरोबर तो इथे यहूदा आणि यरुशलेममध्ये काम करील. [8]लबानोनमधून माझ्यासाठी गंधसरु, देवदार आणि रक्तचंदन यांचे लाकूडही पाठवावे. लबानोनमधले तुझे लाकूडतोड्ये चांगले अनुभवी आहेत हे मला माहीत आहे. त्या तुमच्या सेवकाना माझे सेवक मदत करतील. [9]मी बांधायला घेतलेले मंदिर चांगले विशाल आणि सुंदर होणार असल्यामुळे मला लाकूड मोठ्या प्रमाणावर लागणार आहे. [10]लाकडासाठी वृक्षतोड करणाऱ्या तुमच्या सेवकांना मी पुढीलप्रमाणे मेहनताना देईन: 1,25,000 बुशेल गहू, 1,25,000 बुशेल जव, 115,000 गॅलन द्राक्षारस आणि 1,15,000 गॅलन तेल.”

[11]हिरामने मग शलमोनाला उत्तर पाठवले. त्यात त्याने असा निरोप पाठवला की, “शलमोन, परमेश्वराचे आपल्या प्रजेवर प्रेम आहे. म्हणून तर त्याने तुला त्यांचा राजा म्हणून नेमले.” [12]हिराम पुढे म्हणाला, “इस्राएलचा परमेश्वर देव धन्य असो. स्वर्ग आणि पृथ्वीची निर्मिती त्यानेच केली. राजा दावीदाला त्याने सूज्ञ पुत्र दिला आहे. शलमोन, तू सूज्ञ आणि विचारी आहेस. तू परमेश्वरासाठी मंदिर तसेच स्वत:साठी राजवाडा बांधायला निघाला आहेस. [13]हिराम अबी नावाचा एक कुशल कारागिर मी तुझ्याकडे पाठवतो. [14]त्याची आई दान वंशातील असून त्याचे वडील सोर नगरातले होते. हा कारागिर सोने, चांदी, पितळ, लोखंड, दगड आणि लाकूड यांच्या कामात तरबेज आहे. जांभळे, निळे आणि अत्यंत तलम असे उंची किरमिजी वस्त्र करण्यातही तो निपुण आहे. त्याला सांगितलेली कोणतीही गोष्ट तो तिचे योग्य रेखाटन करून कोरून काढू शकतो. तो तुझ्या आणि तुझ्या वडलांच्या, माझ्या स्वामी दाविदाच्या कसबी कारागिरांबरोबर काम करील.

[15]“तुम्ही गहू, जव, तेल आणि द्राक्षारस देण्याचे कबूल केले आहे ते सर्व आमच्या नोकरांना द्यावे. [16]आणि लबानोनमधून आम्ही तुम्हाला हवे तितके लाकूड झाडे तोडून पाठवू. ओडक्यांचे तराफे करून आम्ही ते इथून समुद्रमार्गे यापो येथे पोचते करु. तेथून ते तुम्ही यरुशलेमला न्यावे.”

[17]शलमोनाने यानंतर इस्राएलमधल्या सर्व उपऱ्या लोकांची गणना केली. दावीदाने गणती केली होती त्यानंतरची ही गणती. दावीद हा शलमोनाचा पिता. या गणनेत त्यांना 1,53,600 उपरे लोक मिळाले. [18]शलमोनाने त्यापैकी 70,000 जणांना ओझी वाहायला निवडले आणि 80,000 लोकांना डोंगरातून दगड काढायच्या कामासाठी निवडले. उरलेल्या 3,600 उपऱ्यांना या काम करणाऱ्यांवर देखरेख करणारे मुकादम म्हणून नेमले.

## शलमोन मंदिर बांधतो

3 यरुशलेममधील मोरिया पर्वतावर शलमोनाने परमेश्वराचे मंदिर बांधायला सुरुवात केली. शलमोनाचे वडील दावीद याला परमेश्वराने याच मोरिया पर्वतावर दर्शन दिले होते. दावीदाने तयार करून ठेवलेल्या या जागेवर शलमोनाने मंदिर बांधले. ही जागा म्हणजेच ते अर्णान यबूसीचे खळे. [2]आपल्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षातल्या दुसऱ्या महिन्याच्या दुसऱ्या दिवशी शलमोनाने कामाला सुरुवात केली.

[3]शलमोनाने बांधायला घेतलेल्या परमेश्वराच्या मंदिराच्या पायाची मोजमापे अशी: हा पाया 60 हात लांब आणि 20 हात रूंद होता. तेव्हा प्रचलित असलेले जुने क्युबिट परिमाण त्याने वापरले होते. [4]मंदिराच्या समोरचा द्वारमंडप 20 हात लांब आणि वीस हात उंच होता. त्याची आतील बाजू शलमोनाने शुध्द सोन्याने मढवली होती. [5]मोठ्या खोलीला सर्वबाजूंनी त्याने देवदारूच्या फळ्या बसवल्या. त्यांवर शलमोनाने सोन्याचा पत्रा चढवला आणि त्यावर खजुरीची झाडे व साखळ्या कोरुन काढल्या [6]मौल्यवान रत्ने जडवून त्याने मंदिराच्या सौंदर्यात भर घातली. यात वापरलेले सोने पर्वाइमचे होते. [7]तुळया, दाराचे खांब, भिंती, दरवाजे हे मंदिराचे आतले भागही शलमोनाने सोन्याने मढवले. भिंतींवर त्याने करूब कोरून काढले.

[8]यानंतर शलमोनाने मंदिरातला अत्यंत पवित्र गाभारा बांधला. हे अत्यंत पवित्र स्थान 20 हात लांब आणि वीस हात रूंद होते. मंदिराइतकीच त्याची रुंदी होती. गाभाऱ्याच्या भिंतीही शलमोनाने सोन्याने मढवल्या. हे एकंदर 23 टन सोने होते. [9]सोन्याच्या खिळ्यांचे वजन 1 1/4 पौंड एवढे होते. वरच्या मजल्यावरची दालने ही शलमोनाने सोन्याने मढवली. [10]अत्यंत पवित्र गाभाऱ्यात बसवण्यासाठी शलमोनाने दोन करुब घडवले. हे करुबही कारागिरांनी सोन्याने मढवले. [11]करुबांच्या एकेका पंखाची लांबी 5 हात होती. त्यांची एकंदर लांबी 20 हात एवढी होती. पाहिल्या करुबाचा एक पंख दालनाच्या एका बाजूच्या

भिंतीला स्पर्श करत होता तर दुसरा पंख दुसऱ्या करुबाच्या एका पंखाला.

12आणि दुसऱ्या करुबाचा दुसरा पंख दालनाच्या दुसऱ्या भिंतीला स्पर्श करत होता. 13अशाप्रकारे करुबांच्या पंखानी वीस हात एवढे अंतर व्यापलेले होते. हे करुब पवित्र गाभाऱ्याकडे तोंड करून उभे होते.

14निव्व्या, जांभळ्या आणि उंची किरमिजी वस्त्राचा पडदा करून घेऊन शलमोनाने त्यावरही करुब करवून घेतले.

15मंदिरासमोर शलमोनाने दोन स्तंभ उभे केले. हे स्तंभ 35 हात उंच होते. त्यांच्यावरचे कळस प्रत्येकी 5 हात उंचीचे होते. 16शलमोनाने साखळ्या करून त्या कळसांवर ठेवल्या. या साखळ्यांना त्याने 100 शोभिवंत डाळिंबे कलाकुसर म्हणून लावली. 17हे स्तंभ मंदिरासमोर डाव्याउजव्या हाताला उभे केले. उजव्या बाजूच्या खांबाला शलमोनाने याखीम (संस्थापक) आणि डावीकडच्या खांबाला बवाज (सामर्थ्यवान) अशी नावे दिली.

## मंदिरातील बांधकाम आणि सामान

4 शलमोनाने वेदी पितळेची केली. ती 30 फूटलांब, 30 फूट रुंद आणि 18 फूट उंच होती. 2त्याने ओतीव पितळेचे एक गंगाळदेखील केले. हे गोल असून त्याचा व्यास 10 हात होता. त्याची उंची 5 हात आणि त्याचा कडेचा परीघ 30 हात होता. 3या गंगाळाच्या खालच्या बाजूस सभोवार कडेला बैलांच्या चित्रकृती घडवलेल्या होत्या. त्यांची लांबी 10 हात होती. गंगाळ बनवतानाच या बैलांच्या दोन रांगा ओतल्या होता. 4बारा घडीव बैलांनी हे प्रशस्त गंगाळ तोललेले होते. तीन बैल पूर्वाभिमुख, तीन पश्चिमाभिमुख, तीन उत्तराभिमुख तर तीन दक्षिणाभिमुख होते. आणि गंगाळ त्यांच्यावर होते. सर्व बैलांचा मागील भाग एकमेकांकडे आणि मध्यभागी आलेला होता. 5या पितळी गंगाळाची जाडी 3 इंच होती. त्याची कड उमललेल्या कमलपुष्पासारखी होती. त्यात 17,500 गॅलन पाणी मावू शकत असे.

6याखेरीज शलमोनाने दहा तस्ते बनवली. ती त्याने या गंगाळाच्या उजव्या बाजूला पाच आणि डाव्या बाजूला पाच अशी बसवली. होमार्पणात वाहायच्या वस्तू धुवून घेण्यासाठी ही दहा तस्ते होती. पण मुख्य पितळी गंगाळ मात्र याजकांच्या वापरासाठी, होमार्पणाच्या वस्तू वाहण्यापूर्वी धुण्यासाठी होते.

7शलमोनाने सोन्याच्या दहा दीपवृक्षही केले. हे त्याने त्यांचे विधीनुसार बनविले, आणि मंदिरात ठेवले. डावीकडे पाच आणि उजवीकडे पाच असे ते ठेवले. 8दहा मेजेही शलमोनाने मंदिरात ठेवली. ती ही पाच डावीकडे आणि पाच उजवीकडे अशी ठेवली. शिवाय सोन्याचे शंभर वाडगे केले. 9याखेरीज शलमोनाने याजकांसाठी एक आवार केले, एक प्रशस्त आवार आणि त्यांना दरवाजे केले. आवारांत उघडणारे दरवाजे मढवण्यासाठी पितळ वापरले. 10एवढे झाल्यावर आग्नेयला मंदिराच्या उजवीकडे त्याने ते मोठे पितळी गंगाळ ठेवले.

11हिराम या कारागिराने हंडे, फावडी व वाडगे बनवले. शलमोनासाठी जे देवाच्या मंदिराचे काम त्याला करायचे होते ते त्याने पूर्ण केले. 12दोन स्तंभ, स्तंभावरचे कळस, त्यावरील जाळ्यांची दोन सुशोभने हे काम हिरामने केले होते. 13त्या जाळीदार आच्छादनांवरील चारशे शोभिवंत डाळिंबे हिरामनेच केली होती. प्रत्येक जाळीवर डाळिंबांच्या दोन रांगा होत्या. स्तंभांवरचे कळस या जाळ्यांनी आच्छादलेले होते. 14तिवया आणि तिवयांवरची गंगाळी त्याने घडवली होती. 15मोठे पितळी गंगाळ आणि त्याला आधार देणारे बारा बैल हिरामनेच केले. 16शलमोनासाठी त्याने हंडे, फावडी, काटे इत्यादी मंदिरातली उपकरणे केली. त्यासाठी लखलखीत, उजळ पितळ वापरलेले होते. 17या सर्व गोष्टीसाठी शलमोनाने आधी चिकणमातीचे नमुने बनविले. त्यासाठी सुक्कोथ आणि सरेदा यांच्यामधली, यार्देन खोऱ्यातली माती वापरली. 18शलमोनाने इतक्या अगणित गोष्टी करवून घेतल्या की त्यांना पितळ किती लागले याची मोजदाद कोणी केली नाही.

19याखेरीज आणखी काही गोष्टी शलमोनाने देवाच्या मंदिरासाठी केल्या. सोन्याची वेदी, समर्पित भाकर ठेवण्याची मेजे केली. 20सोन्याचे दीपवृक्ष आणि दिवे करवून घेतले. आतल्या सर्वांत पवित्र गाभाऱ्याच्या समोर योजना केल्याप्रमाणे लावण्यासाठी हे दिवे होते. 21याशिवाय फुले, दिवे आणि निखारे उचलण्याचे चिमटे शुध्द सोन्याचे होते. 22कातऱ्या, वाडगे, कटोरे, अग्निपात्रे, या गोष्टीही शलमोनाने सोन्यात घडवल्या. मंदिराची दारे, अत्यंत पवित्र गाभाऱ्यातली दारे, आणि मुख्य दालनाचे दरवाजे हे ही सोन्याचे होते.

5 मग शलमोनाने काढलेले परमेश्वराच्या मंदिराचे सर्व काम समाप्त झाले. आपले वडील दावीद यांनी मंदिरासाठी दिलेल्या सर्व वस्तू त्याने मग आत आणल्या. सोन्या-रुप्याच्या सर्व वस्तू आणि इतर सामानसुमान त्याने आणले. मंदिराच्या कोषागारात त्याने या सर्व वस्तू ठेवल्या.

## पवित्र करारकोश मंदिरात आणण्यात येतो

2पुढे शलमोनाने परमेश्वराचा करारकोश दावीदनगराहून म्हणजेच सीयोनमधून आणण्यासाठी इस्राएल मधील सर्व वडीलधारी मंडळी, आपापल्या घराण्यांचे प्रमुख, यांना यरुशलेम येथे बोलावून घेतले. 3सातव्या महिन्यातील मंडपाच्या सणाच्या दिवशी सर्व इस्राएल लोक शलमोनाकडे आले.

4सर्व इस्राएलाचे वडीलधारे जमल्यावर लेवींनी करारकोश उचलून घेतला. 5याजक आणि लेवी यांनी

मिळून तो यरुशलेमला आणला. दर्शन मंडप आणि तेथे असलेली सर्व पवित्र उपकरणेही त्यांनी बरोबर आणली. 6राजा शलमोन आणि इस्राएलाचे लोक करारकोशाला सामोरे गेले. कोशासमोर त्यांनी मेंढरांचे आणि गुराढोरांचे बळी अर्पण केले. मोजदाद करता येऊ नये इतके प्राणी त्यांनी बळी दिले. 7एवढे झाल्यावर, मंदिराच्या आतल्या मुद्दाम तयार करवून घेतलेल्या सर्वांत पवित्र गाभाऱ्यात याजकांनी तो परमेश्वराचा करारकोश आणला. करुबांच्या पखांच्या बरोबर खाली तो त्यांनी ठेवला. 8कोशावरती करुबांच्या पखांनी आपले छत्र धरले होते. कोश आणि त्याचे दांडे त्यांनी झाकले. 9हे दांडे सर्वांत पवित्र गाभाऱ्यासमोरून दिसतील इतके लांब होते. पण मंदिराच्या बाहेरुन ते दिसत नसत. आजपर्यंत ते तेथे आहेत. 10दोन दगडी पाट्यांखेरीज या करार कोशात काहीही नव्हते. होरेब पर्वतावर मोशेने त्या दोन पाट्या या करार कोशात ठेवल्या होत्या. इस्राएल लोक मिसरमधून बाहेर पडल्यावर परमेश्वराने त्यांच्याशी जो करार केला तो या होरेब पर्वतावरच.

11एवढे झाल्यावर याजक गाभाऱ्यातून बाहेर आले. ते सर्व शुचिर्भूत झाले होते. ते सर्व नेमके कोणकोणत्या गटातले होते हे यावेळी महत्वाचे नव्हते. आतून बाहेर आल्यावर ते पुन्हा पवित्र झाले. 12मग सर्व लेवी गायक वेदीच्या पूर्वेला उभे राहिले. आसाफ, हेमान आणि यदुथूनचे सर्व गायक वर्ग हजर होते. त्यांची मुले आणि भाऊबंददेखील आले होते. यासर्वांनी शुभ्र तलम वस्त्रे घातली होती. झांजा, सारंग्या आणि वीणा ही वाद्ये त्यांनी हातात घेतली होती. या लेवी गायकांबरोबर 120 याजक होते आणि ते कर्णे वाजवत होते.

13गायन आणि वादन एका सुरात चालले होते. एका सुरात त्यांनी परमेश्वराचे स्तवन केले आणि त्याला धन्यवाद दिले. कर्णे, झांजा इत्यादी वाद्यांचा एक जल्लोष उडाला. त्यांच्या गाण्याचा आशय असा होता: *परमेश्वराची स्तुती कारण तो चांगला आहे. त्याची खरी प्रीति सर्वकाळ राहाते.*

तेव्हा परमेश्वराचे सर्व मंदिर मेघाने भरुन गेले. 14त्या मेघामुळे याजकांना तेथे सेवेला उभे राहता येईना, इतके परमेश्वराच्या तेजाने देवाचे मंदिर भरून गेले होते.

6 मग शलमोन म्हणाला, "मी मेघासारख्या अंधकारात वास करीन असे परमेश्वर म्हणाला आहे. 2परमेश्वरा, तुझ्या निवासासाठी मी हे घर बांधले आहे. तू येथे चिरकाल राहावेस म्हणून हे उच्च कोटीचे घर आहे."

## शलमोनाचे भाषण

3मग शलमोनाने मागे वळून सर्व इस्राएल समुदायांना आशीर्वाद दिला. आणि ते सर्व उभे राहिले. 4शलमोन पुढे म्हणाला, "इस्राएलाच्या परमेश्वर देवाचे स्तवन करा. माझे वडील दावीद यांच्याशी तो जे बोलला ते त्याने खरे करून दाखवले आहे. परमेश्वर देवाने असे वचन दिले होते 5'माझ्या लोकांना मी मिसरमधून बाहेर आणल्यानंतर इस्राएल वंशातील कोणतेही नगर मी माझ्या नावाचे घर तिथे बांधले जावे म्हणून निवडले नाही. तसेच, माझ्या इस्राएल लोकांचे आधिपत्य करण्यासाठी कोणाएकाची निवडही केली नाही. 6पण आता यरुशलेम हे स्थान मी माझ्यासाठी निवडले आहे आणि दावीदाला इस्राएल लोकांवर नेमले आहे.'

7"इस्राएलचा देव परमेश्वर याच्या प्रीत्यर्थ माझे वडील दावीद यांना मंदिर बांधायचे होते. 8पण परमेश्वर त्यांना म्हणाला, 'दावीद, माझ्या नावाने मदिर बांधायचा विचार तुझ्या मनात आला हे चांगले झाले. 9पण ते तू बांधू शकत नाहीस पण तुझा मुलगा हे काम करील.' 10आता परमेश्वराने कबूल केले तसे झाले आहे. माझे वडील दावीद यांच्या जागी मी नवीन राजा झालो आहे. मी इस्राएलचा राजा आहे. असे होईल हे वचन परमेश्वराने दिले होते. आणि मी इस्राएलचा देव परमेश्वर याच्या नावाने मंदिर बांधले आहे 11मी करारकोश मंदिरात ठेवला आहे. इस्राएलच्या लोकांशी परमेश्वराने केलेला करार या कोशांत आहे."

## शलमोनाची प्रार्थना

12शलमोन परमेश्वराच्या वेदीसमोर उभा राहिला. तेथे जमलेल्या सर्व इस्राएल लोकांपुढे तो उभा होता. त्याने आपले बाहू पसरले. 13बाहेरच्या आवारात प्रत्येकी 7 1/2 फूट लांबी, रुंदी आणि उंची असलेला एक पितळी चौरंग शलमोनाने बसवला होता. त्यावर चढून तो समस्त इस्राएल लोकांसमोर गुडघे टेकून बसला आणि त्याने आकाशाकडे हात पसरले 14शलमोन म्हणाला,

"हे इस्राएलच्या परमेश्वर देवा, स्वर्गात किंवा पृथ्वीवर तुझ्यासारखा दुसरा कोणीही देव नाही. तुझे जिवाभावाने अनुसरण करणाऱ्या आणि योग्य आचरण करणाऱ्या तुझ्या सेवकांना तुझे प्रेम आणि तुझी कृपा यांचे दिलेले वचन पाळणारा तू परमेश्वर आहेस. 15आपला सेवक दावीद याला दिलेले वचन तू पाळलेस. दावीद माझे वडील होते. तू आपल्या मुखानेच त्यांना वचन दिलेस आणि आज आपल्या हाताने ते प्रत्यक्षात आणले आहेस. 16तसेच आता, हे इस्राएलच्या परमेश्वर देवा, दावीद या सेवकाला दिलेले हे वचनही खरे कर. तू असे म्हणाला होतास: 'माझ्यासमक्ष इस्राएलच्या गादीवर न चुकता तुझ्या वंशातीलच कोणीतरी येत जाईल. मात्र तुझ्या मुलांनी काटेकोर वर्तन केले पाहिजे. तुझ्याप्रमाणेच त्यांनीही माझा करार पाळला पाहिजे.' 17तेव्हा आता, हे इस्राएलच्या परमेश्वर देवा, हे ही शब्द खरे होऊ देत. आपला सेवक दावीद याला तू तसा शब्द दिला आहेस. 18"परमेश्वर पृथ्वीवर लोकांमध्ये वस्ती करू शकत नाही ही गोष्ट, हे

देवा, आम्हाला माहीत आहे. आकाश आणि त्या पुढचे
अवकाशही तुला सामावून घ्यायला असमर्थ आहेत. या
मी बांधलेल्या मंदिरातही तू मावू शकत नाहीस हे आम्ही
जाणतो 19पण माझी एवढी प्रार्थना ऐक. मी करुणा भाकतो
तिच्याकडे लक्ष दे. परमेश्वर देवा, माझी आर्त हाक ऐक.
मी तुझा एक दास आहे. 20या मंदिराकडे अहोरात्र तुझी
दृष्टी असो असे मी तुला कळकळीने विनवतो. तुझे नाव
इथे राहील असे तू म्हणाला होतास. मी या मंदिराकडे
तोंड करून प्रार्थना करीन तेव्हा ती तू ऐक. 21तुझ्या
इस्राएल लोकांनी तसेच मी केलेल्या प्रार्थना तू ऐक. या
प्रार्थनास्थलाकडे तोंड करून आम्ही प्रार्थना करु तेव्हा
तिच्याकडे तू लक्ष दे. तुझ्या आकाशातील स्थानावरुन
तुझे इथे लक्ष असू दे. आमच्या प्रार्थना ऐक आणि आम्हाला
क्षमा कर.

22"एखाद्याने दुसऱ्याची काही आगळीक केल्याचा
आरोप त्याच्यावर आला आणि तो तुझे नाव घेऊन आपण
निर्दोष आहोत असे सांगू लागला तर तो वेदीसमोर तसे
शपथ घेऊन सांगत असताना, 23तू स्वर्गातून ऐक. तुझ्या
सेवकाचा योग्य न्यायनिवाडा कर. ज्याच्या हातून आगळीक
घडली असेल त्याला शासन कर. त्याच्यामुळे इतरांना
जसा त्रास झाला तसाच याला होऊ दे. ज्याचे वागणे उचित
होते तो निर्दोष असल्याचे सिध्द कर.

24"इस्राएल लोकांनी तुझ्याविरुध्द पाप केल्यामुळे जर
शत्रूंनी तुझ्या इस्राएल लोकांचा पराभव केला आणि
अशावेळी इस्राएल लोक तुझ्याकडे येऊन तुझ्या नावाने
क्षमायाचना करु लागले, या मंदिरात येऊन विनवणी
करु लगले तर 25तू स्वर्गातून ते ऐकून इस्राएल लोकांना
क्षमा कर. तू त्यांना आणि त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या
भूमीवर त्यांना पुन्हा परत आण. 26"इस्राएल लोकांनी
पाप केल्यामुळे आकाश बंद होऊन पर्जन्यवृष्टी झालीच
नाही आणि त्यावेळी पश्चात्तापाने इस्राएल लोकांनी मंदिराच्या
दिशेने पाहात क्षमायाचना केली, तू केलेल्या शिक्षेमुळे
पापाचरण थांबवले, 27तर स्वर्गातून त्यांचे ऐकून घे. त्याचे
ऐक आणि त्यांना माफ कर. इस्राएल लोक तुझे दास
आहेत. त्यांना जगण्याचा सन्मार्ग दाखव. तुझ्या भूमीवर
पाऊस पाड. ती तूच तुझ्या लोकांना दिलेली जमीन आहे.

28"कदाचित् एखादेवेळी दुष्काळ, भयानक साथीचा रोग,
किंवा पिकांवर रोग अथवा टोळ, नाकतोडे यांची धाड
अशी काही आपत्ती किंवा लोकांच्या राहत्या नगरांवर
शत्रूचा हल्ला झाला, असे काही झाल्यास 29तुझे इस्राएल
लोक तुझी करुणा भाकतील आणि प्रार्थना करतील. जो
तो आपले क्लेश किंवा दु:ख ओळखून, या मंदिराच्या
दिशेने बाहू उभारून प्रार्थना करु लागेल. 30तेव्हा तू ते
स्वर्गातून ऐक. तू स्वर्गात राहातोस. तू ऐकून त्यांना क्षमा
कर. प्रत्येकाचा मनोदय तुला माहीत असल्यामुळे
ज्याला जे योग्य असेल त्याला ते दे. मानवाचे मन
फक्त तूच ओळखतोस. 31असे झाले म्हणजे तू
आमच्या पूर्वजांना दिलेल्या या भूभागावर त्यांची वसती
असेपर्यंत लोक तुझा धाक बाळगतील आणि तुझे ऐकतील.

32"तुझ्या इस्राएल प्रजेपेक्षा वेगळा असा कोणी उपराही
कदाचित् दूर देशाहून इथे आलेला असेल. तुझ्या नावाची
महती, आणि तुझे समर्थ बाहू यांच्यामुळे तो आलेला असेल.
त्याने येऊन या मंदिराकडे पाहात प्रार्थना केली तर 33तू
ती स्वर्गातून ऐक. त्याची मागणी पुरव. म्हणजे इस्राएल
लोकांप्रमाणेच पृथ्वीवरील इतर लोकांनाही तुझ्या नावाचा
महिमा कळेल आणि त्यांना तुझ्याविषयी आदर वाटेल. हे
मी बांधलेले मंदिर तुझ्या नावाचे आहे हे पृथ्वीवरील सर्व
लोकांना कळेल.

34"शत्रूशी लढण्यासाठी जेव्हा तू आपल्या लोकांना
दुसऱ्या ठिकाणी पाठवशील आणि तिथून ते तू निवडलेल्या
या नगराच्या आणि मी बांधलेल्या मंदिराच्या दिशेने पाहात
प्रार्थना करु लागतील. 35तर तू स्वर्गातून त्यांची प्रार्थना
ऐक आणि त्यांच्या विनंती प्रमाणे त्यांना मदत कर.

36"पाप कोणाच्या हातून होत नाही? तेव्हा लोक तुझ्या
विरुध्द पाप करतील तेव्हा तुझा त्यांच्यावर कोप होईल.
तू शत्रूंकरवी त्यांचा पाडाव करशील, बंदी म्हणून त्यांना
बळजबरीने इथून दूरच्या किंवा एखाद्या जवळच्या ठिकाणी
नेले जाईल. 37पण तिथे त्यांचे हृदयपरिवर्तन होऊन,
परभूमीत कैदी होऊन पडलेले ते म्हणतील, 'आम्ही चुकलो,
आमच्या हातून पाप घडले आहे. आम्ही दुराचरण केले
आहे.' 38असतील तिथून ते अंतरीच्या उमाळ्याने तुला
शरण येतील. या देशाच्या तू त्याच्या पूर्वजांना दिलेल्या
देशाच्या दिशेने आणि तू निवडलेल्या नगराच्या दिशेने
पाहात ते प्रार्थना करतील. तुझ्या नावाखातर मी बांधलेल्या
या मंदिराच्या दिशेने पाहात ते प्रार्थना करतील. 39असे
होईल तेव्हाही तू तुझ्या स्वर्गातील निवासस्थानातून ऐक.
त्यांच्या विनवणीला कान दे, त्यांना मदत कर. ज्यांनी
तुझ्या विरूध्द पाप केले आहे अशा तुझ्या लोकांना क्षमा
कर. 40आता, हे परमेश्वरा, माझी तुला विनवणी आहे
की तू तुझे कान आणि डोळे उघड. आम्ही इथे बसून जी
प्रार्थना करणार आहोत ती लक्षपूर्वक ऐक.

41"आता, हे परमेश्वर देवा, तुझे सामर्थ्य मिरवणाऱ्या
या करारकोशाजवळ, आपल्या विश्रामस्थानी ये. तुझे
याजक उध्दाराने भूषित होवोत. तुझे भक्त या सुजनतेने
सुखी होवोत

42हे परमेश्वर देवा, तुझ्या अभिषिक्त राजाचा स्वीकार
कर. तुझा एकनिष्ठ सेवक दावीद याचे स्मरण असू दे."

## मंदिराचे परमेश्वराला समर्पण

7 शलमोनाची प्रार्थना संपल्याबरोबर स्वर्गातून अग्नी
खाली उतरला आणि त्याने होमबली आणि यज्ञार्पणे
भस्मसात केली. परमेश्वराच्या लखलखीत तेजाने मंदिर
भरून गेले. 2त्या तेजाने दिपून याजकांनाही परमेश्वराच्या

मंदिरात जाता येईना. 3थेट स्वर्गातून अग्नी खाली येणे
आणि परमेश्वराचे तेज मंदिरावर पसरणे या गोष्टी
इस्राएलच्या समस्त लोकांनी पाहिल्या. तेव्हा त्यांनी
जमिनीपर्यंत लवून नमन केले, परमेश्वराला धन्यवाद
दिले आणि ते म्हणाले, *“परमेश्वर चांगला आहे त्याची
कृपा सर्वकाळ राहाते.”*

4मग शलमोनाने आणि सर्व इस्राएल लोकांनी
परमेश्वरापुढे यज्ञ केले. 5राजा शलमोनाने 22,000 बैल
आणि 1,20,000 मेंढरे वाहिली. राजा आणि प्रजा यांनी
देवाच्या मंदिराची प्रतिष्ठापना केली. ते फक्त उपासनेसाठी
वापरायचे होते. 6याजक आपल्या कामाला सिध्द झाले.
परमेश्वराच्या भजनाची वाद्ये घेऊन लेवी ही उभे राहिले.
राजा दावीदाने ही वाद्ये परमेश्वराच्या स्तवनासाठी करून
घेतली होती. “परमेश्वराचे स्तवन करा कारण त्याची
कृपा चिरंतन आहे” असे याजक आणि लेवी गात होते.
लेवींच्या समोर उभे राहून याजक कर्णे वाजवत होते. सर्व
इस्राएल लोक तिथे उभे होते.

7मंदिरासमोरचे मधले आवार शलमोनाने पवित्र केले.
या जागी त्याने होमार्पणे आणि शांतिअर्पणांची वपा वाहिली.
होमार्पणे, अन्नार्पणे आणि वपा यांचे प्रमाण एवढे प्रचंड
होते की पितळी वेदीवर ते सर्व मावेना म्हणून मधले
आवार त्याने वापरले.

8शलमोन आणि इस्राएल लोक यांनी सात दिवस हा
सण साजरा केला. हामाथच्या वेशीपासून ते मिसरच्या
झऱ्या पर्यंतच्या भागातले सगळे इस्राएल लोक इथे
आल्यामुळे शलमोनबरोबरचा जमाव खूपच मोठा होता.
9आठव्या दिवशी त्यांनी पवित्र सभा घेतली कारण त्या
आधी सात दिवस त्यांनी सण साजरा केला होता. वेदी
पवित्र करून ती परमेश्वराला समर्पण केली. ती फक्त
परमेश्वराच्या उपासनेसाठी वापरायची होती. सात दिवस
त्यांनी सण साजरा केला. 10सातव्या महिन्याच्या तेविसाव्या
दिवशी शलमोनाने लोकांना घरोघरी परतायला सांगितले.
दावीद, शलमोन आणि इस्राएल लोक यांच्यावर परमेश्वराने
कृपा केल्यामुळे लोक आनंदी झाले होते. त्यांची अंत:करणे
आनंदाने भरून गेली होती.

## शलमोनाला परमेश्वराचे दर्शन

11परमेश्वराचे मंदिर आणि राजगृह बांधण्याचे काम
शलमोनाने पार पाडले. परमेश्वराचे मंदिर आणि आपले
निवासस्थान यांच्याबाबतीत योजलेल्या सर्व गोष्टी त्याने
यशस्वीपणे पूर्ण केल्या. 12नंतर एकदा रात्री परमेश्वराने
शलमोनाला दर्शन दिले. तो शलमोनाला म्हणाला,
“शलमोना तुझी प्रार्थना मी ऐकली आहे. हे स्थळ यज्ञगृह
म्हणून मी निवडले आहे. 13कधी जर मी पर्जन्यवृष्टी
होऊ नये म्हणून आकाशमार्ग बंद केला, धान्य फस्त
करायला टोळधाड पाठवली किंवा रोगराईचा प्रसार केला
14आणि अशावेळी लोकांनी नम्र होऊन माझा धावा
करून माझ्या दर्शनाची इच्छा बाळगली, दुराचाराचा त्याग
केला तर मी स्वर्गातून त्यांच्या हाकेला ओ देईन. त्यांना
त्यांच्या पापाची क्षमा करीन आणि त्यांची भूमी संकटमुक्त
करीन.

15आता माझी दृष्टी या ठिकाणी वळलेली आहे. इथे
होणाऱ्या प्रार्थना ऐकायला माझे कान उत्सुक आहेत.

16हे मंदिर मी माझे म्हणून निवडले आहे. माझे नाव
इथे सदासर्वकाळ राहावे म्हणून मी हे स्थान पवित्र केले
आहे. माझी दृष्टी आणि माझे चित्त नेहमी या मंदिराकडे
लागलेले असेल.

17“शलमोना, तुझे वडील दावीद यांच्याप्रमाणेच तू
माझ्याशी वागलास, माझ्या आज्ञांचे पालन केलेस, माझे
विधी आणि नियम पाळलेस,

18तर मी तुला समर्थ राजा बनवील आणि तुझे राज्य
महान होईल. तुझे वडील दावीद यांना मी तसे वचन दिले
आहे. त्यांना मी म्हणालो होतो, ‘दावीद तुझ्या घराण्यातील
पुरुषच इस्राएलच्या राजपदावर आरुढ होईल.’

19“पण जर माझ्या आज्ञा आणि नियम तू पाळले नाहीस.
इतर दैवतांची उपासना व सेवा केलीस, 20तर मात्र मी
दिलेल्या या भूमीतून इस्राएल लोकांना मी हुसकावून
लावीन. माझ्या नावाप्रीत्यर्थ असलेले हे पवित्र मंदिर मी
सोडून जाईन. इतकेच नव्हे तर ते इतर देशांमध्ये निंदेचा
विषय करीन. 21एकेकाळी पूज्य मानल्या गेलेल्या या
मंदिरावरुन जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येकाला आता आश्चर्य
वाटेल. ते लोक म्हणतील, ‘हा प्रदेश आणि हे मंदिर यांची
अशी अवस्था परमेश्वराने का केली बरे?’ 22तेव्हा त्यांना
इतर लोक सांगतील, ‘कारण आपल्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याचे या इस्राएल लोकांनी ऐकले नाही. या
लोकांना या परमेश्वरानेच मिसरमधून बाहेर आणले.
तरी हे इतर दैवतांच्या भजनी लागले. त्यांनी त्यांची उपासना
व सेवा केली. त्यांनी मूर्तिपूजा सुरु केली. म्हणून इस्राएल
लोकांवर परमेश्वराने हे अरिष्ट आणले.’”

## शलमोनाने बांधलेली नगरे

8 मंदिर आणि आपले घर बांधायला शलमोनाला
वीस वर्षे लागली. 2मग हिरामने दिलेली नगरे
शलमोनाने वसवली. त्या नगरांमध्ये काही इस्राएल
लोकांना वसती करण्यास मुभा दिली. 3पुढे शलमोनाने
हमाथ सोबा हे नगर जिंकून घेतले. 4वाळवंटातील
तदमोर हे नगरही त्याने वसवले. कोठारांसाठी म्हणून
त्याने हमाथमधली नगरे बांधली. 5वरचे बेथ-होरोन
आणि खालचे बेथ-होरोन यांची उभारणीही शलमोनाने
केली. ती त्याने भक्कम तटबंदीची नगरे केली. त्यांना
मजबूत कोट, वेशी आणि अडसर करवले. 6बालाथ आणि
अन्य कोठारे असलेली गावे यांची शलमोनाने पुनर्रचना
केली. रथ ठेवण्यासाठी तसेच घोडेस्वारांच्या वस्तीसाठीही
त्याने गावे वसवली. यरुशलेम, लबानोनसकट आपल्या

आधिपत्याखालील सर्व प्रदेशात शलमोनाने आपल्या
गरजेनुसार बांधकामे केली.
7–8इस्राएल लोक राहात असलेल्या प्रदेशात अनेक
परकी लोकही होते. ते म्हणजे हित्ती, अमोरी, परिज्जी,
हिव्वी आणि यबूसी. त्यांना शलमोनाने वेठबिगार केले.
हे लोक मूळचे इस्राएल नव्हते. या प्रदेशात राहून
गेलेल्या लोकांचे ते वंशज होते आणि इस्राएल लोकांनी
त्यांना अजून नष्ट केले नव्हते. ते अजूनही आहेत.
9इस्राएल लोकांपैकी कोणालाही शलमोनाने
वेठबिगारीसाठी सक्ती केली नाही. ते त्याचे योध्दे होते. ते
सैन्याधिकारी, रथाधिपती, स्वारांचे अधिकारी असे होते.
10काही इस्राएलीजण तर शलमोनाच्या अधिकाऱ्यांवर
अंमल गाजवणारे होते. असे प्रमुख अधिकारी 250 होते.
11शलमोनाने फारोच्या मुलीला, तिच्यासाठी बांधलेल्या
महालात दावीद नगराहून आणले. शलमोन म्हणाला, “ज्या
ज्या ठिकाणी परमेश्वराचा करारकोश ठेवण्यात आला,
ती सर्व स्थाने पवित्र आहेत. तेव्हा माझ्या बायकोने दावीद
नगरात राहू नये.”

12मग शलमोनाने वेदीवर परमेश्वराला होमार्पणे
वाहिली. मंदिराच्या प्रवेशमंडपासमोरच शलमोनाने ती वेदी
बांधली होती. 13मोशेच्या आज्ञेप्रमाणे शलमोन रोज होमार्पणे
करी. शब्बाथच्या दिवशी, नवचंद्र दर्शनीला, वर्षभरातल्या
तीन सणांना होमार्पणे करायची असत. बेखमीर भाकरीचा
सण, सप्ताहांचा सण, आणि मंडपांचा सण हे तीन वार्षिक
सण होत. 14आपल्या वडलांच्या सूचना शलमोनाने तंतोतंत
पाळल्या. परमेश्वराच्या सेवेसाठी त्याने याजकवर्गाच्या
नेमणुका केल्या. लेवींना त्यांची कामे पार पाडायला नेमले.
स्तुतिगीते म्हणणे आणि मंदिराच्या चाकरीतील रोजची
सेवाकार्ये बजावण्यात याजकांना मदत करणे ही लेवींची
कामे होती. याखेरीज शलमोनाने प्रत्येक प्रवेशद्वाराशी
द्वारपालांच्या गटांच्या नेमणुका केल्या. परमेश्वराला
मानणाऱ्या दावीदाने अशाच सूचना दिल्या होत्या. 15याजक
आणि लेवी यांना शलमोनाने ज्या सूचना दिल्या त्यात
इस्राएल लोकांनी बदल केला नाही की आज्ञाभंग केला
नाही. मौल्यवान वस्तू जतन करण्याविषयीच्या आज्ञांचाही
त्यांनी बदल केला नाही.

16शलमोनाची सगळी कामे सिध्दीला गेली. मंदिराच्या
कामाला सुरुवात केल्यापासून ते संपेपर्यंत त्यांचे व्यवस्थित
नियोजन केले होते. अशा रीतीने मंदिराचे काम तडीला
गेले.

17यानंतर शलमोन लाल समुद्रानजीकच्या अदोम
देशातील एस्योन-गेबेर आणि एलोथ या नगरांना गेला.
18हिरामने त्याच्याकडे आपली गलबते पाठवली.
समुद्रपर्यटनात तरबेज अशा हिरामच्या सेवकांनीच ती नेली.
शलमोनाच्या चाकरीतील लोकांबरोबर हे सेवक ओफिर
येथे गेले आणि तेथून 17 टन सोने आणून त्यांनी ते
शलमोनाला दिले.

## शबाच्या राणीची शलमोनाशी भेट

9 शलमोनाची कीर्ती शबाच्या राणीच्या कानावर गेली.
तेव्हा त्याची परीक्षा पाहायला म्हणून ती यरुशलेमला
आली. तिच्याबरोबर मोठा लवाजमा होता. मसाल्याचे पदार्थ,
सोनेनाणे, मौल्यवान रत्ने या गोष्टी उंटांवर लादून तिने
आणल्या होत्या. शलमोनाची भेट घेऊन ती त्याच्याशी
बोलली. तिला शलमोनाला बरेच प्रश्न विचारायचे होते.
2शलमोनाने तिच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. त्याला त्यातले
काहीच अवघड वाटले नाही. 3शबाच्या राणीने त्याच्या
सूज्ञपणाचा प्रत्यय घेतला, त्याचा महाल पाहिला. 4त्याच्या
मेजावरील अन्नपदार्थ तिने पाहिले, त्याच्या प्रमुख
कारभाऱ्यांची बैठक पाहिली. त्यांची कार्यपध्दती आणि
त्यांचे पोशाख पाहिले. शलमोनाचे मद्यपरिचारक आणि
त्यांचे पोशाख, परमेश्वराच्या मंदिरातील शलमोनाने
केलेली होमार्पणे हे सर्व तिने पाहिले आणि या दर्शनाने ती
थक्क झाली. 5मग ती राजा शलमोनाला म्हणाली, “तुझ्या
कामगिरीची आणि शहाणपणाची जी वर्णने मी माझ्या
देशात ऐकली ती खरीच आहेत. 6इथे येऊन स्वत: अनुभव
घेईपर्यंत मला त्या गोष्टी खऱ्या वाटत नव्हत्या. खरे तर
तुझ्या सूज्ञपणाची थोरवी निम्म्यानेही माझ्यापर्यंत पोचली
नव्हती. तुझ्याबद्दल जे ऐकले त्यापेक्षाही तू महान आहेस.
7तुझ्या बायका, तुझी माणसे आणि अधिकारी फार
भाग्यवान आहेत. तुझ्या सेवेत असतानाच त्यांना तुझ्या
शहाणपणाचा लाभ होतो. 8तुझा देव परमेश्वर ह्याची स्तुति
असो. तो तुझ्यावर प्रसन्न आहे आणि आपल्या वतीने
त्याने तुला राजा म्हणून सिंहासनावर बसवले आहे.
परमेश्वराचे इस्राएलवर प्रेम आहे आणि इस्राएल वर त्याचा
कायमचा वरदरस्त आहे. जे उचित आणि न्याय्य ते
करण्यासाठी त्याने तुला राजा केले आहे.”

9शबाच्या राणीने मग राजा शलमोन याला 4 1/2 टन
सोने, अनेक मसाल्याचे पदार्थ आणि किंमती रत्ने यांचा
नजराणा दिला. तिने दिले तसे मसाल्याचे जिन्नस शलमोनाला
कधीच कुणाकडून मिळाले नाहीत.

10हिराम आणि शलमोन यांच्या सेवकांनी ओफिरहून
सोने आणले. रक्तचंदनाचे लाकूड आणि मौल्यवान रत्नेही
त्यांनी आणली. 11परमेश्वराच्या मंदिराच्या आणि
राजमहालाच्या पायऱ्या तसेच गायकांच्या वीणा व सतारी
यासाठी शलमोनाने हे रक्तचंदन वापरले. रक्तचंदनाचा
वापर करून बनवलेल्या इतक्या सुंदर वस्तू यापूर्वी यहूदात
कधी कोणी पाहिल्या नव्हत्या. 12शबाच्या राणीला जे हवे
ते राजा शलमोनाने देऊ केले. त्याने जे देऊ केले ते तिने
आणलेल्या नजराण्यापेक्षा जास्तच होते. मग शबाची राणी
आपल्या लव्याजम्यासाहित आपल्या देशात परतली.

## शलमोनाची अवाढव्य संपत्ती

13शलमोनाला वर्षभरात जेवढे सोने मिळे त्याचे वजन
25 टन एवढे असे. 14याखेरीज, फिरस्ते व्यापारी आणि

विक्रेते खूप सोने आणत. अरबस्तानचे राजे आणि वेगवेगळ्या प्रदेशांचे सुभेदार सोने-चांदी आणत, ते वेगळेच 15सोन्याचे पत्रे ठोकून 200 मोठ्या ढाली राजा शलमोनाने केल्या. अशाप्रत्येक ढालीला 7 1/2 पौंड वजनाचा सोन्याचा पत्रा लागला. 16याखेरीज अशा घडीव सोन्याच्या तीनशे ढाली त्याने केल्या. त्यांना प्रत्येकी 3 3/4 पौंड सोने लागले. या सोन्याच्या ढाली त्याने लबानोनच्या अरण्यमहालात ठेवल्या.

17राजा शलमोनाने हस्तिदंताचे मोठे सिंहासन केले. ते शुध्द सोन्याने मढवले. 18या सिंहासनाला सहा पायऱ्या होत्या आणि सोन्याचे पादासन होते. दोन्ही बाजूला हात टेकवता येतील अशी सिंहासनाला सोय होती. आणि त्याला लागून एक एक सिंहाचा पुतळा होता. 19सहा पायऱ्यांपैकी प्रत्येक पायरीच्या दोन्ही बाजूला एकेक असे एकंदर 12 सिंह होते. दुसऱ्या कोणत्याही राज्यात असे सिंहासन नव्हते. 20राजाची सर्व पेयपात्रे सोन्याची होती. लबानोनच्या अरण्यमहालातील सर्व घरगुती वापरायच्या वस्तू शुध्द सोन्याने घडवलेल्या होत्या. शलमोनाच्या काळात चांदी फारशी मौल्यवान मानली जात नसे. 21तार्शीश येथे जाणारी गलबते त्याच्याकडे होती. हिरामची माणसे त्याच्या गलबतांतून मालाची ने-आण करीत. सोन-रुपे, हस्तिदंत, वानरे आणि मोर यांनी भरलेली ही गलबते दर तीन वर्षांनी तार्शीशहून शलमोनाकडे येत.

22वैभव आणि ज्ञान या बाबतीत पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही राजापेक्षा शलमोन महान झाला. 23त्याच्या सल्लामसलतीचा लाभ घ्यायला सर्व ठिकाणचे राजे शलमोनाकडे येऊ लागले. परमेश्वरानेच शलमोनाला जो सूज्ञपणा दिला होता तो पाहायाला ते येत असत. 24हे राजे दरवर्षी येताना शलमोनासाठी नजराणे घेऊन येत. त्यात सोन्यारुप्याच्या वस्तू, कपडे, चिलखते, मसाले, घोडे आणि खेचरे ह्यांचा समावेश असे.

25घोडे आणि रथ यांच्यासाठी शलमोनाकडे 4,000 ठाणी होती. त्याच्यापदरी 12,000 रथचालक होते. त्यांची सोय त्याने मुद्दाम वसवलेल्या नगरात आणि स्वत:ला लागतील तेवढ्यांची यरुशलेममध्ये केली होती. 26फरात नदीपासून पलिष्ट्यांचा देश आणि मिसरची सीमा येथपर्यंतच्या सर्व राजांवर शलमोनाचा अधिकार होता. 27राजा शलमोनाकडे चांदी ही दगडधोंडे असावे इतकी आणि गंधसरुची झाडे, डोंगराळ देशातल्या उंबराच्या झाडांइतकी विपुल होती. 28मिसर आणि इतर देशामधून लोक शलमोनासाठी घोडे आणत.

## शलमोनाचा मृत्यू

29शलमोनाने सुरुवातीपासून शेवटपर्यंत ज्यागोष्टी केल्या त्या नाथान या संदेष्ट्याच्या इतिहासात तसेच, अहीया शिलोनी याच्या संदेशलेखात आणि इद्दो या भविष्यवक्त्याच्या ‘इद्दोची दर्शने’ यात नोंदवलेल्या आहेत. नबाटाचा मुलगा यराबाम याविषयीही इद्दोने लिहिलेले आहे. 30शलमोनाने यरुशलेममधून इस्राएलवर चाळीस वर्षे राज्य केले. 31मग तो आपल्या पूर्वजांना मिळाला. लोकांनी त्याचे दावीदनगरात दफन केले. शलमोनाचा मुलगा रहबाम हा पुढे शलमोनाच्या जागी राज्य करु लागला.

## रहबामचे अविचारी वर्तन

10 रहबाम शखेम येथे गेला कारण त्याला राजा करण्यासाठी सर्व इस्राएल लोक तेथे गेले होते. 2यावेळी यराबाम मिसरमध्ये होता कारण त्याने राजा शलमोनापुढून पळ काढला होता. यराबाम हा नबाटाचा मुलगा. रहबाम राजा होणार हे त्याने ऐकले म्हणून तो मिसरहून आला. 3तेव्हा इस्राएल लोकांनी यराबामलाही आपल्याबरोबर येण्यास सांगितले. अशा तऱ्हेने यराबाम आणि सर्व इस्राएल लोक रहबामकडे आले. त्याला ते म्हणाले, “रहबाम, 4तुमच्या वडलांनी आमचे आयुष्य फार जिकिरीचे केले होते. त्यांनी जणू आमच्या मानेवर जू ठेवले होते. ते आता हलके करा म्हणजे आम्ही तुमच्या आज्ञेत राहू.”

5यावर रहबाम त्यांना म्हणाला, “तुम्ही तीन दिवसांनी परत या.” तेव्हा लोक निघून गेले.

6राजा रहबामने मग आपल्या वडलांच्या पदरी असणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळींशी चर्चा केली. रहबाम त्यांना म्हणाला, “मी या लोकांशी काय बोलावे? मला या बाबतीत तुमचा सल्ला हवा आहे.”

7तेव्हा ती वयोवृध्द मंडळी रहबामला म्हणाली, “तू या लोकांशी प्रेमाने वागलास, त्यांना संतुष्ट केलेस आणि त्यांच्याशी गोड बोललास तर ते चिरकाल तुझी सेवा करतील.”

8पण रहबामने त्यांचा हा सल्ला मानला नाही. तो मग आपल्या पदरी असलेल्या आणि आपल्या बरोबर लहानाचे मोठे झालेल्या तरुण मंडळींशी बोलला. 9रहबाम त्यांना म्हणाला, “तुम्ही मला काय सल्ला द्याल? आपण लोकांना काय सांगावे? त्यांना आपले ओझे हलके करून हवे आहे. माझ्या वडलांनी त्यांच्या मानेवर ठेवलेले जूं आता त्यांना मी हलके करायला हवे आहे.”

10तेव्हा त्याच्या पिढीची ती तरुण मुले रहबामला म्हणाली, “तुमच्याकडे आलेल्या लोकांना तुम्ही असे सांगावे. लोक तुम्हाला म्हणाले की, ‘मानेवर जूं ठेवल्याप्रमाणे तुमच्या वडलांनी आम्हाला कठोर जिणे जगायला लावले. तुम्ही आता ते हलके करावे असे आम्हाला वाटते.’ पण रहबाम, तुम्ही त्यांना असे सांगावे, ‘माझी करंगळी माझ्या वडीलांच्या कमरेपेक्षा जाड असेल. 11माझ्या वडीलांनी तुमच्यावर फार ओझे लादले ना! मी तर ते अधिकच भारी करणार

आहे. माझ्या वडलांनी तुम्हाला चाबकांचे फटकारे मारले.
मी त्या चाबकांना धातूची अणकुचीदार टोके लावून शासन
करीन.'"
12"यराबाम आणि सर्व लोक तीन दिवसांनी रहबामकडे
आले." राजा रहबामने त्यांना तसेच सांगितले होते. 13रहबाम
त्यांच्याशी यावेळी अविचारीपणाने बोलला. मोठ्यांचा सल्ला
त्याने मानला नाही. 14तरुणांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे तो
बोलला. तो लोकांना म्हणाला, "माझ्या वडीलांनी तुमच्यावर
फार ओझे लादले ते मी अधिकच भारी करीन. त्यांनी
तुम्हाला चाबकाने शासन केले असेल पण मी टोकदार
धातूची टोके जोडलेल्या चाबकांनी शासन करीन." 15राजा
रहबामने लोकांचे ऐकून घेतले नाही. तो असे बोलला
कारण हा बदल परमेश्वरानेच घडवून आणला होता.
अहीया मार्फत परमेश्वर यराबामशी जे बोलला होता
ते प्रत्यक्षात यावे म्हणूनच त्याने अशी वेळ येऊ
दिली. अहीया हा शिलोनी लोकांपैकी होता आणि यराबाम
नबाटाचा मुलगा होता.
16राजा रहबामने आपल्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले हे
इस्राएल लोकांच्या लक्षात आले. ते राजाला म्हणाले,
"आम्ही काय दावीदाच्या घराण्यातले आहोत का? मुळीच
नाही! इशायच्या जमिनीत आमचा वाटा आहे का? नाही!
तेव्हा इस्राएल लोकांनो, आपण आपले आपापल्या घरी
जाऊ या. दावीदाच्या मुलाला आपल्या घरच्यांवरच राज्य
करु द्या." सर्व इस्राएल लोक मग घरोघर गेले. 17पण
यहूदाच्या नगरांमध्ये राहाणारे काही इस्राएल लोक होते.
रहबाम त्यांच्यावर राज्य करत राहिला.
18हदोराम हा वेठबिगारांवरचा मुकादम होता.
रहबामने त्याला इस्राएल लोकांकडे पाठवले. पण
इस्राएल लोकांनी त्याच्यावर दगडफेक करून त्याला
मरेपर्यंत मारले. इकडे रहबामने रथाचा आश्रय घेतला
आणि त्वरेने पळ काढला. तो यरुशलेमला पळून गेला.
19तेव्हापासून आजतागायत इस्राएलचे दावीदाच्या घराण्याशी
वैर आहे.

11 यरुशलेमला आल्यावर रहबामने 1,80,000 उत्तम
योध्दे जमवले. यहूदा आणि बन्यामिन या
घराण्यांमधून त्याने ही निवड केली. इस्राएलशी युध्द करून
स्वत:कडे राज्य खेचून आणण्यासाठी त्याने ही जमवाजमव
केली. 2पण परमेश्वराचा माणूस शमाया याच्याकडे
परमेश्वराचा संदेश आला. परमेश्वर त्याला म्हणाला,
3"शमाया, यहूदाचा राजा, शलमोनपुत्र रहबाम याच्याशी तू
बोल. तसेच यहूदा आणि बन्यामिन इथल्या इस्राएल
लोकांशीही बोल. त्यांना म्हणावे. 4परमेश्वराचे म्हणणे
असे आहे 'आपल्या बांधवांशीच लढू नका. प्रत्येकाने
घरी जावे. मीच हे सर्व व्हायला कारणीभूत आहे.'" तेव्हा
राजा रहबाम आणि त्याचे सैन्य यांनी परमेश्वराचा संदेश
मानला आणि ते परतले. यराबामवर त्यांनी हल्ला केला
नाही.

## रहबाम यहूदाचे सामर्थ्य वाढवतो

5रहबाम यरुशलेममध्ये राहिला. हल्ल्यांचा प्रतिकार
करायला सज्ज अशी भक्कम नगरे त्याने यहूदात उभारली.
6बेथलेहेम, एटाम, तकोवा, 7बेथ-सूर, शोखो, अदुल्लाम,
8गथ, मारेशा, सीफ, 9अदोरइम, लाखीश, अजेका, 10सोरा,
अयालोन व हेब्रोन या नगरांची डागडुजी केली. यहूदा
आणि बन्यामिन मधली ही गावे चांगली भक्कम करण्यात
आली. 11नगरे मजबूत झाल्यावर रहबामने त्यांच्यावर
नायक नेमले. अन्नसामग्री, तेल, द्राक्षारस यांचा साठा
त्याने तेथे केला. 12प्रत्येक नगरात ढाली आणि भाले
यांचा पुरवठा करून गावे अधिकच मजबूत केली. यहूदा
आणि बन्यामिन मधील ही नगरे आणि तेथील लोक
यांना रहबामने आपल्या नियंत्रणाखाली ठेवले.
13समस्त इस्राएलमधील याजक आणि लेवी रहबामशी
सहमत होते. ते त्याला येऊन मिळाले. 14लेवींनी आपली
शेती आणि शिवारे सोडली आणि ते यहूदा व यरुशलेम
येथे आले. परमेश्वराप्रीत्यर्थ याजकाचे काम करायला
यराबाम आणि त्याचे मुलगे यांनी लेवींना प्रतिबंध केला
म्हणून ते आले. 15यराबामने बोकड आणि वासरे यांच्या
मूर्ती उच्चस्थानी स्थापन केल्या आणि त्यांच्या पूजेसाठी
आपले याजक निवडले.
16इस्राएलच्या सर्व वंशातील जे लोक इस्राएलचा देव
परमेश्वर याच्याशी एकनिष्ठ होते ते ही, लेवींनी इस्राएल
सोडल्यावर, परमेश्वराला यज्ञार्पणे करण्यासाठी
यरुशलेमला आले. 17त्यामुळे यहूदाचे राज्य बळकट झाले.
त्यांनी शलमोनाचा पुत्र रहबाम याला तीन वर्षे पाठिंबा
दिला. या काळात त्यांनी दावीद आणि शलमोन
यांच्यासारखेच आचरण ठेवले.

## रहबामचे घराणे

18रहबामने महलथशी विवाह केला. तिचे वडील
यरीमोथ आणि तिची आई अबीहईल. यरीमोथ हा दावीदाचा
मुलगा. अबीहईल अलीयाबची मुलगी आणि अलीयाब हा
इशायचा मुलगा. 19महलथपासून रहबामला यऊश,
शमऱ्या आणि जाहम हे मुलगे झाले. 20मग रहबामने
माकाशी विवाह केला. माका ही अबशालोमची नात.
माकाला रहबामपासून अबीया, अत्थय, जीजा आणि
शलोमीथ ही मुले झाली. 21रहबामचे आपल्या इतर पत्नी
आणि उपपत्नी यांच्यापेक्षा माकावर अधिक प्रेम होते.
माका अबशालोमची नात. रहबामला अठरा पत्नी आणि
साठ उपपत्नी होत्या. त्याला अठ्ठावीस मुलगे आणि साठ
मुली होत्या. 22अबीयाला रहबामने सर्व भावडांमध्ये
अग्रक्रम दिला. कारण त्याला राजा करावे असा त्याचा
मानस होता. 23रहबामने मोठ्या चतुराईने आपल्या सर्व
मुलांना यहूदा आणि बन्यामिनमधील नगरांमध्ये विखरुन
ठेवले. त्यांना उत्तम रसद पुरवली. त्यांची लग्ने लावून
दिली.

## मिसरचा राजा शिशक याची यरुशलेमवर स्वारी

12 रहबामचे सामर्थ्य वाढले. त्याने आपले राज्य बळकट केले. पण त्याचबरोबर त्याने आणि इस्राएल लोकांनी परमेश्वराच्या नियमशास्त्राचे पालन करण्याचे थांबवले. 2रहबामच्या कारकिर्दीच्या पाचव्या वर्षी शिशकने यरुशलेमवर हल्ला चढवला. शिशक हा मिसरचा राजा होता. रहबाम आणि यहूदाचे लोक यांनी परमेश्वराचा मार्ग सोडल्यामुळे असे झाले. 3शिशककडे 12,000 रथ, 60,000 घोडेस्वार आणि अगणित पायदळ होते. त्याच्या सैन्यात लुबी, सुक्की व कुशी हे लोक होते. 4यहूदातील भक्कम नगरांचा पाडाव केल्यावर शिशकने आपले सैन्य यरुशलेमला आणले.

5तेव्हा शमाया हा संदेष्टा रहबाम आणि वडीलधारी मंडळी यांच्याकडे आला. शिशकच्या धास्तीने ही सर्व वडीलधारी मंडळी यरुशलेमला जमली होती. शमाया रहबामला आणि या सर्वांना म्हणाला, "परमेश्वराचे म्हणणे असे आहे 'रहबाम, तू आणि यहूदाचे लोक यांनी माझा त्याग केला आहे. तुमचे आचरण माझ्या नियमांच्या विरुध्द आहे. तेव्हा मीही तुम्हाला सोडून शिशकच्या हाती दिले आहे.'"

6तेव्हा यहूदाची ती वडीलधारी मंडळी आणि रहबाम यांना पश्चात्ताप झाला आणि ते विनम्र झाले. "परमेश्वर म्हणतो ते खरे आहे." असे त्यांनी उदगार काढले.

7ते नम्र झाले आहेत हे परमेश्वराने पाहिले. तेव्हा पुन्हा शमायाला परमेश्वराचा संदेश आला. परमेश्वर त्याला म्हणाला, "राजा आणि ही मंडळी माझ्यापुढे नम्र झाल्यामुळे मी त्यांचा नाश करणार नाही. त्यांना तारीन. शिशक मार्फत त्यांना मी माझ्या कोपाचे लक्ष्य करणार नाही. 8पण यरुशलेमचे लोक शिशकचे चाकर होतील. माझी सेवा आणि इतर देशांतील राजाची सेवा यामधला भेद त्यांना कळावा म्हणून ते त्याचे अंकित होतील."

9शिशकने यरुशलेमवर स्वारी केली आणि परमेश्वराच्या मंदिरातील खजिना लुटून नेला. शिशक हा मिसरचा राजा होता. राजमहालातील खजिनाही त्याने लुटला. शलमोनाने केलेल्या सोन्याच्या ढाली त्याने हस्तगत केल्या. 10त्या सोन्याच्या ढालीऐवजी रहबामने पितळेच्या ढाली केल्या. त्या त्याने महालाचे संरक्षण करणाऱ्या द्वारपालांना दिल्या. 11राजा परमेश्वराच्या मंदिरात जात असे तेव्हा ते ढाली घेऊन पुढे होत. नंतर त्या पहारेदारांच्या खोलीत ठेवून देत.

12रहबाम असा नम्र झाल्यामुळे परमेश्वराचा त्याच्यावरील कोप शमला. त्याचा परमेश्वराने पूर्ण नायनाट केला नाही. शिवाय यहूदात थोडा चांगुलपणाही शिल्लक होता.

13रहबामने यरुशलेममध्ये आपले सामर्थ्य वाढवले. तो राज्यावर आला तेव्हा एक्के चाळीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये सतरा वर्षे राज्य केले. इस्राएलच्या सर्व वंशांमधून परमेश्वराने यरुशलेमची निवड केली होती. आपले नाव राहावे म्हणून त्याने यरुशलेम निवडले होते. रहबामच्या आईचे नाव नामा; नामा अमोनीण नगरातली होती. 14रहबामने वाईट गोष्टी केल्या कारण परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्याविषयी त्याने मनात निश्चय केला नव्हता.

15शमाया हा संदेष्टा आणि इद्दो हा द्रष्टा यांच्या इतिहासात रहबामने आपल्या कारकीर्दीत केलेल्या सर्व गोष्टींची साद्यंत हकीकत आहे. शमाया आणि इद्दो वंशावळींचा इतिहास लिहीत. रहबाम आणि यराबाम या दोघांमध्ये नित्य लढाया होत. 16रहबामने मृत्यूनंतर आपल्या पूर्वजांबरोबर विश्रांती घेतली. दावीदनगरात त्याचे दफन झाले. त्याचा मुलगा अबीया गादीवर आला.

## यहूदाचा राजा अबीया

13 इस्राएलचा राजा यराबामच्या कारकीर्दीच्या अठराव्या वर्षी अबीया यहूदाचा राजा झाला. 2त्याने यरुशलेममध्ये तीन वर्षे राज्य केले. मीखाया ही अबीयाची आई. गिबा नगरातील उरीएलची ती मुलगी. अबीया आणि यराबाम यांच्यामध्ये लढाई जुंपली. 3अबीयाच्या सैन्यात 400,000 शूर योध्दे होते. अबीयाने लढाईत त्यांचे नेतृत्व केले. यराबामकडे 800,000 सैनिक होते. यराबाम अबीयाशी युध्द करायला सज्ज झाला.

4एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशातील समाराइम पर्वतावर उभे राहून अबीया म्हणाला, "यराबाम आणि समस्त इस्राएल लोकांनो, ऐका, 5दावीद आणि त्याची मुले यांनी इस्राएलवर सर्वकाळ राज्य करावे असा इस्राएलाच्या परमेश्वर देवानेच त्यांना आधिकार दिला आहे हे ध्यानात घ्या. देवाने दावीदाशी तसा मिठाचा करारच केला आहे.* 6पण यराबामने त्याचा स्वामी जो राजा त्याच्याकडे पाठ फिरवली. यराबाम नबाटाचा मुलगा. नबाट हा दावीदाचा पुत्र शलमोनाच्या सेवकांपैकी एक. शलमोन दावीदाचा मुलगा. 7मग कुचकामी आणि वाईट माणसांशी यराबामशी दोस्ती झाली. यराबाम आणि ही वाईट माणसे शलमोनाचा मुलगा रहबाम याच्या विरुद्ध होती. रहबाम तरुण आणि अनुभवी होता. त्याला यराबाम आणि त्याचे अधम मित्र यांच्यावर वचक बसवता आला नाही. 8"आता तुम्ही लोकांनी परमेश्वराचे राज्य म्हणजे दावीदाच्या मुलांची सत्ता असलेल्या राज्याचा पराभव करण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही संख्ये ने वरचढ आहात आणी यराबामने तुमच्यासाठी देव म्हणून बनवलेली सोन्याची वासरे तुमच्याकडे आहेत. 9परमेश्वराचे याजक आणि लेवी यांना तुम्ही हाकलून

---

**परमेश्वराने ... केला आहे** एकत्र मीठ खाणे याचा अर्थ मैत्रीचा करार आजन्म पाळणे. परमेश्वराने दावीदाशी केलेला करार हा असा अतूट आहे असे इथे अबीयाला सांगायचे आहे.

लावले आहे. हे याजक अहरोनचे वंशज आहेत त्यांच्या
जागी तुम्ही आपले याजक नेमले आहेत. अशा गोष्टी
इतर देशातले लोक करतात. कोणीही उठून एक गोऱ्हा
किंवा सात एडके आणून स्वत:वर संस्कार केला की तो
जे खरे परमेश्वरच नव्हेत त्यांचा याजक बनतो.

10“पण आमच्यासाठी परमेश्वर हाच आमचा देव आहे.
आम्ही त्याच्याकडे पाठ फिरवलेली नाही. त्याचा त्याग
केलेला नाही. परमेश्वराची सेवा करणारे याजक अहरोनचे
वंशज आहेत. लेवी त्यांना परमेश्वराच्या सेवेत मदत
करतात. 11परमेश्वराला ते होमार्पणे वाहतात, तसेच दररोज
सकाळ संध्याकाळ सुवासिक धूप जाळतात. मंदिरातील
मुद्दाम करवून घेतलेल्या मेजावर समर्पित भाकर मांडतात.
रोज संध्याकाळी ते सोन्याच्या दीपवृक्षावरील दिवे लावतात.
आम्ही आपल्या परमेश्वर देवाची काळजीपूर्वक सेवा
करतो. पण तुम्ही परमेश्वराला सोडले आहे. 12खुद्द
परमेश्वर आमच्या बाजूचा आहे. तोच आमचा शास्ता
असून त्याचे याजक आमच्या बाजूला आहेत. तुम्ही जागे
व्हावे व परमेश्वराकडे यावे म्हणून देवांचे याजक कर्णे
वाजवत आहेत. इस्राएल लोकांनो, आपल्या पूर्वजांचा
परमेश्वर ह्याच्या विरुध्द लढू नका, कारण त्यात तुम्हाला
यश येणार नाही.”

13पण याराबामने सैन्याच्या एका तुकडीला अबीयाच्या
सैन्यामागे दबा धरुन राहायला सांगितले. त्यांनी अबीयाच्या
सैन्याला पाठीमागून वेढा घातला. 14यहूदातील या सैन्याने
जेव्हा आपल्या भोवताली पाहिले तेव्हा याराबामच्या सैन्याने
आपल्याला मागून पुढून वेढल्याचे त्यांच्या लक्षात आले.
तेव्हा यहूदा लोकांनी परमेश्वराचा धावा सुरु केला आणि
याजकांनी कर्णे वाजवले. 15मग अबीयाच्या सैन्यातील
लोकांनी आरोळ्या ठोकल्या. त्याबरोबर देवाने याराबामच्या
सैन्याचा पराभव केला. अबीयाच्या यहूदा सैन्याने
याराबामच्या इस्राएली सैन्याचा पाडाव केला. 16इस्राएल
लोकांनी यहूदासमोरुन पळ काढला. देवाने यहूदांच्या हातून
इस्राएल लोकांचा पराभव केला. 17अबीयाने केलेल्या या
दारुण पराभवात इस्राएलचे 5,00000 योध्दे मारले गेले.
18अशाप्रकारे त्यावेळी इस्राएल लोक हरले आणि यहूदा
जिंकले. आपल्या पूर्वजांच्या परमेश्वर देवावर विसंबून
राहिल्यामुळेच यहुदा सैन्याने विजय मिळवला.

19अबीयाच्या सैन्याने याराबामच्या सैन्याचा पाठलाग
केला. बेथेल, यशाना आणि एफ्रोन ही नगरे आणि त्यांच्या
आसपासची खेडी एवढा प्रदेश याराबामकडून अबीयाच्या
सैन्याने बळकावला.

20अबीयाच्या हयातीत पुन्हा याराबाम डोके वर काढू
शकला नाही. परमेश्वराने याराबामवर प्रहार केला आणि
तो मेला. 21अबीयाचे सामर्थ्य मात्र वाढले. त्याने चौदा
बायका केल्या. त्याला बावीस मुलगे आणि सोळा मुली
झाल्या. 22इद्दो या भविष्यवाद्याच्या नोंदवह्यांमध्ये अबीयाने
केलेल्या इतर सर्व गोष्टी लिहून ठेवलेल्या आहेत.

14 अबीयाला पुढे आपल्या पूर्वजांसोबत चिरविश्रांती
मिळाली. दावीदनगरात लोकांनी त्याचे दफन
केले. त्याचा मुलगा आसा हा त्याच्यानंतर राज्य करु
लागला. आसाच्या कारकिर्दीत लोकांना दहा वर्षे शांतता
लाभली.

### यहूदाचा राजा आसा

2आसाने परमेश्वर देवाच्या दृष्टीने न्याय्य आणि
उचित असा कारभार केला. 3त्याने मूर्तिपूजेसाठी
वापरात येणाऱ्या चमत्कारिक वेद्या काढून टाकल्या.
उच्च स्थाने पाडली आणि पवित्र मानले जाणारे स्तंभ
फोडून टाकले. आसाने अशेरा देवीचे खांबही उदध्वस्त
केले. 4त्याने यहूदी लोकांना परमेश्वर देवाला अनुसरायची
आज्ञा केली. त्यांच्या पूर्वजाचा देव तोच. त्या परमेश्वराने
घालून दिलेल्या आज्ञा आणि नियम पाळायला फर्मावले.
5यहूदाच्या सगळ्या नगरांमधली उच्च स्थाने आणि धूप
जाळायच्या वेद्या आसाने काढून टाकल्या. आसाच्या
कारकीर्दीत त्यामुळे राज्यात शांतता नांदत होती. 6या
काळात आसाने यहूदात भक्कम तटबंदीची नगरे बांधली.
परमेश्वराने शांतता दिल्यामुळे या काळात आसा युध्दमुक्त
राहिला.

7आसा यहूदातील लोकांना म्हणाला, “ही नगरे बांधून
त्याभोवती तटबंदी करु. त्यांना कोट, बुरुज, वेशी आणि
अडसर करु. या प्रदेशात आपण राहात आहोत, तेव्हाच हे
करु. परमेश्वर देवाला अनुसरल्यामुळे हा देश आपल्याला
मिळाला आहे. त्याने आपल्याला स्वास्थ्यही दिले आहे.”
तेव्हा त्यांनी ते बांधले व यश मिळविले.

8आसाच्या सैन्यात यहूदाच्या वंशातील 3,00,000 जण
आणि बन्यामिन वंशातील 2,80,000 लोक होते. यहूदा
लोकांकडे मोठ्या ढाली अणि भाले होते. बन्यामिनाकडे
लहान ढाली होत्या. तसेच धनुष्य-बाण होते. हे सर्व पराक्रमी
आणि बलवान लढवय्ये होते.

9पुढे जेरहने आसावर स्वारी केली. जेरह हा कूशी
होता. त्याच्या कडे 1,000,000 सैनिक आणि 300 रथ
होते. जेरह आपल्या सैन्याला घेऊन थेट मारेशा नगरापर्यंत
आला. 10आसा त्याच्याशी सामना करायला निघाला.
मारेशा जवळच्या सफाथाच्या खोऱ्यात त्याने आपले सैन्य
उभे केले.

11आसा आपल्या परमेश्वर देवाला हाक मारुन म्हणाला,
“परमेश्वरा, या बलाढ्य सेनेपुढे आम्हा दुर्बलांना तूच मदत
करु शकतोस. तूच आमच्या मदतीला उभा राहा. आम्ही
तुझ्यावर भरवंसा ठेवून आहोत. तुझे नाव घेऊनच आम्ही
या विशाल सेनेला तोंड देणार आहोत. परमेश्वर देवा,
तुझ्यावर कोणी विजय मिळवू नये.” 12मग परमेश्वराने
आसाच्या यहूदा सेनेकडून कूशी सैन्याचा पराभव करवला.
कूशी सैन्याने पळ काढला. 13आसाच्या सैन्याने गरारपर्यंत
कुशींचा पाठलाग केला. त्यात कूशींची एवढी प्राणहानी

झाली की पुन्हा लढाईला उभे राहायचे बळ त्यांच्यात
राहिले नाही. परमेश्वरापुढे आणि त्याच्या सैन्यापुढे ते पार
धुळीस मिळाले. आसाच्या लोकांनी कूशींच्या मौल्यवान
वस्तू लुटल्या. 14गरारच्या आसपासच्या सर्व गावांचा
आसाच्या सैन्याने पराभव केला. तिथल्या लोकांनी
परमेश्वराची धास्ती घेतली. या गावांमध्ये लुटण्यासारखे
बरेच काही होते. ते आसाच्या सैन्याने घेतले. 15मेंढपाळांच्या
वस्त्यांवर आसाच्या सैन्याने धाड घातली. तेथून त्यांनी
बरीच मेंढरे आणि उंट घेतले आणि ते यरुशलेमला परतले.

## आसाने केलेले बदल

15 ओबेदचा मुलगा अजऱ्या याच्यात परमेश्वराच्या
आत्म्याचा संचार झाला. 2अजऱ्या आसाच्या
भेटीला गेला आणि म्हणाला, "आसा मी काय म्हणतो ते
ऐक. यहूदा आणि बन्यामिन लोकहो, तुम्हीही ऐका. जर
तुम्ही परमेश्वराबरोबर राहिलात तर तो तुमच्याबरोबर
राहील. जर तुम्ही त्याचा शोध केलात तर तो तुम्हाला
भेटेल. पण तुम्ही त्याला सोडलेत तर तो ही तुम्हाला
सोडेल. 3इस्राएलला दीर्घकाळ पर्यंत खरा देव असा नव्हता,
तसेच शिकवायला याजक किंवा नियमशास्त्र नव्हते 4पण
अडचणीत सापडल्यावर इस्राएल लोक पुन्हा परमेश्वर
देवाकडे वळाले, तो इस्राएलचा देव आहे. त्यांनी देवाचा
शोध घेतला आणि त्यांना तो सापडला.

5त्या धकाधकीच्या काळात कोणीही सुरक्षितपणे प्रवास
करू शकत नव्हता. सगळ्याच देशामध्ये अराजकाची
स्थिती होती. 6देश असोत की नगरे सगळी एकमेकांविरुध्द
लढत होती. कारण परमेश्वराने सर्व प्रकारच्या संकटांनी
त्यांना त्रस्त केले होते. 7पण आसा, तू व इस्राएल लोकहो
तुम्ही हतबल होऊ नका, धीर सोडू नका. यहूदांनो
बन्यामिनांनो हिंमतीने वागा. तुमच्या सद्वर्तनाचे फळ
तुम्हाला मिळेल."

8आसाला या शब्दांनी आणि ओबेद या संदेष्ट्याच्या
संदेशाने धीर आला. त्याने यहूदा आणि बन्यामिनमधील
अमंगल मूर्ती हटवल्या. एफ्राइमचा जो डोंगराळ प्रदेश
त्याने ताब्यात घेतला होता त्या प्रदेशातल्या गावांमधल्या
मूर्तीही काढून टाकल्या. मंदिराच्या प्रवेशद्वारातील
परमेश्वराच्या वेदीची डागडुजी केली.

9मग त्याने यहूदा आणि बन्यामिनमधील सर्व लोक
तसेच एफ्राइम, मनश्शे व शिमोन वंशातील जे लोक
इस्राएल राष्ट्रातून यहूदांत आले होते त्यांना एकत्र बोलावले.
आसाचा देव परमेश्वर याची त्याला साथ आहे हे पाहून
लोक मोठ्या संख्येने आले.

10आसाच्या कारकिर्दीच्या पंधराव्या वर्षाच्या तिसऱ्या
महिन्यात आसा आणि हे सर्व लोक यरुशलेममध्ये एकत्र
जमले. 11त्यांनी 700 गुरे, 7,000 मेंढरे यांचे बली
परमेश्वराला अर्पण केले. ही गुरे आणि लूट त्यांनी शत्रू
कडून आणली होती. 12तिथे त्यांनी जिवाभावाने परमेश्वर
देवाची सेवा करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या
पूर्वजांचाही देव हाच होता.

13जो परमेश्वर देवाची सेवा करणार नाही त्याला ठार
करण्याचे ठरवले. मग अशी व्यक्ती लहान असो की
मोठी, स्त्री असो की पुरुष 14आसा आणि हे सर्व लोक
यांनी परमेश्वरापुढे शपथ वाहिली. त्यांनी मोठ्याने जयघोष
केला. कर्णे आणि रणशिंगे या वाद्यांचा नाद केला.
15मनोभावे शपथ घेतल्यामुळे सर्व यहूदा लोकांना
मनापासून आनंद झाला. एकचित्ताने ते परमेश्वराला शरण
गेले. त्यांनी देवाचा शोध घेतला असता तो त्यांना सापडला
होता. परमेश्वराने त्यांना चहूबाजूंनी स्वास्थ्य दिले.

16आसा राजाने आपली आई माका हिलाही राजमाता
पदावरुन दूर केले. कारण तिने अमंगळ अशा अशेरा
देवीच्या स्तंभाची स्थापना केली होती. त्याने तो स्तंभ
मोडून तोडून टाकला आणि किद्रोन खोऱ्यात जाळून
टाकला. 17यहूदातील उच्च स्थाने त्याने काढून टाकली
नाहीत तरी पण तो आमरण परमेश्वराशी एकनिष्ठ राहिला.

18मग त्याने व त्याच्या वडलांनी परमेश्वरासाठी करवून
घेतलेल्या सोन्याचांदीच्या पवित्र वस्तू पुन्हा मंदिरात
आणल्या. 19आसाच्या पस्तिस वर्षांच्या कारकीर्दीत मग
पुन्हा युध्द झाले नाही.

## आसाची अखेरची वर्षे

16 आसाच्या राज्याच्या छत्तिसाव्या वर्षी बाशाने
यहूदावर स्वारी केली. बाशा हा इस्राएलचा राजा.
रामा हे नगर निवडून त्याने त्याची मजबुती केली. यहूदाचा
राजा आसा याच्याकडे कोणालाही येण्याजाण्याला प्रतिबंध
व्हावा हा त्याचा त्यामागचा हेतू होता.

2तेव्हा आसाने परमेश्वराच्या मंदिरातील आणि
राजमहालातील सोने आणि चांदी काढून घेतली. अरामचा
राजा बेन-हदाद दिमिष्काला राहात होता. आसाने
त्याच्याकडे सोने, आणि चांदी पाठवून त्याला निरोप
पाठवला,

3"आपण आपसात एक करार करु. आपल्या दोघांच्या
वडीलांमध्येही तसा करार केलेला होता. मी माझ्याकडचे
सोने-रुपे तुझ्याकडे पाठवत आहे. इस्राएलचा राजा बाशा
याच्याबरोबरचा तुझा करार मोड म्हणजे तो माझ्याकडे
पाठ फिरवेल आणि मला त्रस्त करणार नाही."

4बेन-हदाद या गोष्टीशी सहमत झाला. त्याने इस्राएली
नगरांवर आपले सैन्याचे सरदार पाठवले. त्या सरदारांनी
ईयोन, दान आबेल मईम या नगरांवर हल्ला केला. कोठारे
असलेल्या नफतालीच्या नगरांवरही त्यांनी चढाई केली.
5या चढायांचे वृत्त बाशाच्या कानावर गेले. तेव्हा त्याने
रामानगराच्या मजबुतीचे काम अर्धवट सोडून दिले. 6राजा
आसाने मग सर्व यहूदींना बोलावले. या लोकांनी रामा
नगर बांधण्यासाठी वापरलेले दगड, लाकूड ही सामग्री
हस्तगत केली. त्यांनी ती गेबा आणि मिस्पा या नगरांच्या

बांधकामासाठी वापरली. 7यावेळी हनानी नावाचा द्रष्टा
यहूदाचा राजा आसा याच्याकडे आला व त्याला म्हणाला,
“आसा तू मदतीसाठी तुझ्या परमेश्वर देवावर भरवंसा न
ठेवता अरामच्या राजावर अवलंबून राहिलास. तू
परमेश्वराचे साहाय्य घ्यायला हवे होतेस. पण तू
परमेश्वराचा धावा केला नाहीस म्हणून अरामचे सैन्य
तुझ्या हातातून सुटून गेले आहे. 8कूशी आणि लुबी यांचे
सैन्य तर केवढे बलाढ्य होते! त्यांच्याकडे कितीतरी रथ
आणि स्वार होते. पण तेव्हा तू परमेश्वरावर भरवंसा
ठेवलास आणि परमेश्वराने तुला विजय मिळवून दिला.
9अखिल पृथ्वीवर कोणाची आपल्यावर श्रध्दा आहे याचा
शोध परमेश्वराची नजर सतत घेत असते व अशांना तो
आपले पाठबळ देतो. पण आसा, तू मात्र मूर्खपणा केला
आहेस. तेव्हा यापुढे तुला लढायांना तोंड द्यावे लागेल.
10हनानीच्या या बोलण्याचा आसाला राग आला व क्रोधाच्या
भरात त्याने हनानीला तुरूंगात डांबले. कधी कधी आसा
काही लोकांशी फार निर्दयतेने वागे.” 11‘यहूदा आणि
इस्राएल राजांचा इतिहास’ या पुस्तकात आसाच्या
कारभाराचे साद्यंत वर्णन आहे. 12आपल्या राज्याच्या
एकोणचाळीसाव्या वर्षी तो पायाच्या दुखण्याने बेजार झाला.
त्याचा आजार खूप बळावला तरी त्याने दुखण्यात
परमेश्वराचा धावा केला नाही. त्याने वैद्यांकरवी इलाज
करून घेतला. 13आपल्या कारकीर्दीच्या 41 व्या वर्षी तो
वारला व आपल्या पूर्वजांबरोबर त्याने चिरविश्रांती घेतली.
14दावीदनगरात त्याने आधीच स्वत:साठी करून घेतलेल्या
कबरीत लोकांनी त्याचे दफन केले. विविध सुवासिक
द्रव्ये आणि मसाले घातलेल्या बिछान्यावर लोकांनी त्याला
ठेवले. त्याच्या सन्मानार्थ सुगंधी द्रव्ये जाळली.*

## यहूदाचा राजा यहोशाफाट

17 आसाच्या जागी आता यहोशाफाट यहूदाचा राजा
झाला. यहोशाफाट हा आसाचा मुलगा. इस्राएलला
तोंड देता यावे म्हणून यहोशाफाटने यहूदाचे बळ वाढवले.
2त्याने यहूदाच्या सर्व तटबंदीच्या नगरांमध्ये सैन्याच्या
तुकड्या ठेवल्या. आसाने काबीज केलेल्या एफ्राइमच्या
नगरांमध्ये तसेच यहूदामध्ये त्याने ठाणी बसवली.

3यहोशाफाटला परमेश्वराचा पाठिंबा होता कारण लहान
वयातच त्याने आपले पूर्वज दावीद यांच्यासारखी सत्कृत्ये
केली होती. ते बाल देवतेच्या भजनी लागला नाही. 4आपल्या
पूर्वजांच्या देवालाच तो शरण गेला. परमेश्वराच्या आज्ञा
त्याने पाळल्या. इतर इस्राएल लोकांसारखा तो वागला
नाही. 5परमेश्वराने यहोशाफाटला यहूदाचा खंबीर राजा
केले. यहूदा लोकांनी यहोशाफाटसाठी नजराणे आणले
त्यामुळे त्याला धन तसेच मानसन्मान मिळाला.
6परमेश्वराच्या मार्गाने वाटचाल करण्यात यहोशाफाटचे
मन रमले. यहूदा प्रांतातील उच्च स्थाने आणि अशेरा
देवीचे खांब त्याने काढून टाकले.

7आपल्या राज्याच्या तिसऱ्या वर्षात त्याने सरदारांना
नगरांमधून लोकांना शिकवण द्यायला पाठवले.
बेन-हईक, ओबद्या, जखऱ्या, नखनेल आणि मीखाया हे
ते सरदार होत. 8त्यांच्याबरोबर शमाया, नथन्या, जबद्या,
असायेल, शामीरामोथ, यहोनाथान, अदोनीया, तोबीया
आणि तोब अदोनीया या लेवींचीही त्याने रवानगी केली.
अलीशामा व यहोराम हे याजकही त्याने पाठवले. 9हे
सरदार, लेवी आणि याजक या सर्वांनी लोकांना शिकवले.
परमेश्वराच्या नियमशास्त्राचे पुस्तक त्यांनी बरोबर घेतले
होते. यहूदातल्या गावोगावी जाऊन ते लोकांना शिकवत
गेले. 10यहूदाच्या आसपासच्या देशांनी परमेश्वराची धास्ती
घेतली होती. त्यामुळे त्यांनी यहोशाफाटवर स्वारी करून
युध्दाला तोंड फोडले नाही. 11काही पलिष्टे यहोशाफाटसाठी
भेटी आणत. या राजाचे वर्चस्व ते जाणून असल्यामुळे
रुपेही आणत. काही अरबी शेव्व्या-मेंढ्या घेऊन येत.
त्यांनी असे 7,700 मेंढे आणि 7,700 बोकड त्याला दिले.
12यहोशाफाटचे सामर्थ्य असे दिवसेंदिवस वाढत चालले.
त्याने यहूदात किल्ले आणि कोठारे बांधली. 13या
कोठारांच्या गावामध्ये त्याने भरपूर साठा केला.
यरुशलेममध्ये यहोशाफाटने चांगली लढाऊ माणसेही
ठेवली. 14आपापल्या घराण्यांप्रमाणे त्यांची गणती झालेली
होती. ती पुढीलप्रमाणे: यहूदातील सरदार असे: अदना हा
3,00,000 सैनिकांचा सेनापती होता. 15यहोहानानच्या
हाताखाली 280,000 सैनिक होते. 16जिख्रीचा मुलगा
अमस्या हा त्या खालोखाल 2,00,000 जणांचा मुख्य होता.
त्याने आपणहून परमेश्वराच्या सेवेला वाहून घेतले होते.
17बन्यामिनांच्या वंशातील सरदार असे: एल्यादाच्या
अखत्यारीत 2,00,000 सैनिक धनुष्यबाण आणि ढाली
वापरण्यात तरबेज होते. एल्यादा हा एक अतिशय शूर
योध्दा होता. 18यहोजाबादकडे युध्दसज्ज असे 1,80,000
जण होते. 19ही सर्व फौज राजा यहोशाफाट याच्या सेवेत
होती. या खेरीज यहूदाभरच्या नगरांमधील किल्ल्यांवर
त्याने माणसे नेमली होती.

## मीखायाचा राजा अहाबला इशारा

18 यहोशाफाटला भरपूर धनदौलत आणि
मानसन्मान मिळाला. राजा अहाबच्या घराण्याशी
सोयरीक जुळवून त्याने त्याच्याशी सलोखा केला.*
2त्यानंतर काही वर्षांनी यहोशाफाट शोमरोन येथे अहाबच्या

**त्याच्या … जाळली** सुवासिक द्रव्ये जाळली असा अर्थ “होऊ शकतो, तसेच लोकांनी त्याचे दहन केले” असाही अर्थ निघू शकतो.

**राजा अहाबच्या … सलोखा केला** यहोशाफाटचा मुलगा यहोराम याचे अहाबची मुलगी अथल्या हिच्याशी लग्न झाले. पाहा 2 इतिहास 21:6.

भेटीला गेला. त्याप्रसंगी यहोशाफाट आणि त्याच्याबरोबरचे
लोक यांच्याप्रीत्यर्थ अहाबने बरीच गाईगुरे आणि
शेव्व्यामेंढ्या यांचे बळी दिले. अहाबने यहोशाफाटला
रामोथ-गिलादावर चढाई करण्यास प्रवृत्त केले. 3अहाब
त्याला म्हणाला, "रामोथगिलादावरील स्वारीत तूही
माझ्याबरोबर सहभागी होशील का?" अहाब इस्राएलचा
राजा होता आणि यहोशाफाट यहूदाचा. यहोशाफाट त्याला
म्हणाला, "तू आणि मी काही वेगळे नाही. माझी माणसे
ती तुझीच माणसे. आम्ही अवश्य लढाईत भाग घेऊ."
4यहोशाफाट पुढे असेही म्हणाला, "पण त्याआधी
परमेश्वराचा आदेशही घेऊ या."

5तेव्हा राजा अहाबने सुमारे चारशे संदेष्ट्यांना बोलावून
विचारले, "आम्ही रामोथ-गिलादावर स्वारी करावी की
नाही?" तेव्हा ते संदेष्टे राजा अहाबला म्हणाले, "जरुर
जा. कारण परमेश्वर रामोथ-गिलादचा पराभव करील."
6पण यहोशाफाट म्हणाला, "यांच्याखेरीज परमेश्वराचा
संदेष्टा इथे कोणी आहे का? परमेश्वराला त्याच्या
संदेष्ट्यामार्फतच आपण विचारायला हवे."

7तेव्हा अहाब यहोशाफाटला म्हणाला, "इथे तसा एकजण
आहे. त्याच्या मार्फत आपण परमेश्वराला विचारु शकतो.
पण मला त्याच्याकडून कधीच अनुकूल संदेश मिळत
नाही. नेहमी प्रतिकूल संदेशच तो मला देतो, त्यामुळे मला
त्याचा द्वेष वाटतो. त्याचे नाव मीखाया. तो इम्लाचा मुलगा."
पण यहोशाफाट म्हणाला, "अहाब, तू असे म्हणू नयेस."
8तेव्हा अहाबने आपल्या एका कारभाऱ्याला बोलावून
"इम्लाचा मुलगा मीखाया याला लगेच घेऊन यायला
सांगितले."

9इस्राएलचा राजा अहाब आणि यहूदाचा राजा यहोशाफाट
राजवस्त्रे परिधान करून शोमरोन नगराच्या वेशीजवळच्या
खळ्यात आपापल्या सिंहासनांवर विराजमान झाले होते.
त्यांच्यासमोर ते चारशे संदेष्टे भविष्यकथन करत होते.
10कनानचा मुलगा सिदकीया याने लोखंडाची शिंगे करून
आणली होती. तो म्हणाला, "परमेश्वर म्हणतो 'अरामी
लोकांना या शिंगांच्या सहाय्याने तुम्ही नेस्तनाबूत कराल.'"
11इतर सर्व संदेष्ट्यांनीही तेच सांगितले. ते म्हणाले,
"रामोथ-गिलाद वर चालून जा. तुम्ही विजयी व्हाल.
परमेश्वर तुझ्या हातून म्हणजे राजाच्या हातून अराम्यांचा
पराभव करील."

12मीखायाला आणायला गेलेला निरोप्या त्याला
म्हणाला, "मीखाया, ऐक सगव्व्या संदेष्ट्यांचे म्हणणे एकच
आहे. राजाची सरशी होईल असे ते म्हणतात. तेव्हा तूही
तसेच म्हणावेस. तू ही चांगले उद्गार काढ."

13पण मीखाया म्हणाला, "परमेश्वराची शपथ तो वदवेल
तसेच मी बोलणार."

14मीखाया मग अहाब राजाकडे आला. राजा
त्याला म्हणाला, "मीखाया, आम्ही रामोथ-गिलादवर
स्वारी करावी की नाही?" मीखाया म्हणाला, "खुशाल
चढाई करा. परमेश्वर तुमच्या हातून त्यांचा पराभव
करवेल."

15राजा अहाब मीखायला म्हणाला, "परमेश्वराचे नाव
उच्चारुन सत्य तेच सांग असे मी कितीदा तुला निक्षून
सांगितले!"

16यावर मीखाया राजाला म्हणाला, "मेंढपाळाविना मेंढरे
असावीत तसे मी इस्राएल लोकांना डोंगरांवर विखुरलेले
पाहिले. परमेश्वर म्हणाला, 'यांना कोणी शास्ता नाही. ही
आपापल्या घरी सुखरुप जावोत.'"

17इस्राएलचा राजा अहाब यहोशाफाटला म्हणाला,
"मीखाया मला कधीच परमेश्वराचा शुभसंदेश देत नाही.
तो नेहमी प्रतिकूलच बोलतो असे मी तुला म्हणालोच
होतो."

18मीखाया म्हणाला, "परमेश्वराचा संदेश काय आहे
तो ऐका परमेश्वराला मी आपल्या सिंहासनावर बसलेले
पाहिले. स्वर्गातील सर्व सेना त्याच्या भोवताली उभी होती.
19परमेश्वर म्हणाला, 'इस्राएलचा राजा अहाब याला
रामोथ-गिलादावर हल्ला करायला कोण बरे युक्तीने प्रवृत्त
करील? म्हणजे अहाबचा तिथच शेवट होईल.'
परमेश्वराभोवती उभ्या असलेल्या अनेक जणांनी
अनेकविध गोष्टी सुचवल्या.

20मग एक आत्मापुढे आला आणि परमेश्वरासमोर
उभा राहून म्हणाला, 'मी अहाबला फशी पाडतो.'
परमेश्वराने त्या आत्म्याला विचारले, 'कसे बरे?' 21तेव्हा
तो म्हणाला, 'अहाबच्या संदेष्ट्यांच्या तोंडून असत्य वदवणारा
आत्मा असे मी रुप घेईन.' तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला,
'तू अहाबला मोहात पाडू शकशील. चल, जा आपल्या
कामगिरीवर.'

22"अहाब, आता तूच पाहा. परमेश्वराने तुझ्या
संदेष्ट्यांच्या तोंडी असत्य बोलणाऱ्या आत्म्याचा संचार
केला आहे. तुझ्यावर अरिष्ट येणार असे परमेश्वराने
बोलून दाखवले आहे."

23तेवढ्यात सिद्कीयाने पुढे होऊन मीखायाच्या थोबाडीत
मारले. सिद्कीया हा कनानचा मुलगा. तो म्हणाला,
"मीखाया, मला सोडून परमेश्वराचा आत्मा तुझ्याशी
बोलायला गेला तो कोणत्या दिशेने?" 24मीखाया म्हणाला,
"सिद्कीया, घराच्या अगदी आतल्या खोलीत तू लपायला
पळ काढशील तेव्हा तुला ते कळेल."

25राजा अहाब म्हणाला, "मीखायाला नगराचा सुभेदार
आमोन आणि राजपुत्र योवाश यांच्याकडे घेऊन जा
26आमोन आणि योवाश यांना म्हणावे, 'राजाचे म्हणणे
असे: मीखायाला कैदेत टाका. मी युध्दावरुन परतेपर्यंत
त्याला भाकर आणि पाणी याखेरीज काहीही
खायला-प्यायला देऊ नका.'"

27मीखाया म्हणाला, "अहाब तू लढाईनंतर सुखरुप परत
आलास तर परमेश्वर माझ्यामार्फत बोललेला नाही असे
खुशाल समज. लोकहो, माझे हे शब्द लक्षात ठेवा."

## रामोथ-गिलाद येथे अहाबचे मरण

28इस्राएलचा राजा अहाब आणि यहूदाचा राजा
यहोशाफाट यांनी रामोथ-गिलादवर हल्ला चढवला.
29राजा अहाब यहोशाफाटला म्हणाला, "युध्दात मी वेषांतर
करतो. तू मात्र राजवस्त्रेच घाल." आणि त्याप्रमाणे राजा
अहाबने वेषांतर केले आणि दोनही राजे लढाईला भिडले.
30अरामच्या राजाने आपल्या रथांवरच्यासरदारांना
आज्ञा केली होती की, "इस्राएलचा राजा अहाब याच्यावरच
फक्त हल्ला करा. बाकी लहान थोर कोणाशीही लढू
नका." 31त्या सरदारांनी यहोशाफाटला पाहिले तेव्हा त्यांना
वाटले, "हाच अहाब इस्राएलचा राजा." म्हणून त्यांनी
यहोशाफाटकडे मोहरा वळवला. पण यहोशाफाट मोठ्याने
ओरडला आणि परमेश्वर त्याच्या मदतीला आला. त्याने
त्या सरदारांना यहोशाफाटपासून दूर वळवले. 32हा
इस्राएलचा राजा नाही असे सरदारांच्या लक्षात आले तेव्हा
त्यांनी त्याचा पाठलाग सोडून दिला.

33पण कोण्याएका सैनिकाने सहज म्हणून, लक्ष्य
निश्चित न करता, धनुष्यातून एक बाण सोडला आणि तो
नेमका चिलखताच्या सांध्यातून अहाबच्या शरीरात रुतला.
अहाब आपल्या सारथ्याला म्हणाला, "मागे वळ आणि
मला युध्द भूमीतून बाहेर काढ. मी जखमी झालो आहे."
34त्यादिवशी घनघोर युध्द झाले. अराम्यांकडे तोंड करून
अहाब आपल्या रथात संध्याकाळपर्यंत टेकून बसला.
संध्याकाळी त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

19 यहूदाचा राजा यहोशाफाट यरुशलेममध्ये आपल्या
घरी सुखरुप परतला. 2हनानीचा मुलगा येहू हा
द्रष्टा होता. तो यहोशाफाटला सामोरा गेला. येहू
यहोशाफाटला म्हणाला, "दुष्टांच्या मदतीला तू का गेलास?
परमेश्वराचा द्वेष करणाऱ्यांबद्दल तुला आपुलकी का
वाटावी? म्हणूनच परमेश्वराचा तुझ्यावर कोप झाला आहे.
3पण तू काही चांगल्या गोष्टीही केल्या आहेस. या देशातून
तू अशेराचे खांब हटवलेस आणि परमेश्वराला अनुसरायचे
तू मन:पूर्वक ठरवले आहेस."

## यहोशाफाट न्यायाधीशांची नेमणूक करतो

4यहोशाफाट यरुशलेममध्ये राहात असे, त्याने पुन्हा
एकदा बैर-शेब्यापासून एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशापर्यंत
फिरुन लोकांच्या भेटी घेतल्या. त्याने लोकांना पुन्हा एकदा
त्यांच्या पूर्वजांचा देव परमेश्वर याच्याकडे वळवले. 5तसेच
त्याने यहूदामध्ये आणि यहूदाच्या प्रत्येक तटबंदीच्या नगरांत
न्यायाधीश नेमले. 6यहोशाफाटने या न्यायाधीशांना
सांगितले, "तुम्ही जे करायचे ते विचारपूर्वक करा. कारण
लोकांसाठी नव्हे तर परमेश्वरासाठी तुम्ही न्याय करत
आहात. तुमच्या निर्णयाला त्याची साथ असेल. 7तुम्ही
सर्वांनी परमेश्वराचे भय बाळगावे. तुम्ही जे काही कराल
ते सांभाळून काळजीपूर्वक करा कारण आपला परमेश्वर
देव न्यायी आहे. लोकांच्या बाबतीत तो पक्षपाती नाही.'
आणि लाच घेऊन न्याय फिरवणे हे ही त्याच्या नीतीत
बसत नाही."

8यानंतर यहोशाफाटने यरुशलेममध्ये काही परमेश्वराचे
लेवी, याजक तसेच इस्राएल घराण्यांतील वडीलधारी मंडळी
यांना न्यायाधीश म्हणून नेमले. परमेश्वराच्या नियमांना
अनुसरुन त्यांनी यरुशलेममधल्या रहिवाश्यांच्या वादांचा
निकाल लावायचा होता. 9यहोशाफाटने त्यांना आज्ञापूर्वक
सांगितले की, "परमेश्वराचे भय धरून विश्वसनीय रितीने
आणि मन:पूर्वक ही सेवा करा. 10वध, कायदा, नियम,
आज्ञा, किंवा एखादा न्याय यासंबंधी तुमच्याकडे वाद येतील.
हे वाद नगरात राहणाऱ्या तुमच्या बांधवांकडूनच उपस्थित
केले जातील. अशा सर्व बाबतीत प्रत्येक वेळी लोकांना
सांगा की त्यांनी परमेश्वराविरुध्द पाप करु नये. हे तुम्ही
निष्ठेने पार पाडले नाहीत तर तुमच्यावर आणि या तुमच्या
भाऊबंदांवर परमेश्वराचा कोप ओढवेल. एवढे करा म्हणजे
तुमच्या मनात अपराधभाव राहणार नाही. 11अमऱ्या हा
मुख्य याजक आहे. परमेश्वराच्या बाबतीतल्या सर्व
गोष्टींमध्ये त्याचे वर्चस्व राहील आणि इश्माएलचा मुलगा
जबद्या, राजाच्या बाबतीतल्या सर्व गोष्टीविषयी मुखत्यार
म्हणून नेमलेला आहे. जबद्या हा यहूदा वंशाचा
अधिकारी आहे. लेवी हे लेखनिक कारभारी म्हणून
तुमच्या दिमतीला आहेत. जे जे कराल ते धैर्याने करा.
उचित तेच करणाऱ्यांना परमेश्वराची साथ असो."

## यहोशाफाटवर युध्दाचा प्रसंग

20 यानंतर मवाबी, अम्मोनी आणि काही
मऊनीलोक युध्दाच्या हेतूने यहोशाफाटवर
चालून आले. 2काही लोकांनी येऊन यहोशाफाटला खबर
दिली की, "मृतसमुद्राच्या पलीकडून अराम देशाकडून
मोठी सेना तुमच्यावर चाल करून येत आहे. ती
हससोन-तामार!" (म्हणजेच एन-गेदी येथे येऊन ठेपली
सुध्दा.) 3यहोशाफाट घाबरला आणि त्याने याबाबतीत
परमेश्वराला काय करावे विचारायचे ठरवले. त्याने
यहूदामध्ये सर्वांसाठी उपवासाची घोषणा केली. 4तेव्हा
यहूदातून, यहूदाच्या सर्व नगरांमधून लोक यहूदाच्या
साहाय्याची परमेश्वराकडे याचना करायला जमले.

5यहोशाफाट परमेश्वराच्या मंदिरात नवीन अंगणासमोर
होता. यहूदा आणि यरुशलेमच्या लोकांमध्ये तो उभा
राहिला. 6तो म्हणाला,

"आमच्या पूर्वजांच्या परमेश्वर देवा, स्वर्गातील परमेश्वर
तूच आहेस. सर्व राष्ट्रांमधल्या सर्व राज्यांचा तूच शास्ता
आहेस. सगळे सामर्थ्य आणि सत्ता तुझ्या ठायी आहे. कोणीही
तुझ्याविरुध्द जाऊ शकत नाही. 7तूच आमचा परमेश्वर
आहेस या प्रदेशातील रहिवाश्यांना तू हाकलून लावलेस.
तुझ्या या इस्राएलांदेखतच तू हे केलेस. तुझा मित्र अब्राहाम
याच्या वंशजांना तू ही भूमी कायमची बहाल केलीस.
8अब्राहामाचे वंशज या प्रदेशात राहिले आणि तुझ्या

नावाखातर त्यांनी मंदिर बांधले. 9ते म्हणाले, 'तलवार, शासन, रोगराई किंवा दुष्काळ यांच्यारुपाने आमच्यावर अरिष्ट कोसळले असता आम्ही या मंदिरासमोर, आणि तुझ्यापुढे उभे राहू. या मंदिराला तुझे नाव दिले आहे. संकटाच्या वेळी आम्ही तुझा मोठ्याने धावा करु. आमची हाक ऐकून तू आम्हाला सोडव.'

10"पण यावेळी अम्मोन, मवाब आणि सेइर पर्वत या भागातले हे लोक आहेत. इस्राएल लोक मिसरहून आले तेव्हा इस्राएल लोकांना तू त्यांच्या प्रदेशात प्रवेश करु दिला नाहीस. त्यामुळे इस्राएल लोकांनी तिकडे पाठ फिरवली आणि त्यांचे उच्चाटन केले नाही. 11पण तेव्हाच त्यांचा नायनाट न केल्याचे हे काय फळ मिळाले पाहा, ते आम्हाला आमच्या प्रदेशातून हुसकावून लावायला निघाले आहेत. हा प्रदेश तू आम्हाला बहाल केला आहेस.

12"देवा, या लोकांना चांगले शासन कर. आमच्यावर चाल करून येणाऱ्या या भल्या थोरल्या सेनेला तोंड द्यायचे सामर्थ्य आमच्यात नाही. आम्हाला काही सुचेनासे झाले आहे. म्हणून आम्ही मदतीसाठी तुझ्याकडे आलो आहोत."

13यहूदातील सर्व मंडळी आपल्या बायका आणि तान्ह्या मुलांसकट सर्व मुलाबाळांना घेऊन परमेश्वरासमोर उभी होती. 14तेव्हा यहजीएल याच्यात परमेश्वराच्या आत्म्याचा संचार झाला. यहजीएल हा जखऱ्याचा मुलगा. जखऱ्या बनायाचा मुलगा. बनाया यईएलचा मुलगा. आणि यईएल मत्तन्याचा मुलगा. यहजीएल लेवी असून आसाफच्या वंशातला होता. या सभेत 15यहजीएल म्हणाला, "राजा यहोशाफाट, तसेच यहूदा आणि यरुशलेममधील रहिवाश्यांनो, मी काय म्हणतो ते ऐका. परमेश्वराचा संदेश असा आहे. 'एवढी मोठी सेना पाहून घाबरुन जाऊ नका किंवा काळजी करु नका. हे युध्द तुमचे नव्हे तर परमेश्वराचे युध्द आहे. 16उद्या त्यांचा सामना करायला जा आणि लढा. ते सीसच्या खिंडीतून वर येत आहेत. दरीच्या टोकाला यरुएल वाळवंटाच्या दुसऱ्या बाजूला तुमची त्यांच्याशी गाठ पडेल.

17तुम्हाला या लढाईत लढावे असे लागणारच नाही. आपल्या जागी ठाम उभे राहा. परमेश्वराने तुमचे रक्षण केलेले तुम्हाला आढळून येईल. यहूदा आणि यरुशलेम लोक हो, भिऊ नका, चिंता करु नका. परमेश्वर तुमच्या बरोबर आहे. तेव्हा उद्या त्यांच्यावर चालून जा.'"

18यहोशाफाटने मस्तक भूमीपर्यंत लववले. यहूदा आणि यरुशलेममधील सर्व लोक यांनी परमेश्वरापुढे दंडवत घातले. त्या सर्वांनी परमेश्वराची आराधना केली. 19कहाथ आणि कोरह या घराण्यांतील लेवी इस्राएलच्या परमेश्वर देवाची भजने म्हणण्यास उभे राहिले. उच्च स्वरात त्यांनी परमेश्वराची भजने म्हटली. 20यहोशाफाटचे सैन्य भल्यासकाळी तकोवाच्या वाळवंटात गेले. ते निघत असताना यहोशाफाट समोर उभा राहून त्यांना म्हणाला, "यहूदा आणि यरुशलेम नगरांमधील लोकहो, ऐका. आपल्या परमेश्वर देवावर श्रध्दा ठेवा आणि खंबीरपणे उभे राहा. परमेश्वराच्या संदेष्ट्यांवर विश्वास ठेवा. जय तुमचाच आहे."

21यहोशाफाटने लोकांना प्रोत्साहन दिले व सुचना दिल्या. परमेश्वराचे स्तवन करणारी माणसे त्याने निवडली. परमेश्वर पवित्र आणि कल्याणकारी आहे म्हणून त्याचे स्तवन करण्यासाठी त्याने या गायकांना नेमले. त्यानी सैन्यासमोर उभे राहून स्तुतिगीते म्हटली. ते म्हणाले, "परमेश्वराचे स्तवन करा कारण त्याची प्रीति सर्वकाळ आहे." 22लोकांनी देवाची स्तुतिगीते म्हणण्यास सुरुवात केल्याबरोबर परमेश्वराने चाल करून आलेल्या अम्मोनी, मवाबी आणि सेइर पर्वतांतील लोकांशी गनिमी काव्याने लढणारी फौज मोक्याच्या जागी बसवली. 23अम्मोनी आणि मवाबी लोक सेइर पर्वतातल्या लोकांशी लढू लागले. अम्मोन्यांनी आणि मवाब्यांनी त्यांचा पुरता संहार केला. सेइरातल्या लोकांचा बीमोड केल्यानंतर त्यांनी एकमेकांचा नाश केला.

24यहूदा लोक वाळवंटातील टेहळणीच्या बुरुजापाशी आले. शत्रूचे विशाल सैन्य कुठे दिसते का हे ते पाहू लागले पण त्यांना फक्त जमिनीवर विखुरलेले मृतदेह तेवढे दिसले. कोणीही जिवंत राहिला नव्हता. 25यहोशाफाट आणि त्याचे सैन्य लुटीसाठी मृतदेहांपाशी आले. त्यात त्यांना खूप गुरेढोरे, धन, कपडेलत्ता आणि मौल्यवान वस्तू मिळाल्या. त्या त्यांनी स्वत:ला घेतल्या. लूट एवढी होती की ती यहोशाफाट आणि त्याचे लोक यांना नेता येईना. ती प्रेतांमधून काढून न्यायला त्यांना तीन दिवस लागले.

26चौथ्या दिवशी यहोशाफाट आणि त्याचे सैन्य बराखच्या खोऱ्यात जमले. याठिकाणी त्यांनी परमेश्वरला, धन्यवाद दिले. म्हणून आजही या खोऱ्याचे नाव "आशीर्वादाचे खोरे" असे आहे.

27मग यहोशाफाटने समस्त यहूदा आणि यरुशलेम लोकांना यरुशलेम येथे माघारे नेले. परमेश्वराने त्यांच्या शत्रूचा पाडाव केल्यामुळे त्यांच्यात आनंदीआनंद पसरला होता. 28यरुशलेमला येऊन ते सतारी, वीणा व कर्णे घेऊन परमेश्वराच्या मंदिरात गेले. 29परमेश्वराने इस्राएलच्या शत्रु सैन्याशी लढा दिला हे ऐकून सर्व देशांमधल्या सर्व राज्यांमध्ये परमेश्वराविषयी धाक निर्माण झाला. 30त्यामुळे यहोशाफाटच्या राज्यात शांतता नांदली. देवाने यहोशाफाटला सर्व बाजूंनी स्वास्थ्य दिले.

## यहोशाफाटच्या कारकीर्दीचा अस्त

31यहोशाफाटने यहूदा देशावर राज्य केले. राज्यावर आला तेव्हा तो पस्तीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेमवर पंचवीस वर्षे राज्य केले. यहोशाफाटच्या आईचे नाव अजूबा ही शिल्हीची मुलगी. 32आपले वडील आसा यांच्याप्रमाणेच

यहोशाफाट योग्य मार्गाने वागला. तो मार्ग त्याने सोडला नाही. परमेश्वराच्या दृष्टीने भले तेच यहोशाफाटने केले. 33पण उच्चस्थाने काढण्यात आली नव्हती. लोकांनीही आपले मन आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराकडे वळवले नव्हते.

34“हनानीचा पुत्र येहू याच्या बखरीमध्ये यहोशाफाटच्या बाकीच्या कृत्यांची साद्यंत नोंद आहे. ‘इस्राएलच्या राजांचा इतिहास’ या ग्रंथातही या गोष्टींचा समावेश करून त्यांची नोंद केली आहे. 35इस्राएलचा राजा अहज्या याच्याशी पुढे यहूदाचा राजा यहोशाफाट याने करार केला. यहोशाफाट ने हे वाईट केले.

36तार्शीश नगराला जायच्या गलबतांबद्दल हा करार होता. एसयोन-गेबर येथे त्यांनी या गलबतांची बांधणी केली. 37पुढे अलियेजर ने यहोशाफाटविरुध्द भविष्य सांगितले. मारेशा नगरातला दोदावाहू याचा अलियेजर हा मुलगा. तो म्हणाला, “यहोशाफाट, तू अहज्याशी हातमिळवणी केलीस म्हणून परमेश्वर तुझ्या कामांचा विध्वंस करील.” आणि जहाजे फुटली. त्यामुळे यहोशाफाट आणि अहज्या यांना ती तार्शीशला पाठवता आली नाहीत.

21 पुढे यहोशाफाट वारला. त्याचे त्याच्या पूर्वजांजवळ दफन केले. दावीद नगरात त्याला पुरले. यहोशाफाटच्या जागी त्याचा मुलगा यहोराम गादीवर बसला. 2अजऱ्या, यहीएल, जखऱ्या, अजऱ्या, मीखाएल व शफट्या हे यहोरामचे भाऊ, व यहोशाफाटचे मुलगे. यहोशाफाट हा यहूदाचा राजा होता. 3यहोशाफाटने आपल्या मुलांना यहूदातील तटबंदीच्या नगरांखेरीज सोन्या–रुप्याच्या आणि अन्य किंमती वस्तू भेटीदाखल दिल्या. यहोराम मात्र ज्येष्ठ पुत्र असल्यामुळे त्याला त्याने राज्य दिले.

## यहूदाचा राजा यहोराम

4यहोराम आपल्या वडीलांच्या जागी गादीवर आला आणि सत्ताधीश बनला. त्याने आपल्या सर्व भावांचा तसेच इस्राएलमधील काही वडीलधाऱ्यांचा तलवारीने वध केला. 5वयाच्या बत्तिसाव्या वर्षी सत्तेवर येऊन यहोरामने यरुशलेममध्ये आठ वर्षे राज्य केले. 6अहाबच्या घराण्याप्रमाणे, इस्राएलच्या राजांच्या राहणीला अनुसरुनच याचे वागणे होते. कारण अहाबाच्या मुलीशी यहोरामने लग्न केले होते. परमेश्वराच्या दृष्टीने वाईट अशा गोष्टी त्याने केल्या. 7पण परमेश्वराने दावीदाला वचन दिलेले असल्यामुळे परमेश्वर दावीदाच्या घराण्याचे उच्चाटन करु शकत नव्हता. दावीदाच्या वंशाचा दिवा सतत तेवत राहील असा परमेश्वराने दावीदाशी करार केला होता.

8यहोरामच्या कारकीर्दीत अदोमने यहूदाच्या सत्तेविरुध्द बंड पुकारले. अदोमच्या लोकांनी स्वत: आपला राजा निवडला. 9तेव्हा आपले सर्व सेनापती आणि रथ यांच्यासह यहोराम अदोमवर चाल करून गेला. अदोमी सैन्याने त्यांना वेढा घातला. पण यहोरामने रात्रीची वेळ साधून त्यांच्यावर प्रतिहल्ला केला. 10तेव्हा पासून आजतागायत अदोमची यहूदाशी बंडखोरी चालू राहिली आहे. लिब्ना नगरातील लोकांनीही यहोरामची सत्ता झुगारली. यहोरामने आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याचा त्याग केल्यामुळे असे झाले. 11यहोरामने यहूदातील पहाडांवर प्रार्थनेसाठी उच्चस्थाने बांधली. असे करण्याने, परमेश्वराला लोकांनी जसे वागावे असे वाटत होते त्यात खंड पडला. यहोरामने यहूदा लोकांना परमेश्वरापासून दूर नेले.

12एलीया या संदेष्ट्याकडून यहोरामला असा संदेश आला: “परमेश्वर देवाने असे सांगितले आहे. तुझे पूर्वज दावीद यांचा हा परमेश्वर आहे, परमेश्वर म्हणतो, ‘यहोराम, तुझे आचरण आपले वडील यहोशाफाट यांच्या सारखे नाही. यहूदाचा राजा आसा याच्यासारखे तुझे वर्तन नाही. 13उलट तू इस्राएलच्या राजांचा कित्ता गिरवला आहेस. यहूदा आणि यरुशलेममधील लोकांना तू परमेश्वराच्या इच्छेविरुध्द वागायला लावले आहेस. अहाब आणि त्याचे घराणे यांनी हेच केले. ते परमेश्वराशी एकनिष्ठ राहिले नाहीत. तू स्वत:च्या भावांची हत्या केलीस. ते तुझ्यापेक्षा वर्तणुकीने चांगले होते. 14तेव्हा परमेश्वर आता तुझ्या लोकांना जबर शासन करणार आहे. तुझी मुले, बायका, मालमत्ता यांना परमेश्वर शिक्षा करणार आहे. 15तुला आतड्यांचा भयंकर आजार होईल आणि तो दिवसे दिवस बळावेल. त्यात तुझी आतडी बाहेर पडतील.’”

16कूशी लोकांच्या शेजारचे अरब आणि पलिष्टी लोक यांना परमेश्वराने यहोरामविरुध्द भडकावले. 17या लोकांनी यहूदावर स्वारी केली आणि त्यांनी राजाच्या महालातली सगळी घनदौलत लुटून नेली. यहोरामच्या बायकामुलांनाही त्यानी पळवले. फक्त यहोआहाज हा सगळ्यात धाकटा मुलगा तेवढा बचावला.

18या सगळ्या घडामोडींनंतर परमेश्वराने यहोरामला आतड्यांच्या असाध्य अशा रोगाने आजारी केले. 19त्या आजारात दोन वर्षांनी त्याची आतडी बाहेर आली. असह्य वेदना होऊन तो मरण पावला. लोकांनी त्याच्या वडलांच्या सन्मानार्थ जसा मोठा अग्नी पेटवला होता तसा यहोरामच्या सन्मानार्थ पेटवला नाही. 20यहोराम सत्तेवर आला तेव्हा बत्तीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये आठ वर्षे राज्य केले. त्याच्या मृत्यूचे कोणालाही दु:ख झाले नाही. लोकांनी दावीदनगरातच त्याचे दफन केले, पण राजासाठी असलेल्या कबरीत नव्हे.

## यहूदाचा राजा अहज्या

22 यहोरामच्या जागी यरुशलेमच्या लोकांनी यहोरामचा सर्वांत धाकटा मुलगा अहज्या याला राजा केले. यहोरामच्या छावणीवर हल्ला करायला आलेल्या अरबांबरोबर जे लोक आले होते त्यांनी

यहोरामच्या इतर सर्व थोरल्या मुलांना मारून टाकल्यामुळे
यहूदात अहज्या राज्य करु लागला. 2त्यावेळी तो बावीस
वर्षांचा होता. त्याने यरुशलेमवर एक वर्ष राज्य केले.
त्याच्या आईचे नाव अथल्या. तिच्या वडलांचे नाव अम्री.
3अहज्याची वागणूकही अहाबच्या घराण्याप्रमाणेच होती.
कारण अहज्याच्या आईने त्याला दुराचरण करण्यास प्रवृत्त
केले. 4अहाबच्या कुटुंबियांनी केले तसेच, परमेश्वराला
मान्य नसलेले पापाचरण अहज्याने केले. अहज्याच्या
वडलांच्या मृत्यूनंतर अहाबच्या घराण्याने त्याला सल्ला
द्यायला सुरूवात केली. त्याचे हे सल्ले अहज्याच्या भल्याचे
नव्हते. बदसल्ल्यामुळेच त्याचा मृत्यू ओढवला. 5अहाब
कुटुंबाच्या मसलतीनुसार अहज्या राजा योरामच्या बरोबर
अरामचा राजा हजाएल याच्याशी लढण्यास रामोथ-गिलाद
येथे गेला. योराम हा इस्राएलचा राजा अहाब याचा मुलगा.
योराम या लढाईत अराम्यांकडून जायबंदी झाला. 6तेव्हा
तो दुखण्याला उतार पडावा यासाठी इज्रेल येथे परतला.
रामोथ येथे अरामचा राजा हजाएल याच्याशी लढताना तो
घायाळ झाला होता. योरामला भेटायला म्हणून अहज्या
इज्रेल येथे गेला. यहूदाचा राजा यहोराम याचा अहज्या हा
मुलगा. योरामच्या वडलांचे नाव अहाब. दुखापतीमुळे तो
इज्रेला आला होता.

7अहज्या (किंवा यहोआहाज) योरामला भेटायला
आलेला असतांना परमेश्वराने अहज्याला मृत्युमुखी
धाडले. त्याचे असे झाले की आल्याबरोबर अहज्या
योरामबरोबर निमशीचा मुलगा येहू याला भेटायला गेला.
अहाबच्या घराण्याच्या नाशासाठी परमेश्वराने येहूची
योजना केली होती. 8अहाबच्या घराण्याला शासन
करीत असता येहूला यहूदाचे सरदार आणि अहज्याच्या
सेवेत असलेले अहज्याचे आप्त आढळले. त्या सरदारांना
आणि आप्तांना येहूने ठार केले. 9यानंतर येहूने अहज्याचा
शोध घेतला. येहूच्या माणसांनी त्याला तो शोमरोनमध्ये
लपायच्या प्रयत्नात असताना पकडले. अहज्याला त्यांनी
येहूसमोर हजर केले, नंतर त्यांनी त्याला ठार केले आणि
त्यांनी त्याचे दफन केले. ते म्हणाले, "अहज्या हा
यहोशाफाटचा वारस. यहोशाफाट जिवाभावाने
परमेश्वराला शरण गेला होता." यहूदाचे राज्य
सांभाळण्याइतके अहज्याचे घराणे समर्थ राहिले नव्हते.

## राणी अथल्या

10अथल्या ही अहज्याची आई. तिने आपला मुलगा
मरण पावला आहे हे पाहिल्यावर यहूदाच्या सर्व राजवंशाचा
संहार केला. 11पण यहोशबाथ हिने अहज्याचा मुलगा
योवाश याला लपवले. योवाश आणि त्याची दाई यांना
तिने आतल्या शयनगृहात ठेवले. यहोशबाथ ही राजा
यहोरामची मुलगी आणि यहोयादा या याजकाची पत्नी.
अहज्या तिचा भाऊ यहोशबाथने योवाशला लपवल्यामुळे
अथल्या त्याला मारू शकली नाही. 12परमेश्वराच्या
मंदिरात त्याला याजकांच्या सहवासात सहा वर्षे लपवून
ठेवले होते. या काळात अथल्याने राणी म्हणून अंमल
चालवला.

## संदेष्टा यहोयादा आणि राजा योवाश

23 यहोयादाने सहा वर्षांनंतर आपले सामर्थ्य
दाखवले. त्याने यरोहामचा मुलगा अजऱ्या
यहोहानानचा मुलगा इश्माएल, ओबेदचा मुलगा अजऱ्या,
अदायाचा मुलगा मासेया आणि जिक्रीचा मुलगा
अलीशाफाट या मुख्य अधिकाऱ्यांशी करार केला. 2त्यांनी
यहूदाभर फिरुन यहूदात विखुरलेल्या लेवींना आणि
इस्राएलच्या कुलप्रमुखांना एकत्र आणले. मग ते सर्व
यरुशलेम येथे गेले. 3तेथे देवाच्या मंदिरात सर्व समुदायाने
राजाशी करार केला.

यहोयादा या लोकांना म्हणाला, "परमेश्वर दावीदाच्या
संततीविषयी जे बोलला आहे त्याला अनुसरुन राजाचा
मुलगा गादीवर येईल. 4आता तुम्ही करायचे ते असे:
तुमच्यापैकी जे एक तृतीयांश याजक आणि लेवी
शब्बाथच्या दिवशी कामाला येतात त्यांनी मंदिरावर पहारा
करावा. 5एकतृतीयांश लोकांनी राजमहालावर पहारा
करावा, आणि उरलेल्या एकतृतीयांश लोकांनी वेशीपाशी
असावे. यांच्याखेरीज बाकी सर्व लोकांनी परमेश्वराच्या
मंदिराच्या आवारात राहावे. 6कोणालाही परमेश्वराच्या
मंदिरात येऊ देऊ नये. सेवा करणारे याजक आणि लेवी
यांनाच काय ते परमेश्वराच्या मंदिराच्या आत येता येईल
कारण ते शुचिर्भूत असतात. पण इतरांनी परमेश्वराने
नेमून दिलेली आपापली कामे करायची आहेत. 7लेवींनी
राजाच्या निकट राहायचे. प्रत्येकाजवळ आपली तलवार
सज्ज असावी. कोणी मंदिरात घुसायचा प्रयत्न केल्यास
त्याला ठार करावे. सर्वांनी राजाची सावलीसारखी सोबत
करावी."

8लेवी आणि यहूदा या सर्व लोकांनी यहोयादा या याजकाने
ज्या आज्ञा केल्या त्या सर्वांचे पालन केले. यहोयादाने
याजकांपैकी कोणाचीही गय केली नाही. त्यामुळे
शब्बाथच्या दिवशी आळीपाळीने आत येणाऱ्या व
कामावरुन बाहेर जाणाऱ्या सर्वांची व्यवस्था केली. 9दावीद
राजाचे भाले, छोट्या ढाली आणि मोठ्या ढाली ही शस्त्रे
देवाच्या मंदिरामध्ये ठेवलेली होती. यहोयादा याजकाने
शंभर सैनिकांच्या तुकड्यांच्या प्रमुखांना त्या दिल्या. 10आणि
त्यांनी कुठे, कसे उभे राहायचे ते सांगितले. प्रत्येकाजवळ
आपापले शस्त्र होते. मंदिराच्या थेट उजव्या कोपऱ्यापासून
डाव्या बाजूपर्यंत ही शस्त्रधारी माणसे उभी राहिली. वेदी,
मंदिर आणि राजा यांच्याजवळ ती उभी होतीच. 11मग
त्यांनी राजपुत्राला बाहेर आणले आणि त्याच्या मस्तकावर
मुगुट चढवला. त्याच्या हाती आज्ञापट दिला. योवाशला
त्यांनी राजा केले. यहोयादा आणि त्याची मुले यांनी त्याला

अभिषेक केला. "राजा चिरायु होवो" असे ते सर्वजण
म्हणाले.
12मंदिराकडे लगबगीने जाणाऱ्या लोकांचा गलका आणि
राजाचा जयजयकार अथल्याने ऐकला. तेव्हा ती मंदिरात
लोकांकडे आली. 13पाहते तो तिला राजा दिसला.
प्रवेशद्वाराशी तो राजस्तंभाजवळ उभा होता. कर्णे वाजवणारे
कारभारी आणि लोक राजा जवळ उभे होते. देशभरचे
लोक कर्णे वाजवून आनंद व्यक्त करत होते. गाणारे वाद्ये
वाजवत होते आणि त्यांनी म्हटलेल्या स्तवनगीतापाठोपाठ
लोक म्हणत होते. तेव्हा आपली तीव्र नापसंती
दाखवण्यासाठी अथल्याने आपले कपडे फाडले आणि
"फितुरी, फितुरी" असे ती ओरडली.
14याजक यहोयादा याने सेनापतींना पुढे आणले. त्यांना
तो म्हणाला, "तिला सैन्याच्या रांगांमधून बाहेर काढा.
तिच्या मागे जो जाईल त्याला तलवारीने मारून टाका."
मग याजकाने सैन्याला आज्ञा दिली, "परमेश्वराच्या मंदिरात
अथल्याचा वध करु नका." 15राजमहालाच्या
घोडावेशीजवळ अथल्या पोचताच सैनिकांनी तिला पकडले
आणि त्याठिकाणी तिला जिवे मारले.
16यहोयादाने मग सर्व लोक आणि राजा यांच्याबरोबर
एक करार केला. आपण सर्व परमेश्वराचे लोक आहोत
असा तो करार होता. 17मग सर्वजण बआल देवतेच्या
मंदिरात गेले आणि त्या मूर्तीची त्यांनी नासधूस केली.
तिथल्या इतर मूर्ती आणि वेदीदेखील मोडून तोडून टाकल्या.
बआलच्या वेदीपुढेच त्यांनी बआलचा याजक मत्तान याला
ठार केले. 18यहोयादाने मग परमेश्वराच्या मंदिरातील
याजकांची नेमणूक केली. हे याजक लेवी होते आणि
दावीदाने त्यांना मंदिराचे मुखत्यारपद दिले होते. मोशेच्या
नियमशास्त्राप्रमाणे परमेश्वराला होमबली अर्पण करणे,
हे त्यांचे काम होते. दावीदाच्या आज्ञेनुसार आनंदाने गायन
करत त्यांनी होमबली अर्पण केले. 19सर्वार्थाने
शुध्द-शुचिर्भूत होऊनच मंदिरात यावे, तसे नसणाऱ्याना
अडवले जावे म्हणून यहोयादाने परमेश्वराच्या मंदिराच्या
प्रवेशद्वाराशीच द्वारपाल नेमले.
20सर्व सैन्याधिकारी, लोकनायक, सरदार आणि सर्व
प्रजा यांना यहोयादाने आपल्याबरोबर घेतले. मग त्याने
राजाला परमेश्वराच्या मंदिराबाहेर काढले. तिथून वरच्या
वेशीतून ते राजमहालात पोचले. तेथे त्यांनी राजाला
सिंहासनावर बसवले. 21अथल्याचा तलवारीने वध झाला
त्या नंतर यहूदा लोकांमध्ये आनंदी आनंद पसरला आणि
यरुशलेम नगर शांत झाले.

## योवाशकडून मंदिराची पुनर्बांधणी

24 योवाश राजा झाला तेव्हा सात वर्षांचा होता.
त्याने यरुशलेममध्ये चाळीस वर्षे राज्य केले.
त्याच्या आईचे नाव सिब्या. ही बैर-शेबा नगरातली होती.
2यहोयादा हयात असेपर्यंत योवाशची वागणूक
परमेश्वराच्या दृष्टीने उचित अशी होती. 3यहोयादाने
योवाशला दोन बायका करून दिल्या. त्याला मुले बाळे
झाली.
4पुढे योवाशने परमेश्वराच्या मंदिराची पुन्हा उभारणी
करण्याचे ठरवले. 5तेव्हा त्याने याजक आणि लेवी यांना
बोलवून घेतले आणि त्यांना तो म्हणाला, "यहूदामधील
सर्व गावांमध्ये जा आणि इस्राएल लोकांकडून वार्षिक
कर गोळा करा. त्या पैशातून देवाच्या मंदिराच्या दुरुस्तीचे
काम हाती घ्या. या कामाला विलंब लावू नका." पण
लेवींनी याबाबतीत तत्परता दाखवली नाही.
6तेव्हा राजा योवाशने मुख्य याजक यहोयादा याला
बोलावून घेतले आणि विचारले की, "लेवींना तू यहूदा
आणि यरुशलेममधून कर गोळा करायला का लावले
नाहीस? परमेश्वराचा सेवक मोशे आणि इस्राएली लोक
यांनी हा कर पवित्र सभामंडपासाठी म्हणून वापरलेला
आहे."
7पूर्वी अथल्याच्या मुलांनी देवाच्या मंदिरात घुसून
तिथल्या पवित्र वस्तू बाल दैवतांच्या पूजेसाठी वापरल्या
होत्या. अथल्या ही एक दुष्ट बाई होती.
8राजा योवाशच्या आज्ञेवरुन एक पेटी तयार करून ती
परमेश्वराच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराशी ठेवण्यात आली.
9लेवींनी मग यहूदा यरुशलेममध्ये दवंडी पिटली.
परमेश्वरासाठी बसवलेला कर भरायला त्यांनी लोकांना
सांगितले. इस्राएल लोक वाळवंटात असताना परमेश्वराचा
सेवक मोशे याने तो इस्राएल लोकांवर बसवला होता.
10तेव्हा अधिकाऱ्यांनी आणि लोकांनी मोठ्या आनंदाने
कर आणून पेटीत जमा केला. पेटी भरेपर्यंत ते पैसे देत
गेले.
11लेवी पेटी भरली की राजाच्या कारभाऱ्यांकडे जमा
करत. पैशाने भरलेली ती पेटी पाहून राजाचे सचिव आणि
मुख्य याजकाचा कारभारी येऊन त्यातले पैसे काढून
घेत. पेटी पुन्हा पहिल्या जागी नेऊन ठेवली जाई. असे
अनेकदा होऊन मुबलक पैसा जमा झाला. 12राजा योवाश
आणि यहोयादा यांनी मग ही रक्कम परमेश्वराच्या मंदिराचे
काम करणाऱ्यांच्या हवाली केली. या लोकांनी
परमेश्वराच्या मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी कसबी सुतार,
कोरीव काम करणारे, लोखंड पितळ या धातूंमध्ये काम
करणारे कारागीर यांना मजुरीवर कामाला घेतले.
13या कामावर देखरेख करणारे लोक अतिशय विश्वासू
होते. परमेश्वराच्या मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम पूर्ण
झाले. देवाचे मंदिर पुन्हा पूर्वीसारखेच नीटनेटके आणि
पहिल्यापेक्षा भक्कम झाले. 14कारागिरांचे काम
आटोपल्यावर उरलेली रक्कम त्यांनी योवाश आणि
यहोयादा यांना आणून दिली. त्या पैशातून परमेश्वराच्या
मंदिरातील सेवेची उपकारणे आणि होमबलीसाठी
वापरायची पात्रे बनविण्यात आली. त्यानी याशिवाय
सोन्यारुप्याचे कटोरे व इतर पात्रे केली. या परमेश्वराच्या

मंदिरात यहोयादाचे आयुष्य असे तोवर याजक दररोज होमबली अर्पण करत असत.

15पुढे यहोयादा वयोवृध्द झाला. तो दीर्घायुषी होऊन वारला. मृत्युसमयी त्याचे वय 130 वर्षे इतके होते. 16दावीदनगरात इतर राजांच्या कबरी शेजारीच त्याचे लोकांनी दफन केले. देवासाठी आणि त्याच्या मंदिरासाठी त्याने इम्राएलमध्ये बऱ्याच चांगल्या गोष्टी आपल्या हयातीत केल्या म्हणून लोकांनी त्याचे या ठिकाणी दफन केले.

17यहोयादा मरण पावल्यावर यहूदाच्या सरदारांनी राजा योवाशला येऊन मुजरा केला. राजाने त्यांचे ऐकून घेतले. 18पुढे राजा आणि हे सरदार यांनी परमेश्वर देवाच्या मंदिराचा त्याग केला. त्यांचे पूर्वज या परमेश्वर देवाला शरण गेले होते पण यांनी अशेरा देवीचे खांब आणि इतर मूर्ती यांची पूजा सुरु केली. राजा आणि सरदार यांच्या या अपराधांमुळे यहूदा आणि यरुशलेमच्या लोकांवर देवाचा कोप झाला. 19लोकांना परत आपल्याकडे वळवायला परमेश्वराने त्यांच्याकडे संदेष्ट्यांना पाठवले. संदेष्ट्यांनी लोकांना परमेश्वराच्या क्रोधाची पूर्वकल्पना दिली पण लोक ऐकेनात.

20तेव्हा जखऱ्यामध्ये परमेश्वराच्या आत्म्याचा संचार झाला. जखऱ्या हा यहोयादा या याजकाचा मुलगा. जखऱ्या लोकांपुढे उभा राहून म्हणाला, "देव म्हणतो, 'तुम्ही परमेश्वराच्या आज्ञांचे उल्लंघन का करता? तुम्हाला यश येणार नाही. तुम्ही परमेश्वराचा त्याग केलात. आता परमेश्वरही तुम्हाला सोडून देत आहे.'"

21पण लोकांनी जखऱ्याविरुध्द कट केला. राजाने लोकांना जखऱ्याचा वध करण्याचा हुकूम दिला. तेव्हा लोकांनी त्याला दगडफेक करून मारले. हे त्यांनी मंदिराच्या आवारातच केले. 22जखऱ्याचे वडील यहोयादा यांनी दाखवलेले सौजन्य राजा योवाश विसरला. यहोयादाच्या मुलाला जखऱ्याला राजाने ठार केले. जखऱ्या मृत्यूपूर्वी म्हणाला, "हे पाहून परमेश्वर तुला शासन करो."

23वर्ष अखेरीला अरामच्या सैन्याने योवाशवर हल्ला केला. यहूदा आणि यरुशलेमवर हल्ला करून त्यांनी सर्व सरदारांची हत्या केली. तेथील सर्व धन लुटून त्यांनी ते दिमिष्काच्या राजाकडे पाठवले. 24अराम्यांच्या सैन्यात फार थोडे लोक होते तरी यहूदाच्या मोठ्या सेनेवर परमेश्वराने त्यांना विजय मिळवून दिला. आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याचा यहूदा लोकांनी त्याग केल्यामुळे परमेश्वराने योवाशला हे शासन केले. 25अरामी योवाशला घायाळ अवस्थेत सोडून गेले तेव्हा योवाशच्या सेवकांनीच त्याच्याविरुध्द कट केला. यहोयादा या याजकाच्या मुलाला, जखऱ्याला योवाशने मारल्यामुळे ते या कारस्थानाला प्रवृत्त झाले. योवाशला त्यांनी त्याच्या शय्येवरच ठार केले. दावीदनगरात लोकांनी त्याला मूठमाती दिली. पण राजांच्या दफन भूमीत त्याचे दफन केले नाही. 26जाबाद आणि यहोजाबाद हे ते फितूर सेवक. जाबादच्या आईचे नाव शिमथ. ही अम्मोनची होती. यहोजाबादच्या आईचे नाव शिम्रिथ. ही मवाब येथील होती. 27योवाशचे पुत्र, त्याला सांगितलेली मोठी शिक्षा आणि त्याने केलेला देवाच्या मंदिराचा जीर्णोध्दार याविषयी राजांच्या बखरीत (राजाविषयी) लिहिले गेले आहे. योवाशचा मुलगा अमस्या हा त्याच्यानंतर राजा झाला.

## यहूदाचा राजा अमस्या

25 अमस्या राजा झाला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता. नंतर त्याने यरुशलेममध्ये एकोणतीस वर्षे राज्य केले. याच्या आईचे नाव यहोअदान. ती यरुशलेमची होती. 2त्याची वर्तणूक परमेश्वराला पटेल अशी होती पण त्यात मन:पूर्वकता नव्हती. 3अमस्या शक्तिशाली राजा झाला मग त्याने आपल्या वडलांच्या मारेकऱ्यांची हत्या केली. 4पण त्याच्या मुलांना त्याने ठार केले नाही कारण याबाबतीत मोशेच्या नियमशास्त्रातली आज्ञा त्याने पाळली. परमेश्वराची आज्ञा अशी आहे, "मुलांच्या अपराधासाठी आईवडलांना आणि आईवडलांच्या अपराधासाठी मुलांना मृत्युदंड देऊ नये. ज्याच्या हातून अपराध झाला त्या व्यक्तीलाच देहदंड व्हावा."

5अमस्याने सर्व यहूदा लोकांना एकत्र केले आणि त्यांच्या घराण्यांवर सेनापती आणि सेनानायक यांच्या नेमणुका केल्या. समस्त यहूदा आणि बन्यामिन सैनिकांवर या प्रमुखांचा अंमल होता. युध्दात भाग घेण्यासाठी वय वर्षे किमान वीस आणि त्यापुढील वयाचे सैनिक निवडले. भाले आणि ढाली या आयुधांनी सज्ज असे सैनिक त्याने मोजले. ते एकंदर 3,00,000 निवडक सैनिक युध्दाला तयार होते. 6यांच्याखेरीज आणखी 1लक्ष सैन्याची कुमक अमस्याने इम्राएलकडून मागवली. त्यासाठी त्याने 3 3/4 टन चांदी एवढी किंमत मोजली. 7पण यावेळी देवाचा एक माणूस अमस्याकडे येऊन त्याला म्हणाला, "हे राजा, इम्राएलच्या सैन्याला आपल्याबरोबर घेऊ नकोस. एफ्राइमच्या वंशजांना म्हणजेच इम्राएलच्या लोकांना परमेश्वराची साथ नाही. 8तू भले कितीही तयारी करून लढाईत उतरलास तरी तुझा जय पराजय होणे देवाच्याच हातात आहे."

9यावर अमस्या त्या देवाच्या माणसाला म्हणाला, "पण इम्राएली सैन्याला मी पैसे देऊन बसलो आहे, त्याचे काय?" देवाचा माणूस म्हणाला, "परमेश्वराकडे अलोट संपत्ती आहे, तो तुला त्यापेक्षा कितीतरी जास्त देऊ शकेल."

10तेव्हा अमस्याने इम्राएलच्या सैन्याला एफ्राइमला परत पाठवले. या कृत्यामुळे इम्राएली सैन्य, यहुदाचा राजा आणि यहूदाचे लोक यांच्यावर संतापले आणि रागानेच घरी परतले.

11यानंतर अमस्याने मोठेच धाडस करून अदोम देशातील मिठाच्या खोऱ्यावर हल्ला चढवला. अमस्याच्या

सैन्याने या ठिकाणी सेइर मधील 10,000 लोकांना ठार
केले. [12]आणखी 10,000 जणांना बंदिवान केले. त्यांना
धरुन खडकाच्या माथ्यावर नेले आणि एवढ्या उंचीवरुन
त्यांचा कडेलोट केला. खालच्या दगडधोंड्यांवर त्यांचे देह
छिन्नविच्छिन्न होऊन पडले.

[13]नेमक्या याचवेळी इस्राएली सैन्याने यहूदातील काही
नगरांवर हल्ला चढवला. त्यांनी बेथ-होरोनपासून थेट
शोमरोनपर्यंत गावे उद्ध्वस्त केली. 3000 लोकांना जिवे
मारले आणि मौल्यवान चीजवस्तू लुटल्या. अमस्याने
आपल्याला लढाईत सामील करून न घेतल्यामुळे हे
इस्राएली सैन्य भडकले होते.

[14]अदोम्यांचा पाडाव करून अमस्या आपल्या नगरात
परतला. येताना त्याने सेइरमधील लोकांच्या देवाच्या मूर्ती
बरोबर आणल्या आणि त्यांची पूजाअर्चा सुरु केली. या
दैवतांना वंदन करून तो त्यांच्यापुढे धूप जाळू लागला.
[15]या कृतीमुळे परमेश्वराचा अमस्यावर कोप झाला.
परमेश्वराने संदेष्ट्याला अमस्याकडे पाठवले. संदेष्टा
राजाला म्हणाला, "अमस्या, त्या लोकांच्या दैवतांची पूजा
तू का करत आहेस? त्या दैवतांना तर स्वत:च्याच लोकांचे
तुझ्यापासून रक्षण करता आले नाही."

[16]अमस्या संदेष्ट्याच्या या बोलण्यावर म्हणाला, "आम्ही
तुला राजाचा सल्लागार म्हणून नेमलेले नाही, तेव्हा तू
गप्प राहावे हे चांगले नाहीतर जिवाला मुकशील." संदेष्टा
गप्प बसला पण नंतर म्हणाला, "देवाने तुझा नाश करायचे
निश्चित केले आहे. कारण तू करु नये त्या गोष्टी केल्यास
आणि माझे ऐकले नाहीस."

[17]यहूदाचा राजा अमस्या याने यावर आपल्या
सल्लागारांबरोबर विचार विनिमय केला. मग योवाशला
त्याने निरोप पाठवला की, "आपली एकदा प्रत्यक्ष गाठ
पडली पाहिजे." योवाश हा यहोआहाजचा मुलगा आणि
यहोआहाज येहूचा. येहू इस्राएलचा राजा होता.

[18]इस्राएलचा राजा योवाश याने यहूदाचा राजा अमस्या
याच्याकडे आपले उत्तर पाठवले. योवाशने दृष्टांत दिला
तो असा: "लबानोन मधल्या एका काटेरी झुडुपाने
लबानोनच्याच एका गंधसरुला निरोप पाठवला की, 'तुझ्या
मुलींचे माझ्या मुलाशी लग्न व्हावे.' पण तेवढ्यात ते झुडुप
तिथून जाणाऱ्या एका वन्यपशूच्या पायाखाली तुडवले गेले.
[19]'मी अदोमचा पराभव केला.' असे तू खुशाल म्हण.
तू हे प्रौढीने म्हणतो आहेस खरे पण तू आपल्या घरी
स्वस्थ बसावेस हे बरे. उगीच नसत्या फंदात पडून अडचणीत
येऊ नकोस! पण तू तसे केलेस तर तू स्वत:च्या आणि
त्याबरोबर यहूदाच्या नाशाला कारणीभूत होशील."

[20]पण अमस्याने या निरोपाला दाद दिली नाही. देवाच्याच
मनात तसे होते. यहूदाच्या लोकांनी अदोमी लोकांच्या
दैवताचे भजनपूजन सुरु केल्यामुळे इस्राएलकडून यहूदाचा
पराभव करायचे परमेश्वराने योजले होते. [21]तेव्हा
इस्राएलचा राजा योवाश आणि यहूदाचा राजा अमस्या
यांची बेथ-शेमेश नगरात समोरासमोर गाठ पडली.
बेथ-शेमेश यहूदातच आहे. [22]इस्राएलने यहूदाचा पराभव
केला. झाडून सर्व यहूद्यांनी या लढाईतून पळ काढला.
[23]योवाशने बेथ-शेमेश येथे अमस्याला पकडले आणि
यरुशलेमला नेले. अमस्याच्या वडलांचे नाव योवाश.
योवाशचे वडील यहोआहाज. योवाशने एफ्राइम वेशीपासून
कोपऱ्याच्या वेशीपर्यंतची यरुशलेमच्या तटबंदीची 600
हात लांबीची भिंत पार मोडून तोडून टाकली.

[24]सर्व सोनेरुपे तसेच मंदिरातील उपकरणी, भांडी देखील
त्याने हस्तगत केली. देवाच्या मंदिरातील वस्तूंची देखभाल
करण्याची जबाबदारी ओबेदअदोमची होती.
राजमहालातील चीजवस्तूही योवाशने लुटली. काही जणांना
बंदिवान केले. या सगळ्यासह तो शोमरोनला परतला.

[25]योवाशच्या मृत्यूनंतर अमस्या पंधरा वर्षे जगला.
अमस्याचे वडील म्हणजे यहुदाचा राजा योवाश. [26]यहूदा
आणि इस्राएलमधील राजांचा इतिहास या पुस्तकात,
अमस्याने बाकी जे जे केले त्याची साद्यंत हकीकत आली
आहे.

[27]अमस्याने परमेश्वराचे आज्ञापालन करायचे
थांबवल्यावर यरुशलेमच्या लोकांनी त्याच्याविरुध्द
कट केला. तेव्हा तो लाखीश येथे पळून गेला. पण
लोकांनी त्याच्या मागावर माणसे पाठवून त्याचा तेथे
वध केला. [28]अमस्याचा मृत देह मग लोकांनी घोड्यावर
लादला आणि यहूदानगरात आणून त्याला पूर्वजांशेजारी
पुरले.

## यहूदाचा राजा उज्जीया

26 अमस्याचा मुलगा उज्जीया याला यहूदाच्या
लोकांनी गादीवर बसवले. उज्जीया तेव्हा सोळा
वर्षांचा होता. [2]उज्जीयाने एलोथ नगर पुन्हा बांधून काढले
आणि यहूदाच्या स्वाधीन केले. अमस्याच्या मृत्यूनंतरची
ही घटना.

[3]उज्जीया सोळा वर्षांचा असताना राजा झाला. पुढे त्याने
यरुशलेमवर 52 वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव
यखिल्या. ती यरुशलेमची होती. [4]उज्जीयाचे वर्तन
परमेश्वराच्या दृष्टीने योग्य असे होते. आपले वडील
अमस्या यांच्याप्रमाणे त्याने देवाचे अनुसरण केले.
[5]जखऱ्याच्या हयातीत त्याने देवाचे अनुसरण केले.
आदरपूर्वक परमेश्वराला मानणे त्याला जखऱ्याने
शिकवले. तो असे वागत असे तोपर्यंत परमेश्वर देवाने
त्याचे कल्याण केले.

[6]उज्जीयाने पलिष्ट्यांबरोबर युध्द केले. गथ, यब्ने व
अश्दोदचे कोट पाडून टाकले. अश्दोद जवळ व
पलिष्ट्यांच्या वस्तीत इतरत्र उज्जीयाने नगरे वसवली.
[7]पलिष्टे, गुरबालमधले अरब आणि मऊनी यांच्याशी
झालेल्या लढायांमध्ये परमेश्वराने उज्जीयाला साहाय्य केले.
[8]अम्मोनी लोक उज्जीयाला कर देत असत. उज्जीयाचे

सामर्थ्य इतके वाढले की त्याची कीर्ती मिसरच्या सीमेपर्यंत पोहोंचली.

9यरुशलेममध्ये कोपऱ्यातली वेस, खोऱ्याची वेस आणि कोट वळसा घेतो तेथे उज्जीयाने बुरुज बांधून तटबंदीला बळकटी आणली. 10वाळवंटातही त्याने बुरुज बांधले. अनेक विहिरी खणल्या. डोंगराळ भागात आणि सपाटीवर त्याची बरीच गुरेढोरे होती. तसेच तेथील सुपीक भागात शेतकरी होते. द्राक्षबागांच्या निगराणीसाठी देखील त्याची माणसे होती. उज्जीयाला शेतीची आवड होती.

11उज्जीयाच्या सैन्यात चांगले लढवय्ये होते. ईयेल हा चिटणीस आणि मासेया हा कारभारी हे दोघे त्यांची गटागटात विभागणी करत. हनन्या या एका सेनानायकच्या हाताखाली हे दोघेजण होते. ईयेल आणि मासेया यांनी केलेल्या गणतीप्रमाणे सैन्य टोळी टोळीने लढाईवर जाई. 12सैन्यात एकंदर 2,600 प्रमुख लढवय्ये नेतृत्व करीत. 13शत्रूवर तुटून पडणाऱ्या 307,500 वीरांच्या सैन्याचे ते प्रमुख होते. राजाच्या बाजूने ते शत्रूवर चालून जात. 14या सर्व सेनेला उज्जीयाने ढाली, भाले, शिरस्त्राणे, चिलखते, धनुष्य आणि गोफणगुंडे अशी शस्त्रास्त्रे दिली. 15काही हुशार कारागिरांनी शोधून काढलेली यंत्रेही उज्जीयाने यरुशलेममध्ये बनवून घेतली. ती त्याने बुरुजांवर आणि तटाच्या कोंपऱ्यांवर बसवली. ही यंत्रे बाण व मोठ्या दगडांचा मारा करीत असत. उज्जीया फार प्रसिध्द झाला. उज्जीयाचे नाव त्यामुळे सर्वदूर पसरले. त्याची कुमक वाढली आणि तो बलवान झाला.

16पण सामर्थ्य वाढल्यावर तो गर्विष्ठ झाला आणि त्यामुळे त्याचा नाश ओढवला. परमेश्वरावर त्याची निष्ठा राहिली नाही. धूप जाळण्यासाठी असलेल्या वेदीवर धूप जाळण्यासाठी तो परमेश्वराच्या मंदिरात गेला. 17तेव्हा याजक अजऱ्या आणि आणखी ऐंशी शूर याजक त्याच्यापाठोपाठ तिथे गेले. 18त्यांनी उज्जीयाची चूक दाखवून दिली. ते त्याला म्हणाले, "उज्जीया, परमेश्वराला धूप जाळणे हे तुझे काम नव्हे. तू ते करु नयेस. अहरोनचे वंशज आणि याजक यांचेच ते काम आहे. धूप जाळण्याच्या या पवित्र कामासाठी ते नेमलेले आहेत. तेव्हा या पवित्र गाभाऱ्यातून तू बाहेर ये. परमेश्वराच्या आज्ञेचे तू उल्लंघन केले आहेस. परमेश्वर देवाकडून तुझा गौरव होणार नाही."

19पण उज्जीयाला या बोलण्याचा राग आला. त्याच्या हाती धूपपात्र होते. याजकांवर तो संतापला असताना पाहता पाहता त्याच्या कपाळावर कोड उठले. परमेश्वराच्या मंदिरात धूप जाळण्याच्या वेदीच्या जवळ याजकांसमक्षच हे घडले. 20मुख्य याजक अजऱ्या आणि इतर याजक उज्जीयाकडे बघतच राहिले. त्याच्या कपाळावरचे कोड त्यांनी पाहिले. त्याबरोबर त्यांनी उज्जीयाला तातडीने मंदिराबाहेर घालवले. परमेश्वराने शासन केल्यामुळे उज्जीयाही लगेचच चालता झाला. 21राजा उज्जीया कुष्ठरोगी झाला. मंदिरात त्याला मज्जाव होता. तो एका स्वतंत्र घरात राहू लागला. त्याचा मुलगा योथाम हा राजघराण्याचा कारभारी बनला आणि लोकांचे शासन करु लागला.

22उज्जीयाची इतर सर्व कृत्ये आमोजाचा मुलगा यशया संदेष्टा याने अथपासून इतीपर्यंत लिहिलेली आहेत. 23उज्जीया मरण पावला आणि त्याच्या पूर्वजांजवळ त्याचे दफन झाले. राजांसाठी असलेल्या दफनभूमीच्या शेजारच्या जागेत त्याला पुरले. 'कारण तो कुष्ठरोगी होता.' उज्जीयाच्या नंतर त्याचा मुलगा योथाम राजा झाला.

## यहूदाचा राजा योथाम

27 योथाम राजा झाला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये 16 वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव यरुशा. ती सादोकची मुलगी. 2योथाम परमेश्वराच्या दृष्टीने उचित तेच करीत असे. आपले वडील उज्जीया यांच्याप्रमाणेच तो परमेश्वराच्या आज्ञेत राहिला. पण त्याचे वडील जसे परमेश्वराच्या मंदिरात धूप जाळायला गेले तसे मात्र त्याने केले नाही. लोकांचे दुर्वर्तन चालूच होते. 3परमेश्वराच्या मंदिराचा वरचा दरवाजा योथामने पुन्हा करवला. ओफेलच्या कोटावर त्याने बरेच बांधकाम केले. 4यहूदाच्या डोंगराळ प्रदेशात नगरे वसवली. जंगलात किल्ले आणि बुरुज बांधले. 5अम्मोन्यांचा राजा आणि त्यांचे सैन्य यांच्यावर योथामने चढाई केली आणि त्यांचा पराभव केला. त्यामुळे पुढील तीनवर्षे अम्मोनी योथामला 3 3/4 टन चांदी, 62,000 बुशेल गहू (किंवा 10,000 कोर) गहू आणि तेवढेच जव दरवर्षी देत असत.

6परमेश्वर देवाने सांगितल्याप्रमाणे मन:पूर्वक आचरण केल्यामुळे योथामचे सामर्थ्य वाढले. 7त्याने केलेल्या इतर गोष्टी आणि लढाया यांची हकीकत 'इस्राएल व यहूदा राजांचा इतिहास' या पुस्तकात लिहिलेली आहे. 8योथाम गादीवर आला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले. 9पुढे योथाम मरण पावला आणि त्याचे त्याच्या पूर्वजांशेजारी दफन केले गेले. दावीदनगरांत लोकांनी त्याला पुरले. योथामच्या जागी आहाज हा त्याचा मुलगा राज्य करु लागला.

## यहूदाचा राजा आहाज

28 आहाज राजा झाला तेव्हा वीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले. आपला पूर्वज दावीद वागला तसे आहाजचे वर्तन नव्हते. त्याचे आचरण परमेश्वराला मान्य होणारे नव्हते. 2इस्राएलच्या राजांच्या दुर्वर्तनाचा त्याने कित्ता गिरवला. त्याने बआल देवतेच्या ओतीव मूर्ती पूजेसाठी केल्या. 3बेन हिन्नोमच्या खोऱ्यात त्याने धूप जाळला. आपल्या पोटच्या मुलांना त्याने अग्नीमध्ये आहूती करून बळी दिले. या प्रदेशात राहणारे लोक जे भयंकर पाप करीत तेच त्याने

केले. इस्राएल लोकांनी या भूमीवर पाऊल ठेवले तेव्हा परमेश्वराने त्या लोकांना तिथून घालवले होते. 4आहाजने उंच स्थानी, डोंगरावर तसेच प्रत्येक हिरव्यागार वृक्षाखाली यज्ञ केले आणि धूप जाळला.

5–6आहाजच्या या पापांमुळे परमेश्वर देवाने अरामच्या राजाच्या हातून आहाजचा पराभव करविला. अरामच्या राजाने व त्याच्या सैन्याने आहाजचा पाडाव करून यहूदाच्या लोकांना कैद केले व दिमिष्काला नेले. इस्राएलचा राजा पेकह याच्याकडूनही परमेश्वराने आहाजचा पराभव करवला. पेकहच्या वडलांचे नाव रमाल्या. पेकहच्या सैन्याने एका दिवसात यहूदाचे 1,20,000 शूर सैनिक ठार केले. आपले पूर्वज ज्या परमेश्वर देवाला शरण गेले त्या परमेश्वराची साथ सोडल्यामुळे यहूदी लोकांचा असा पराभव झाला. 7जिख्री हा एफ्राइममधला एक शूर योध्दा. त्याने राजा आहाजचा मुलगा मासेया, राजमहालाचा प्रमुख कारभारी अज्रीकाम आणि राजाच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा अधिकारी एलकाना यांना ठार मारले.

8इस्राएलच्या सैन्याने यहूदात राहणाऱ्या 2,00,000 जणांना पकडून नेले. हे सर्व त्यांचे नातलगच होते. या कैद्यांमध्ये बायका मुलेही होती. तसेच यहूदातील किंमती वस्तूही लुटून नेल्या. ही लूट आणि बंदिवान यांना ताब्यात घेऊन ते शोमरोन या नगरात आले. 9तिथे ओदेद नावाचा परमेश्वराचा एक संदेष्टा होता. शोमरोनला आलेल्या इस्राएली सैन्याला तो भेटला. ओदेद त्यांना म्हणाला, "तुमच्या पूर्वजांचा देव परमेश्वर याच्यामुळे तुम्ही यहूदी लोकांचा पराभव करु शकलात कारण परमेश्वराचा यहूद्यांवर कोप झाला होता. पण तुम्ही अतिशय नीच पध्दतीने यहूद्यांना मारलेत, त्यांना शासन केलेत. त्यामुळे आता परमेश्वराच्या कोधाचा रोख तुमच्यावर आहे. 10यहूदाच्या व यरुशलेमच्या लोकांना गुलाम करण्याचा तुमचा मानस आहे. परमेश्वराच्या दृष्टीने तुम्ही हे पाप केले आहे. 11आता माझे ऐका. पकडून आणलेल्या या आपल्या भावाबहिणींना परत पाठवून द्या. परमेश्वराला तुमचा अनावर संताप आला आहे."

12एफ्राइमच्या काही प्रमुख मंडळींनी इस्राएलच्या सैनिकांना लढाईवरुन परतताना पाहिले. तेव्हा या प्रमुखांनी सैनिकांना भेटून चांगली समज दिली. योहानानचा मुलगा अजऱ्या, मशिल्लेमोथचा मुलगा बरेख्या, शल्लूमचा मुलगा यहिज्कीया, आणि हदलाईचा मुलगा अमासा ही ती नेते मंडळी होत. 13ती इस्राएली सैन्याला म्हणाली, "यहूदाच्या कैद्यांना इकडे आणू नका. तसे केलेत तर तो परमेश्वराचा आपण केलेला मोठा अपराध ठरेल. आपल्या पापांमध्ये त्यामुळे आणखी भर पडेल. इस्राएलवर परमेश्वराचा कोप होईल."

14तेव्हा त्या सैनिकांनी कैदी आणि लुटलेली चीजवस्तू हे इस्राएल लोकांच्या आणि त्या प्रमुखांच्या हवाली केले. 15तेव्हा अजऱ्या, बरेख्या, यहिज्कीया आणि अमासा यांनी पुढे होऊन कैद्यांना जवळ केले. त्यांतील उघड्या नागड्या लोकांना त्यांनी लुटीतले कपडेलत्ते दिले. जे अनवाणी होते त्यांना पादत्राणे दिली. त्या सर्वांना त्यांनी खाऊ पिऊ घातले. मर्दनासाठी तेल दिले. एवढे झाल्यावर या प्रमुखांनी चालायचे त्राण नसलेल्या कैद्यांना गाढवावर बसवले आणि या सर्वांना त्यांनी यरीहो या त्यांच्या गावी घरी नेऊन सोडले. यरीहोला खजुरीच्या झाडांचे नगर असेही म्हणतात. मग ही चार वडीलधारी मंडळी शोमरोनला परतली.

16–17याचवेळी अदोमच्या लोकांनी यहूदावर चढाई करून त्यांचा पाडाव केला. अदोम्यांनी यहूदी लोकांना कैद करून नेले. तेव्हा राजा आहाजने अश्शूरच्या राजाकडे मदत मागितली. 18पलिष्ट्यांनीही डोंगराळ तळवटीच्या भागातल्या गावांवर आणि दक्षिण यहूदावर हल्ला केला. बेथ–शेमेश, अयालोन, खदेरोथ, सोखो, तिम्ना आणि गिम्जो ही गावे त्यांच्या आसपासच्या खेड्यांसह काबीज केली. 19परमेश्वराने यहूदाला संकटांनी जेरीला आणले कारण यहूदाचा राजा आहाज याने यहूद्यांना दुर्वर्तनाला प्रवृत्त केले होते. आहाजने परमेश्वराचे उल्लंघन केले होते. 20तिल्गथ–पिल्नेसर हा अश्शूरचा राजा. यानेही आहाजला मदत करण्याऐवजी त्रासच दिला. 21आहाजने परमेश्वराच्या मंदिरातील, राजमहालातील तसेच सरदारांच्या घरातील धनदौलत घेऊन अश्शूरच्या राजाला दिली पण त्याचाही फायदा झाला नाही.

22या संकटकाळात आहाजच्या दुर्वर्तनात आणखी भरच पडली. तो परमेश्वरापासून दुरावला. 23दिमिष्काच्या लोकांच्या दैवतांसाठी त्याने यज्ञ केले. या दिमिष्कांनी त्याला हरवले होते. तेव्हा त्याने विचार केला, "अरामचे लोक ज्या देवाची पूजा करतात ते देव त्यांना साहाय्य करतात. तेव्हा मी ही त्यांच्यासाठी यज्ञ केले तर ते मला सोडवतील." म्हणून आहाज त्या दैवतांना शरण गेला. त्याच्या या कृत्यांमुळेच त्याचा आणि इस्राएल लोकांचा नाश होत गेला. 24आहाजने देवाच्या मंदिरातली सगळी उपकरणी गोळा करून त्यांची मोडतोड करून विल्हेवाट लावली. परमेश्वराच्या मंदिराची दारे त्याने बंद करून घेतली. वेद्या केल्या आणि त्या यरुशलेममध्ये चौका चौकात बसवल्या. 25यहूदातील सर्व गावांमध्ये इतर देवतांच्या पूजेला धूप जाळण्यासाठी म्हणून उंच स्थाने केली. अशाप्रकारे वागून आपल्या पूर्वजांच्या परमेश्वर देवाचा त्याने क्रोध ओढवून घेतला.

26आहाजच्या बाकीच्या गोष्टी आणि त्याचे सुरुवातीपासून शेवटपर्यंतचे आचरण 'यहूदा व इस्राएल राजांचा इतिहास' या पुस्तकात लिहिलेले आहे. 27आहाज मरण पावला आणि त्याच्या पूर्वजांशेजारी त्याचे दफन झाले. यरुशलेम नगरात लोकांनी त्याला पुरले. पण इस्राएलच्या इतर राजांचे जेथे दफन झाले त्या जागी मात्र नव्हे. आहाजचा मुलगा हिज्कीया हा पुढे राजा झाला.

## यहूदाचा राजा हिज्कीया

**29** हिज्कीया वयाच्या पंचविसाव्या वर्षी राजा झाला.
त्याने यरुशलेममध्ये एकोणतीस वर्षे राज्य केले.
त्याच्या आईचे नाव अबीया. ती जखऱ्याची मुलगी.
**2**हिज्कीयाची वागणूक परमेश्वराच्या दृष्टीने उचित अशी
होती. आपला पूर्वज दावीद याच्या प्रमाणेच त्याचे वर्तन
सुयोग्य असे.

**3**हिज्कीयाने परमेश्वराच्या मंदिराचे दरवाजे उघडले
आणि दुरुस्ती करून ते मजबूत केले. राजा झाल्याबरोबर
आपल्या कारभाराच्या पहिल्या महिन्यातच त्याने हे केले.
**4–5**सर्व याजक आणि लेवी यांना त्याने एकत्र बोलावले
आणि मंदिराच्या पूर्वेकडील मोकळ्या चौकात त्यांची सभा
घेतली. हिज्कीया त्यांना म्हणाला, “लेवी हो, ऐका, देवाच्या
सेवेसाठी शुचिर्भूत व्हा. या पवित्र कार्यासाठी परमेश्वर
देवाच्या मंदिराची सिध्दता करा. परमेश्वर हा आपल्या
पूर्वजांनी मानलेला देव आहे. ज्या वस्तूं इथल्या नाहीत
त्या इथून काढून टाका. त्या वस्तू म्हणजे घाण असून त्या
हे पवित्र मंदिर भ्रष्ट करतात. **6**आपल्या पूर्वजांनी
परमेश्वराची संगत सोडली आणि त्याच्या मंदिराकडे पाठ
फिरवली. **7**त्यांनी मंदिराचे प्रवेशद्वार बंद केले आणि दिवे
विझू दिले. इस्राएलच्या परमेश्वराच्या पवित्र गाभाऱ्यात
परमेश्वरासाठी धूप जाळणे, होमार्पणे करणे बंद पडले.
**8**म्हणून यहूदा यरुशलेमच्या लोकांवर परमेश्वर कोपला.
त्याने लोकांना शासन केले. परमेश्वराचा क्रोध पाहून
इतर लोक विस्मयचकित झाले आणि घाबरले. यहूदी
लोकांबद्दल त्यांना तिरस्कार आणि शरम वाटली. ही
वस्तुस्थिती तुम्हांला माहीत आहे. तुम्ही ती पाहतच आहात.
**9**म्हणूनच युध्दात आपले पूर्वज मारले गेले. आपली बायका
पोरे कैदी झाली. **10**म्हणून मी, हा हिज्कीया, इस्राएलच्या
परमेश्वर देवाशी करार करणार आहे. म्हणजे आपल्यावर
त्याचा राग राहणार नाही. **11**तेव्हा मुलांनो, आता, आळसात
वेळ घालवू नका. परमेश्वराने त्याच्या सेवेसाठी तुमची
निवड केली आहे. मंदिरात त्याची सेवाचाकरी करणे,
धूप जाळणे यासाठी तुम्हाला त्याने निवडले आहे.”

**12–14**तेव्हा जे लेवी कामाला लागले ते पुढीलप्रमाणे:
कहाथ घराण्यातले अमासयचा मुलगा महथ आणि
अजऱ्याचा मुलगा योएल. मरारी कुळातला अब्दीचा मुलगा
कीश आणि यहल्लेलेलाचा मुलगा अजऱ्या. गर्षोनी
कुळातला जिम्माचा मुलगा यवाह आणि यवाहचा मुलगा
एदेन, अलीसाफानच्या घराण्यातील शिम्री आणि ईएल
आसाफच्या घराण्यातील जखऱ्या व मत्तन्या. हेमानच्या
कुळातील यहीएल आणि शिमी, यदुथूनच्या कुळातील
शमाया आणि उज्जियेल. **15**मग या लेवींनी आपल्या
भाऊबंदांसह एकत्र येऊन मंदिराच्या शुध्दतेसाठी सर्व तयारी
केली. परमेश्वराने राजामार्फत केलेली आज्ञा त्यांनी
पाळली. मंदिराच्या स्वच्छतेसाठी ते आत शिरले.
**16**परमेश्वराच्या मंदिरात जेवढ्या अशुध्द आणि तिथल्या
वातावरणाशी विसंगत वस्तू त्यांना सापडल्या त्या सगळ्या
गोळा करून त्यांनी मंदिराच्या अंगणात आणून ठेवल्या.
तिथून त्या उचलून त्यांनी किद्रोन खोऱ्यात नेऊन टाकल्या.
**17**पहिल्या महिन्याच्या प्रतिपदेला लेवींनी पवित्रीकरणाच्या
कामाला सुरुवात केली. आठव्या दिवशी ते परमेश्वराच्या
मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत आले. परमेश्वराच्या मंदिराची
सर्व तऱ्हेची शुध्दता होऊन ते पवित्र व्हायला आणखी
आठ दिवस लागले. पहिल्या महिन्याच्या सोळाव्या दिवशी
त्यांचे काम पूर्ण झाले.

**18**त्यानंतर ते राजा हिज्कीया याच्याकडे गेले. राजाला
ते म्हणाले, “परमेश्वराचे मंदिर, होमार्पणाची वेदी आणि
तीवरील सर्व भांडी आम्ही शुध्द केल्या आहेत. समर्पित
भाकरीचे मेज आणि त्याची सर्व उपकरणेही शुध्द केली
आहेत. **19**राजा आहाजने आपल्या कारकिर्दीत
गैरवर्तनातून जी उपकरणे फेकून दिली होती त्यांचीही
शुध्दी करून आम्ही ती मांडली आहेत. ती आता देवाच्या
वेदीसमोरच आहेत.”

**20**दुसऱ्या दिवशी सकाळी, नगरातील सर्वा सरदारांना
बरोबर घेऊन राजा हिज्कीया परमेश्वराच्या मंदिरात गेला.
**21**त्यांनी सात बैल, सात मेंढे, सात कोकरे आणि सात
बोकड पापार्पणासाठी आणले. यहूदाचे राज्य, परमेश्वराचे
पवित्र स्थान आणि यहूदीलोक यांच्या शुध्दीप्रीत्यर्थ हे
प्राणी होते. अहरोनचे वंशज असलेल्या याजकांना
हिज्कीयाने ते प्राणी परमेश्वराच्या वेदीवर अर्पण करायची
आज्ञा केली. **22**त्याप्रमाणे याजकांनी बैल कापले आणि
त्यांचे रक्त वेदीवर शिंपडले. मग मेंढे कापून त्यांचे रक्त
वेदीवर शिंपडले. मग त्यांनी कोकरे कापली आणि त्यांचे
रक्त वेदीवर शिंपडले. **23–24**यानंतर याजकांनी राजा व
समुदाय यांच्यापुढे बोकडांना आणले. हे बोकड
पापार्पणासाठी होते. याजकांनी बोकडांवर हात ठेवून त्यांना
मारले. बोकडांचे रक्त वेदीवर शिंपडून याजकांनी पापार्पण
केले. परमेश्वराने इस्राएल लोकांना क्षमा करावी म्हणून
हे विधी याजकांनी केले. सामस्त इस्राएल लोकांसाठी
होमार्पण आणि पापार्पण करावे अशी राजाची आज्ञा होती.

**25**दावीद, राजाचा द्रष्टा गाद आणि संदेष्टा नाथान यांच्या
आज्ञेबरहुकूम राजा हिज्कीयाने झांजा, सतारी व वीणा
वाजवण्यासाठी परमेश्वराच्या मंदिरात लेवींची नेमणूक
केली. परमेश्वराने संदेष्ट्यांमार्फत तशी आज्ञा केली होती.
**26**त्या प्रमाणे दावीदाची वाद्ये घेऊन लेवी आणि कर्णे घेऊन
याजक उभे राहिले. **27**मग हिज्कीयाने वेदीवर होमार्पण
करण्याची आज्ञा केली. त्याला सुरुवात होताच परमेश्वराचे
भजन स्तवनही सुरु झाले. कर्णे आणि इस्राएलचा राजा
दावीद याची वाद्ये यांचा गजर सुरु झाला. **28**होमार्पण चालू
असेपर्यंत समुदाय अभिवादन करत होता. गायक गात
होते आणि कर्णे वाजवणे चालू होते. **29**होमार्पणाचे विधी
झाल्यावर राजा हिज्कीयासकट सर्व लोकांनी मस्तके
लववून परमेश्वराची आराधना केली. **30**हिज्कीया आणि

सरदार यांनी लेव्यांना परमेश्वराची स्तोत्रे गाण्याची आज्ञा
केली. तेव्हा त्यांनी दावीद आणि द्रष्टा आसाफ यांनी
रचलेली स्तोत्रे म्हटली. या स्तवनांनी ते आनंदित झाले.
सर्वांनी लवून नमस्कार करून देवाची आराधना केली.
31हिज्कीया म्हणाला, “यहूदातील लोकहो, तुम्ही आता
स्वत:ला परमेश्वराच्या हवाली केले आहे. तेव्हा जवळ
येऊन यज्ञाची आणि उपकारस्मरणाची अर्पणे आणा.”
तेव्हा लोकांनी ती अर्पणे आणली. ज्यांना हवी होती त्यांनी
होमार्पणेही आणली. 32मंदिरात एकंदर होमार्पणे आणली
गेली त्याची मोजदाद पुढीलप्रमाणे: सत्तर बैल, शंभर मेंढे,
दोनशे कोकरे. त्यांचे परमेश्वराला होमार्पण करण्यात
आले. 33सहाशे बैल आणि तीन हजार शेरडेमेंढरे हे
परमेश्वराला वाहिलेले पशू. 34होमबलीसाठी आणलेल्या
एवढ्या पशूंची कातडी काढणे, कापणे हे तेवढ्या याजकांच्या
आवाक्याबाहेरचे होते. तेव्हा त्यांच्या बांधवांनी लेवींनी
त्यांना या कामात मदत केली आणि इतर याजक पुढच्या
सेवेसाठी पवित्र होण्याच्या तयारीला लागले. या पवित्र
होण्याच्या बाबतीत याजकांपेक्षा लेवी अधिक काटेकोर
होते. 35होमबली पुष्कळ होते. शांतिअर्पणांच्या पशूंची चरबी
आणि पेयार्पणेही विपुल होती. 36परमेश्वराने आपल्या
प्रजेसाठी हे जे सर्व घडवून आणले त्यामुळे हिज्कीया
आणि सगळे लोक आनंदित झाले. हे सर्व इतक्या जलद
घडून आले म्हणून त्यांना विशेषच आनंद झाला.

## हिज्कीया वल्हांडणाचा सण साजरा करतो

30 हिज्कीयाने इस्राएल आणि यहूदामधील सर्व
लोकांना निरोप पाठवले: तसेच एफ्राइम आणि
मनश्शेच्या लोकांना पत्रे लिहिली. इस्राएलचा परमेश्वर
देव याच्याप्रीत्यर्थ वल्हांडणाचा सण साजरा करायला
यरुशलेमतील परमेश्वराच्या मंदिरात यावे असे त्याने त्या
निरोप पत्रांद्वारे कळवले. 2यरुशलेममधील मंडळी आणि
सर्व सरदार यांच्याशी विचार विनिमय करून राजा
हिज्कीयाने वल्हांडणाचा सण दुसऱ्या महिन्यात साजरा
करायचे ठरवले. 3सणासाठी पुरेशा याजकांचे पवित्रीकरण
झाले नव्हते तसेच यरुशलेममध्ये सगळे लोक जमले
नव्हते म्हणून नेहमीच्या वेळेला हा सण साजरा करता
येणे शक्य नव्हते. 4तेव्हा राजासकट सर्व मंडळींना ही
गोष्ट पसंत पडली. 5बैर-शेबा पासून दान पर्यंत इस्राएलभर
त्यांनी दवंडी पिटली. वल्हांडणासाठी यरुशलेमला यायला
सर्व लोकांना आवाहन करण्यात आले. मोशेच्या
नियमशास्त्रात सांगितलेल्या पारंपारिक पध्दतीने बहुसंख्य
लोकांनी फार वर्षात हा सण साजरा केला नव्हता. 6त्यामुळे
निरोप्यांनी राजाचा संदेश इस्राएल आणि यहूदाभर फिरवला.
त्याचा मसुदा असा होता:

इस्राएल लोक हो, अब्राहाम, इसहाक आणि इस्राएल
(याकोब) यांच्या परमेश्वर देवाकडे परत फिरा.
म्हणजे अश्शूर राजांच्या तावडीतून सुटून जे सुखरूप
राहिले आहेत त्यांना परमेश्वर जवळ करील. 7आपले
वडील किंवा भाऊबंद यांचे अनुकरण करु नका.
परमेश्वर त्यांचा देव होता, पण त्यांनी त्याच्याकडे
पाठ फिरवली. तेव्हा त्यांच्याविषयी परमेश्वराने
इतरांच्या मनात घृणा निर्माण केली व त्यांना निंदेला
प्रवृत्त केले. त्यामुळे झालेली दुर्दशा तुम्ही पाहिली
आहेच. 8आपल्या पूर्वजांसारखे ताठर बनू नका.
मनोभावे परमेश्वराला शरण जा मंदिराच्या पवित्र
गाभाऱ्याकडे या. परमेश्वराने ते पवित्रस्थान कायमचे
पवित्र केले आहे. परमेश्वर देवाची सेवा करा. तरच
परमेश्वराचा तुमच्यावर भडकलेला कोप शांत
होईल. 9तुम्ही परमेश्वराकडे परत फिरलात तर
ज्याने तुमच्या भाऊबंदांना आणि लेकरांना कैद करून
नेले त्यांना दयेचा पाझर फुटेल आणि तुमचे भाऊबंद
आणि लेकरे आपल्याकडे परत येतील. परमेश्वर
तुमचा देव दयाळू आणि कृपाळू आहे. त्याच्या
आसऱ्याला गेलात तर तो तुमचा धिक्कार करणार
नाही.

10एफ्राइम आणि मनश्शेच्या प्रदेशात निरोप्ये गावोगाव
फिरले. ते पार जबुलून पर्यंत गेले. पण लोकांनी मात्र
उपहासाने वागून त्यांची हेटाळणी केली. 11आशेर, मनश्शे
आणि जबुलून मधल्या काहींनी मात्र असे न करता
विनम्रतेने यरुशलेमला प्रयाण केले. 12पुढे परमेश्वराच्या
कृपेनेच असे घडून आले की राजा हिज्कीया आणि त्याचे
सरदार यांच्या आज्ञेप्रमाणे वागायला यहूदाचे लोक तयार
झाले. अशा रितीने त्यांनी देवाचा शब्द पाळला.
13दुसऱ्या महिन्यात बेखमीर भाकरीचा सण साजरा
करण्यासाठी लोक प्रचंड संख्येने यरुशलेममध्ये जमले.
तो एक विशाल समुदाय होता. 14यरुशलेममधल्या खोट्या
नाट्या दैवतांसाठी उभारलेल्या वेद्या तसेच धूप जाळायच्या
वेद्या या लोकांनी उखडून टाकल्या आणि किद्रोन खोऱ्यात
नेऊन टाकून दिल्या. 15दुसऱ्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी
त्यांनी वल्हांडणाच्या यज्ञपशूचा बळी दिला. याजक आणि
लेवी यांनी तेव्हा लज्जित होऊन स्वत:ला पवित्र केले
आणि होमबली परमेश्वराच्या मंदिरात आणले. 16देवाचा
माणूस मोशेच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे ते
आपापल्या जागी स्थानापन्न झाले. याजकांनी लेवींच्या
हातून रक्त घेऊन ते वेदीवर शिंपडले. 17तेथे जमलेल्या
पुष्कळशा लोकांनी स्वत:चे शुध्दीकरण केलेले नव्हते
त्यामुळे वल्हांडणाचे यज्ञपशू मारायचा त्यांना अधिकार
नव्हता. अशांसाठी ते काम लेवींनाच करावे लागत होते.
लेवींनी सर्व यज्ञपशूंचे परमेश्वराकरता शुध्दीकरण केले.
18–19एफ्राइम, मनश्शे, इस्साखार आणि जबुलून इथून
आलेल्या बऱ्याच लोकांनी वल्हांडणासाठी योग्य तऱ्हेने
स्वत:चे शुद्धीकरण केलेले नव्हते. ही पध्दत मोशेच्या

नियमशास्त्राला सोडून होती. पण हिज्कीयाने त्यांच्या वतीने प्रार्थना केली. तो म्हणाला, "परमेश्वर देवा, तू भला आहेस. तुझी आराधना योग्य तऱ्हेने व्हावी असे या लोकांना मनापासून वाटते. पण धर्मशास्त्राप्रमाणे त्यांनी शुध्दीकरण केलेले नाही. त्यांना क्षमा कर. आमच्या पूर्वजांपासूनचा तूच आमचा देव आहेस. अत्यंत पवित्र स्थानाच्या नियमाप्रमाणे त्यांच्यापैकी कोणी शुचिर्भूत झालेले नसले तरी तू त्यांना क्षमा कर." 20राजा हिज्कीयाने केलेली प्रार्थना परमेश्वराने ऐकली आणि लोकांना क्षमा केली. 21इस्राएलच्या प्रजेने यरुशलेममध्ये बेखमीर भाकरीचा उत्सव सात दिवस साजरा केला. लोक आनंदात होते. लेवी आणि याजक यांनी रोज मन:पूर्वक परमेश्वराची स्तुतिस्त्रोत्रे गाईली. 22परमेश्वराची सेवा कशी करावी याचे उत्तम ज्ञान असलेल्या लेवींना राजा हिज्कीया उत्तेजन देत होता. सणाचे सात दिवस आनंदात घालवत लोकांनी शांतिअर्पणे वाहिली आणि आपल्या पूर्वजांच्या परमेश्वर देवाला धन्यवाद दिले.

23वल्हांडणाचा सण आणखी सात दिवस साजरा करावा असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे आणखी सात दिवस त्यांनी या सणाप्रीत्यर्थ आनंदात घालवले. 24हिज्कियाने 1000 बैल आणि 7000 मेंढरे व पुढाऱ्यांनी 1000 बैल व 10000 मेंढरे मारून खाण्यासाठी या समुदायाला दिली. त्यासाठी बऱ्याच याजकांना शुचिर्भूत व्हावे लागले. 25यहूदातील सर्व लोक, याजकवर्ग, लेवी, इस्राएलमधील समुदाय तसेच इस्राएलमधून यहूदात आलेले विदेशी प्रवासी हे सर्वजण अतिशय खुशीत होते. 26यरुशलेममध्ये आनंदीआनंद पसरला होता. इस्राएलचा राजा दावीद याचा मुलगा शलमोन याच्या कारकिर्दीनंतर आजतागायत असा आनंदाचा प्रसंग कधी घडलाच नव्हता. 27याजक व लेवी यांनी उठून लोकांना आशीर्वाद देण्याची परमेश्वराला प्रार्थना केली. परमेश्वराने त्यांचे ऐकले. त्यांची प्रार्थना स्वर्गातील आपल्या पवित्र स्थानी परमेश्वराला ऐकू गेली.

## राजा हिज्कीयाच्या सुधारणा

31 अशा तऱ्हेने वल्हांडणाच्या उत्सवाची समाप्ती झाली. यरुशलेममध्ये त्यासाठी जमलेले इस्राएल लोक यहूदात आपापल्या गावी परतले. तिथे गेल्यावर त्यांनी दैवतांच्या दगडी मूर्ती फोडून टाकल्या. या खोट्या नाट्या दैवतांची पूजा होत असे. अशेराचे खांबही त्यांनी उखडून टाकले. यहूदा आणि बन्यामिन प्रांतातील सर्वच्यासर्व उंच स्थाने आणि वेद्या त्यांनी उद्ध्वस्त केल्या. एफ्राइम आणि मनश्शे या प्रदेशातील लोकांनीही तेच केले. गैर देवतांच्या प्रार्थनेसाठी बनवण्यात आलेल्या सगळ्या गोष्टींचा त्यांनी नाश केला. तेव्हाच सर्व इस्राएल लोक घरोघरी गेले.

2लेव्यांची आणि याजकांची गटागटां मध्ये विभागणी केलेली होती. त्यापैकी प्रत्येक गटाला आपापले विशेष कामकाज नेमून दिलेले होते. राजा हिज्कीयाने त्या सर्वांना आपला कारभार हाती घ्यायला सांगितले. होमार्पणे व शांतिअर्पणे वाहणे हे लेवींचे व याजकांचे नेमलेले काम होते. तसेच मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे म्हणणे व परमेश्वराच्या मंदिरात सेवा करणे हे ही त्यांचे काम होते. 3यज्ञात अर्पण करण्यासाठी म्हणून हिज्कीयाने आपल्या पशुधनातील काही पशू दिले. सकाळ संध्याकाळच्या दैनिक होमार्पणांखातर त्यांचा विनियोग करण्यात आला. शब्बाथ, नवचंद्रदर्शनी व इतर नैमित्तिक कार्ये या दिवशीही होमार्पणे होत असत. हे परमेश्वराच्या नियमशास्त्रानुसार होत असे. 4आपल्या उत्पन्नातील ठराविक हिस्सा लोकांना लेवी व याजक यांना द्यावा लागत असे. तो त्यांनी द्यावा अशी आज्ञा राजा हिज्कीयाने केली. त्यामुळे नियतकार्य निर्वेधपणे प्रभूच्या नियमशास्त्रानुसार करणे याजकांना व लेवींना शक्य झाले. 5ही आज्ञा सर्व प्रजेच्या कानी गेली. त्याबरोबर इस्राएल लोकांनी आपले धान्याचे पीक, द्राक्ष, तेल, मध आणि इतर बागायती उत्पन्न या सगळ्याचा एकदशांश भाग आणून दिला.

6यहूदातील नगरवासी इस्राएली व यहूदी लोकांनीही आपली गुरे आणि शेळ्यामेंढ्या यांचा दहावा हिस्सा जमा केला. परमेश्वर देवाप्रीत्यर्थ आखून दिलेल्या जागेत धान्याच्याही राशी त्यांनी आणून ओतल्या. त्यांनी या सर्व वस्तूंचे ढीग रचले.

7लोकांनी या सर्व वस्तू आणून टाकायला तिसऱ्या महिन्यात सुरुवात केली आणि सातव्या महिन्यात हे काम संपले. 8राजा हिज्कीया आणि इतर सरदार यांनी जेव्हा या राशी पाहिल्या तेव्हा त्यांनी परमेश्वराला आणि इस्राएलच्या प्रजेला धन्यवाद दिले.

9राजाने मग याजकांना आणि लेवींना या गोळा झालेल्या वस्तूंविषयी विचारले. 10तेव्हा सादोकच्या घराण्यातला मुख्य याजक अजऱ्या हिज्कीयाला म्हणाला की, "लोक परमेश्वराच्या मंदिरात धान्य व या सगळ्या गोष्टी अर्पण करायला लागल्यापासून आम्हाला पोटभर खायला मिळू लागले आहे. अगदी तृप्त होईपर्यंत खाऊनही एवढे उरले आहे. परमेश्वराने आपल्या प्रजेला खरोखरच दुवा दिला आहे, म्हणून तर इतके शिल्लक राहीले आहे."

11हिज्कीयाने मग याजकांना परमेश्वराच्या मंदिरात कोठारे तयार ठेवायला सांगितली. त्याची आज्ञा अंमलात आणली गेली. 12याजकांनी परमेश्वरासाठी अर्पण केलेल्या वस्तू धान्याचा अथवा पशूंचा दहावा हिस्सा, इतर काही वाहिलेल्या गोष्टी आत आणल्या आणि मंदिरातील कोठारात जमा केल्या. कोनन्या लेवी हा या भांडारावरचा प्रमुख अधिकारी होता. शिमी त्याच्या हाताखाली होता. शिमी कोनन्याचा भाऊ होता. 13यहीएल, अजऱ्या, नहथ, असाएल, यरीमोथ, योजाबाद, अलीएल, इस्मख्या, महथ व बनाया यांच्यावर कोनन्या आणि शिमी या दोन भावांची

देखरेख होती. राजा हिज्कीया आणि देवाच्या मंदिराचा
प्रमुख अधिकारी अजऱ्या यांनी या माणसांची निवड केली.
14लोकांनी देवाला स्वखुशीने अर्पण केलेल्या सगळ्या
गोष्टींवर कोरेची देखरेख होती. परमेश्वराला वाहिलेल्या
या गोष्टींचे वाटप करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती.
तसेच परमेश्वराला आलेल्या पवित्र भेटवस्तूंची वाटणी
करण्याचेही काम त्याचेच होते. कोरे पूर्वेकडच्या
प्रवेशद्वाराचा द्वारपाल होता. त्याच्या वडलांचे नाव इम्ना
लेवी. 15एदेन, मिन्यामीन, येशूवा, शमाया, अमऱ्या व
शखन्या हे कोरेचे मदतनीस होते. याजक राहात त्या
नगरात ते निष्ठेने आपली सेवा रुजू करत. याजकांच्या
प्रत्येक गटांमधील आपापल्या भाऊबंदांना त्यांच्या वाटणीचा
हिस्सा देत. हे वाटप करताना ते लहान मोठा अशा सर्वानाच
सारखाच भाग देतअसत. 16लेवी घराण्याच्या इतिहासात
ज्यांची नावे नोंदलेली होती असे, तीन वर्षे किंवा त्यापेक्षा
जास्त वयाचे जे लेवी पुरुष परमेश्वराच्या मंदिरात नेमून
दिलेल्या दैनंदिन कामासाठी जात त्यांना त्यांची वाटणी हे
मदतनीस देत. अशाप्रकारे लेवींच्या प्रत्येक गटाला काम
नेमून दिलेले होते.

17याजकांना त्यांच्या वाटणीचा हिस्सा मिळत असे. ज्या
लेवींची आपापल्या पितृकुळाप्रमाणे नोंद झाली होती त्यांना
आणि किमान वीस वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठ्या
असलेल्या लेवींना त्यांची वाटणी मिळत असे. त्यांच्यावरील
जबाबदारीचे स्वरुप आणि त्यांचा गट यावर त्याचे प्रमाण
ठरत असे. 18ज्या लेवींची वंशावळ्यांमध्ये नोंद झालेली
होती त्या सर्वांच्या मुलाबाळांना, बायकांना मुलगे व मुली
यांनाही आपापला हिस्सा मिळे. परमेश्वराच्या सेवेसाठी ते
नेहमीच शुचिर्भूत होऊन तत्पर असत म्हणून त्यांना हे
दिले जाई. 19अहरोन वंशातील काही याजकांची लेवी
राहात असत त्या गावांमध्ये शेत-शिवारे होती. काही
अहरोनचे वंशज नगरांमध्येही राहात होते. तेव्हा त्या
नगरातील माणसांची नावानिशी निवड करून त्यांना
आपल्या उत्पन्नातला वाटा या अहरोनवंशजांना द्यायला
निवडले होते. वंशावळीत नोंदवलेले सर्वजण आणि पुरुष
लेवी यांना हा वाटा मिळे.

20राजा हिज्कीयाने अशाप्रकारे यहूदात चांगली
कामगिरी केली. परमेश्वर देवाच्या दृष्टीने जे योग्य, बरोबर
आणि सत्य ते त्याने केले. 21हाती घेतलेल्या प्रत्येक कामात
त्याला यश आले, उदाहरणार्थ, देवाच्या मंदिरातील
उपासना, नियमशास्त्राचे पालन, परमेश्वराला शरण जाणे.
हिज्कीयाने हे सर्व मनापासून केले.

## अश्शूरच्या राजाचा हिज्कीयाला उपद्रव

32 हिज्कीयाने परमेश्वरावर भरवंसा ठेवून
केलेल्या सगळ्या गोष्टी प्रत्यक्षात उतरल्यावर
अश्शूरचा राजा सन्हेरीब यहूदावर चाल करून आला.
नगराच्या तटबंदीबाहेर त्याने आपल्या सैन्यासह तळ
ठोकला. आतील नगरांचा पाडाव करून ती जिंकून घ्यायचा
त्याने बेत केला. 2यरुशलेमवर हल्ला करायला सन्हेरीब
आला आहे हे हिज्कीयाला कळले. 3तेव्हा तो आपल्या
सरदारांशी आणि सैन्याच्या अधिकाऱ्यांशी बोलला. त्यांच्या
साहाय्याने व त्यांच्याशी मसलत करून राजाने
नगराबाहेरच्या झऱ्यांचे पाणी अडवायचा एकमताने निर्णय
घेतला. त्या सर्वांनी त्याला मदत केली. 4झरे आणि आपल्या
प्रांतामधून वाहणारी नदी लोकांनी एकत्र येऊन अडवली.
ते म्हणाले, "अश्शूरच्या राजाला आत्ता इथवर आल्यावर
पाणी कुठले मिळायला?" 5हिज्कीयाने पुढील
उपाययोजनेने यरुशलेमची मजबुती वाढवली. तटबंदीची
भिंत जिथे जिथे ढासळली होती तिथे तिथे बांधून काढली.
भिंतीवर बुरूज बांधले. तटबंदीबाहेर दुसरा कोट केला.
यरुशलेमच्या जुन्या भागाची पूर्वेची बाजू आणखी भक्कम
केली. शस्त्रे आणि ढाली आणखी करवून घेतल्या.
6–7हिज्कीयाने प्रजेवर सेनानायकांच्या नेमणुका केल्या,
आणि नगराच्या वेशीजवळच्या चौकात त्यांची सभा घेऊन
त्यांच्याशी उत्तेजनपर बातचीत केली. हिज्कीया त्यांना
म्हणाला, "हिंमत बाळगा आणि दृढ राहा. अश्शूरच्या
राजाची किंवा त्याच्या विशाल सेनेची धास्ती घेऊ नका.
आपली ताकद त्यांच्यापेक्षा जास्त आहे. 8अश्शूरच्या
राजाजवळ फक्त मनुष्यबळ आहे. आपल्या बाजूला मात्र
साक्षात परमेश्वर देव आहे. तोच आपल्याला मदत करील."
आपल्या युध्दात तोच लढेल अशाप्रकारे हिज्कीयाचे धीराचे
बोलणे ऐकून लोकांना त्यावर विश्वास बसला आणि
त्यांना हुरूप आला.

9अश्शूरचा राजा सन्हेरीब याने लाखीशचा पराभव
करण्याच्या हेतूने आपल्या सैन्यासह लाखीश नगराजवळ
तळ दिला होता. तेथून त्याने यहूदाचा राजा हिज्कीया
आणि यरुशलेममधील यहूदी लोक यांच्यासाठी आपल्या
सेवकांमार्फत निरोप पाठवला. 10सेवक म्हणाले की,
"अश्शूरचा राजा सन्हेरीब याचा संदेश असा आहे.
'यरुशलेमला वेढा पडला असताना कशाच्या भरवंशावर
तुम्ही तिथे राहता? 11हिज्कीयाचा हा तुम्हाला फसवण्याचा
डाव आहे. यरुशलेममध्ये अडकून तुम्ही तहानभुकेने
व्याकुळ होऊन मरावे असा त्याचा अंत:स्थ हेतू आहे. तो
तुम्हाला म्हणतो, "अश्शूरच्या राजापासून आपला देव
परमेश्वर आपले रक्षण करील." 12पण त्यानेच
परमेश्वराची उंच स्थाने आणि वेद्या काढून टाकल्या.
तुम्हा यहूदी आणि यरुशलेमच्या लोकांना त्याने सांगितले
की तुम्ही फक्त एकाच वेदीवर उपासना केली पाहिजे
आणि धूप जाळला पाहिजे. 13माझ्या पूर्वजांनी आणि मी
इतर देशांतल्या लोकांची कशी अवस्था करून टाकली
ती तुम्हाला माहीत आहे. त्या देशांतले दैवते काही आपल्या
लोकांना वाचवू शकले नाहीत. मलाही ते त्यांचा नाश
करण्यापासून परावृत्त करु शकले नाहीत. 14माझ्या
पूर्वजांनी इतर देशांना मातीला मिळवले. आपल्या लोकांना

विनाशातून सोडवण्याची माझ्यासमोर कोणत्याही देवताची
प्राज्ञा नाही. तेव्हा तुमचे दैवत तरी तुम्हाला वाचवू शकेल
असे वाटते का? 15हिज्कीयाच्या बतावणीला बळी पडू
नका. आमच्या पासून आपल्या प्रजेचे रक्षण करण्यात
कोणत्याच राष्ट्राच्या दैवताला अद्यापि यश आलेले नाही.
तेव्हा तुमचा संहार करण्याला तुमचे दैवत माझ्या हातून
तुम्हांला वाचवू शकेल असे समजू नका.'"

16अश्शूरच्या राजाच्या सेवकांनी परमेश्वर देवाची आणि
देवाचा सेवक हिज्कीया याची निंदानालस्ती केली.
17अश्शूरच्या राजाने पत्रांमध्ये परमेश्वर देवा विषयी
अपमानकारक मजकूरही लिहिला. तो असा होता. "इतर
देशांच्या दैवतांना मी केलेल्या संहारापासून आपल्या प्रजेला
वाचवता आले नाही. तद्वतच हिज्कीयाचा देवही मला
त्याच्या प्रजेचा नाश करण्यापासून थोपवू शकणार नाही."
18मग अश्शूरच्या राजाच्या सेवकांनी तटबंदीवर उभ्या
असलेल्या यरुशलेमच्या लोकांना घाबरवण्यासाठी हिब्रू
भाषेत मोठ्याने आरडाओरडा केला. असे करून यरुशलेम
नगर ताब्यात घ्यायचा त्यांचा विचार होता. 19जगभरचे
लोक ज्या दैवतांची पूजा करतात त्या दैवतांविषयी हे
सेवक वाईटसाईट बोलत राहिले. हे परमेश्वर म्हणजे
लोकांनी निव्वळ हातांनी बनवलेल्या मूर्ती. यरुशलेमच्या
परमेश्वरालाही या सेवकांनी त्या देवतांच्याच रांगेला
बसवले.

20यामुळे राजा हिज्कीया आणि आमोजचा मुलगा यशया
संदेष्टा यांनी या प्रश्नावर स्वर्गाकडे तोंड करून मोठ्याने
प्रार्थना केली. 21तेव्हा अश्शूरच्या राजाच्या छावणीवर
परमेश्वराने आपला दूत पाठवला. या दूताने अश्शूरांचे
सगळे सैन्य, त्यातील सरदार आणि अधिकारी यांना मारुन
टाकले. एवढे झाल्यावर अश्शूरचा राजा माघार घेऊन
आपल्या देशात परत गेला. त्याच्या प्रजेला त्याची शरम
वाटली. राजा त्याच्या दैवताच्या देवळात गेला. तिथे त्याच्या
पोटच्या मुलांनी तलवारीने त्याला ठार केले. 22अशाप्रकारे
परमेश्वराने अश्शूरचा राजा सन्हेरीब आणि त्याचे सैन्य
यांच्यापासून हिज्कीया आणि यरुशलेमचे लोक यांचे संरक्षण
केले. परमेश्वराला हिज्कीयाची आणि यरुशलेमच्या प्रजेची
काळजी होती. 23बऱ्याच जणांनी परमेश्वराला वाहायला
भेटवस्तू आणल्या. यहूदाचा राजा हिज्कीया याच्यासाठी
ही नजराणे आणले. या घटनेपासून सर्व राष्ट्रांना
हिज्कीयाबद्दल आदर वाटू लागला.

24या काळातच हिज्कीयाला आजारपणाने घेरले आणि
तो मरणासन्न झाला. त्याने परमेश्वराची प्रार्थना केली.
परमेश्वर त्याच्याशी बोलला आणि परमेश्वराने त्याला
एक संकेत दिला.* 25पण हिज्कीयाला गर्व वाटू लागला
होता. त्यामुळे त्याने परमेश्वराने दाखवलेल्या
दयाळूपणाबद्दल त्याला धन्यवाद दिले नाहीत. या गोष्टीमुळे
हिज्कीयावर आणि यहूदा व यरुशलेमच्या लोकांवर
परमेश्वर कोपला. 26पण हे लोक आणि हिज्कीया यांचे
हृदयपरिवर्तन झाले आणि त्यांची वर्तणूक बदलली.
त्यांच्यात नम्रता आली. त्यामुळे हिज्कीयाच्या हयातीत
परमेश्वराचा रोष त्यांच्यावर ओढवला नाही.

27हिज्कीयाची भरभराट झाली. त्याला मानसन्मान
मिळाला. चांदी, सोने, किंमती रत्ने, मसाल्याचे पदार्थ,
ढाली इत्यादी नाना तऱ्हेच्या वस्तू ठेवण्यासाठी त्याने कोठारे
केली. 28धान्य, नवीन मद्य, तेल या लोकांकडून आलेल्या
गोष्टी ठेवायलाही कोठारे बांधली. गुरेढोरे आणि मेंढ्या
यांच्यासाठी कोंडवाडे बांधले. 29हिज्कीयाने नवीन नगरे
वसवली. सर्व तऱ्हेचे पशू आणि मेंढरे यांचे कळप
त्याच्याकडे होते. देवदयेने हिज्कीयाला समृध्दी आली.
30याच हिज्कीयाने गीहोनचा यरुशलेममधला वरचा प्रवाह
अडवून त्याला दावीद नगराच्या पश्चिमेकडून सरळ खाली
आणले होते. हिज्कीयाला त्याने हाती घेतलेल्या प्रत्येक
कार्यात यश मिळाले.

31एकदा देशात घडलेल्या चमत्कारांविषयी चौकशी
करायला बाबेलच्या अधिपतींनी त्याच्याकडे राजदूत
पाठवले. तेव्हा हिज्कीयाची पारख करावी आणि त्याचे
मन जाणून घ्यावे म्हणून देवाने त्याला एकटे सोडले.

32हिज्कीयाने केलेल्या इतर गोष्टी आणि त्याचा
लोकांविषयीचा दयाळूपणा, त्याची धार्मिक कृत्ये, त्याची
परमेश्वरा प्रती एकनिष्ठा याविषयी 'आमोजचा मुलगा
यशया संदेष्टा याचे दृष्टांत आणि 'यहूदा व इस्राएल राजांचा
इतिहास' या ग्रंथांमध्ये लिहिलेले आहे. 33हिज्कीया मरण
पावला आणि त्याचे आपल्या पूर्वजांशेजारी दफन झाले.
दावीदाच्या वंशजांच्या कबरींपाशी डोंगरावर लोकांनी त्याचे
दफन केले. हिज्कीया मरण पावला तेव्हा यहूदा आणि
यरुशलेममधील लोकांनी त्याला सन्मानपूर्वक निरोप
दिला. हिज्कीयाच्या जागी त्याचा मुलगा मनश्शे गादीवर
आला.

## यहूदाचा राजा मनश्शे

33 मनश्शे यहूदाचा राजा झाला तेव्हा बारा वर्षांचा
होता. त्याने यरुशलेममध्ये पंचावन्न वर्षे राज्य
केले. 2त्यांचे आचरण परमेश्वराच्या दृष्टीने वाईट असे
होते. वाईट वर्तणुकीमुळे ज्या देशांना परमेश्वराने
इस्राएलपुढून हुसकून लावले त्यांच्या निंद्य प्रथांचेच
मनश्शेने अनुकरण केले 3हिज्कीयाने जी उंचस्थाने
उद्ध्वस्त केली होती तीच मनश्शेने पुन्हा बांधली. त्याने
बआल देवतांसाठी वेद्या केल्या आणि अशेराचे स्तंभ उभे
केले. नक्षत्रांपुढे नतमस्तक होऊन तो त्या तारांगणांची
पूजाही करत असे. 4परमेश्वराच्या मंदिरात त्याने त्या
भलत्यासलत्या देवतांसाठी वेद्या बांधल्या. "माझे नाव

---

**परमेश्वर ... संकेत दिला** हिज्कीयाची हकीकत आणि परमेश्वराने त्याला आणखी पंधरा वर्षे जीवदान कसे दिले याविषयी पाहा यशया 38:1–8.

यरूशलेममध्ये चिरकाल राहील” असे याच मंदिराबद्दल
परमेश्वराने म्हटले होते. 5या मंदिराच्या दोन्ही अंगणांत
मनश्शेने सर्व नक्षत्रांसाठी वेद्या बांधल्या.

6बेन हिन्नोमच्या खोऱ्यात त्याने आपल्या पोटच्या
मुलांचा यज्ञात बळी दिला. रमल, जादूटोणा, चेटूक यातही
तो पारंगत होता. चेटूक करणारे आणि मृतात्म्यांशी संबंध
ठेवणारे यांच्याशी मनश्शेचे संबंध होते. परमेश्वराने निषिध्द
मानलेली बरीच कृत्ये मनश्शेने केली. त्याच्या या
गैरवर्तनामुळे परमेश्वराचा संताप झाला. 7मनश्शेने एका
कोरीव मूर्तीची स्थापनाही देवाच्या मंदिरात केली. या
मंदिराविषयी दावीद व त्याचा पुत्र शलमोन यांना देव असे
म्हणाला होता, “या मंदिरात आणि यरुशलेममध्ये माझे
नाव चिरंतन काल राहील. इस्राएलच्या सर्व कुळांमधून
मी यरुशलेमला निवडले. 8त्यांच्या पूर्वजांना कबूल केलेल्या
प्रदेशातून मी आता इस्राएल लोकांना बाहेर पडू देणार
नाही. पण त्यांना दिलेल्या आज्ञा मात्र त्यांनी कसोशीने
पाळल्या पाहिजेत. मोशेमार्फत त्यांना दिलेल्या विधी, नियम
व आज्ञा त्यांनी पाळायला हवेत.”

9मनश्शेने मात्र यहूदा लोक आणि यरुशलेमचे लोक
यांना दुराचरणाला प्रवृत्त केले. इस्राएल लोकांपूर्वी ज्या
राष्ट्रांना परमेश्वराने हुसकावून लावले त्यांच्यापेक्षाही हे
लोक दुराचरणी होते.

10परमेश्वर मनश्शेशी व इतर लोकांशी बोलला पण
कोणीही परमेश्वराचे ऐकले नाही. 11तेव्हा अश्शूरच्या
राजाच्या सेनापतीकरवी परमेश्वराने यहूदावर हल्ला
केला. या सेनापतींनी मनश्शेला आकड्यांनी जखडून
पकडले. त्याच्या हातात पितळी बेड्या ठोकल्या. अशा
रितीने मनश्शेला कैद करून त्यांनी बाबेलला नेले.
12मनश्शेचे हाल झाले तेव्हा त्याने परमेश्वर देवाची करुणा
भाकली. त्याच्या पूर्वजांच्या देवासमोर मनश्शे नम्र झाला.
13त्याने देवाची प्रार्थना केली व मदतीसाठी याचना केली.
मनश्शेचा धावा ऐकून परमेश्वराला त्याची दया आली.
म्हणून त्याला पुन्हा यरुशलेमला आणून परमेश्वराने त्याला
गादीवर बसवले. परमेश्वर हाच खरा देव आहे हे तेव्हा
मनश्शेला पटले.

14या घटनेनंतर मनश्शेने दावीद नगराभोवती आणखी
एक कोट बांधला. हा कोट गीहोनच्या पश्चिमेकडील
खोऱ्यात मासळी दरवाजाजवळ ओफेल टेकडी सभोवती
असून खूप उंच होता. यहूदामधील सर्व तटबंदीच्या
नगरांमध्ये त्याने अधिकारी नेमले. 15परक्या देवतांच्या
मूर्ती त्याने हटवल्या. परमेश्वराच्या मंदिरातील मूर्ती काढून
टाकली. मंदिराच्या टेकडीवर तसेच यरुशलेममध्ये
बांधलेल्या वेद्यांही काढून यरुशलेम नगराबाहेर टाकून
दिल्या. 16नंतर त्याने परमेश्वराची वेदी स्थापन केली
आणि त्यावर शांतिअर्पणे आणि उपकार स्मरणाची अर्पणे
वाहिली. समस्त यहूदी लोकांना त्याने इस्राएलाचा परमेश्वर
देव याची उपासना करायची आज्ञा केली. 17लोक अजूनही
उंचस्थानी यज्ञ करीतच होते पण आता ते फक्त त्यांच्या
परमेश्वर देवा प्रीत्यर्थ करीत होते. 18मनश्शेची बाकीची
कृत्ये तसेच त्याने केलेली देवाची प्रार्थना तसेच परमेश्वर
देवाच्यावतीने द्रष्टे त्याच्याशी जे बोलले ती वचने हे सगळे
इस्राएलच्या राजांच्या बखरीत लिहिलेले आहे. 19मनश्शेची
प्रार्थना आणि परमेश्वराला त्याचे गाऱ्हाणे ऐकून करुणा
वाटणे हे ‘द्रष्टयांच्या बखरीत आहे. मनश्शेला उपरती
होण्यापूर्वीची त्याची पापे व दुर्वर्तने, उंच स्थाने व अशेरा
स्तंभ जिथे उभारले ती स्थाने याचेही तपशील याच बखरीत
आहेत. 20पुढे मनश्शे वारला व पूर्वजांबरोबर त्याचे दफन
झाले. त्याच्या राजमहालातच लोकांनी त्याला पुरले. त्याच्या
जागी त्याचा मुलगा आमोन राज्य करु लागला.

## यहूदाचा राजा आमोन

21आमोन विसाव्या वर्षी यहूदाचा राजा झाला. तो
यरुशलेममध्ये दोन वर्षे गादीवर होता. 22परमेश्वराच्या
दृष्टीने निषिध्द अशी कृत्ये त्याने केली. आपले वडील
मनश्शे यांच्याप्रमाणेच तो परमेश्वराच्या इच्छेविरुध्द
वागला. वडीलांनी करून घेतलेल्या कोरीव मूर्तीपुढे यज्ञ
करून त्याने त्यांची पूजा केली. 23पुढे त्याचे वडील मनश्शे
जसे परमेश्वराला नम्रपणे शरण गेले तसा तो गेला नाही.
उलट त्याची दुष्कृत्ये वाढतच चालली. 24आमोनच्या
सेवकांनी कट रचून त्याची त्याच्या महालातच हत्या केली.
25पण राजा आमोन विरुध्द कारस्थान करणाऱ्यांचा यहूदी
लोकांनी काटा काढला. मग आमोनचा मुलगा योशीया
याला लोकांनी राजा केले.

## यहूदाचा राजा योशीया

34 योशीया राजा झाला तेव्हा आठ वर्षांचा होता.
त्याने यरुशलेममध्ये एकतीस वर्षे राज्य केले.
2त्याचे वर्तन योग्य प्रकारचे होते. परमेश्वराची त्याच्या
कडून जशी अपेक्षा होती तसेच तो वागला. आपला पूर्वज
दावीद याच्याप्रमाणे त्याने सत्कृत्ये केली. सन्मार्गावरुन तो
ढळला नाही. 3आपल्या कारकीर्दीच्या आठव्या वर्षीच तो
आपला पूर्वज दावीद याच्या परमेश्वराच्या भजनी लागला.
योशीयाने लहान वयातच हा मार्ग पत्करला आणि
कारकीर्दीच्या बाराव्या वर्षी यहूदा आणि यरुशलेममधील
उंच स्थाने, अशेरा देवीचे खांब, कोरीव आणि ओतीव
मूर्ती यांची मोडतोड केली. 4लोकांनी त्याच्या समोरच
बआलदेवतांच्या मूर्ती फोडून टाकल्या. वरच्या भागात
असलेल्या धूप जाळण्याच्या वेद्या योशीयाने उद्ध्वस्त केल्या.
ओतीव आणि कोरीव मूर्तीचाही त्याने पार चुरा करून
टाकला आणि हे चूर्ण, ज्या लोकांनी बआलदेवतांसाठी
यज्ञ केले त्यांच्या कबरींवर पसरले. 5बआलदेवतांची पूजा
करणाऱ्या याजकांच्या अस्थी देखील त्याने त्यांच्याच
वेद्यांवर जाळून टाकल्या. अशाप्रकारे यहूदा आणि
यरुशलेममधून योशीयाने मूर्तिपूजेचा पुरा बीमोड केला.

6मनश्शे, एफ्राइम, शिमोन, नफताली येथपर्यंतच्या
शहरांतून आणि त्यांच्या आसपासच्या पडीक
खेड्यांमधूनही* त्याने हेच केले. 7मूर्तिभंजन, अशेरा
खांबांची मोडतोड, वेद्यांचा विध्वंस बआलदेवतेच्या धूपाच्या
वेद्या उखडणे ही इस्राएलभरची मोहीम उरकल्यावर योशीया
यरुशलेमला परतला.

8योशीयाने राज्याची सूत्रे हाती घेतल्याच्या अठराव्या
वर्षी शाफान, मासेया, आणि योवाह यांना परमेश्वराचे
देवाचे मंदिर दुरुस्तीसाठी पाठवले. शाफानच्या वडलांचे
नाव असल्या, मासेया हा नगराचा कारभारी होता आणि
योवाहचे वडील योवाहाज. योवाह हा बखरकार होता.
यहूदा आणि मंदिर यांच्या शुध्दीकरणासाठी मंदिराच्या
डागडुजीचे हे काम योशीयाने अंगावर घेतले. 9ही माणसे
हिल्कीया या मुख्य याजकाकडे गेली. मनश्शे, एफ्राइम
आणि उर्वरित सर्व इस्राएलमधून लोकांनी देवाच्या
मंदिरासाठी दिलेला पैसा लेवी द्वारपालांनी जमा केला
होता. सर्व यहूदा प्रांत, बन्यामिनचा प्रदेश आणि
यरुशलेममधून देखील त्यांनी पैसे जमा केले होते. ही
रक्कम हिल्कीयाकडे त्यांनी सुपूर्द केली. 10मग,
परमेश्वराच्या मंदिराच्या बांधकामावर देखरेख
करणाऱ्यांना लेवींनी हे पैसे दिले आणि देखरेख
करणाऱ्यांना परमेश्वराच्या मंदिराची दुरूस्ती करण्यासाठी
कामगारांना दिले. 11ताशीव चिरे, लाकूड यांच्या खरेदीसाठी
गवंडी, सुतार या लोकांना पैसे देण्यात आले. मंदिराच्या
दुरूस्तीसाठी आणि कडीपाटासाठी लाकूड लागले.
यहूदाच्या राजांनी या पूर्वी मंदिराची योग्य देखभाल न
केल्यामुळे मंदिराच्या इमारती जीर्ण झाल्या होत्या.
12–13कामगारांनी मन लावून काम केले. यहथ व ओबद्या
हे मरारी कुळातील लेवी देखरेख करत होते. कहाथी
वंशातील जखऱ्या आणि मशुल्लाम हे ही देखरेखीच्या
कामावर होते. वाद्ये वाजवण्यात निपुण असलेले लेवीसुध्दा
कारागिरांवर आणि मजुरांवर देखरेख करत होते. चिटणीस,
कारभारी आणि द्वारपाल म्हणूनही काही लेवी काम करत
होते.

### नियमशास्त्राचा ग्रंथ सापडतो

14परमेश्वराच्या मंदिरातील पैसा लेवी बाहेर आणत
असताना हिल्कीया या याजकाला मोशेमार्फत आलेला
नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला. 15तेव्हा हिल्कीयाने शाफान
या चिटणीसाला असा ग्रंथ सापडल्याचे सांगून शाफानला
तो दिला. 16शाफानने तो योशीयाकडे आणला. राजाला
तो म्हणाला, "तुझे सेवक तुझ्या सूचनांबरहुकूम वागत
आहेत. 17परमेश्वराच्या मंदिरातील पैसा घेऊन त्यातून ते
देखरेख करणाऱ्यांना आणि मजुरांना वेतन देत आहेत"
18शाफान पुढे राजाला म्हणाला, "याजक हिल्कीयाने मला
हे पुस्तक दिले आहे." शाफानने मग राजाला पुस्तकातील
मजकूर वाचून दाखवला. 19तो शास्त्रग्रंथ ऐकत असता
राजा योशीयाने उद्वेगाने कपडे फाडले. 20आणि हिल्कीया,
शाफानचा मुलगा अहीकाम, मीखाचा मुलगा अब्दोन,
चिटणीस शाफान आणि आपला सेवक असाया यांना
योशीयाने आज्ञा केली की. 21"माझ्या आणि इस्राएल व
यहूदा येथे आता शिल्लक असलेल्या लोकांच्या वतीने
परमेश्वराला जाऊन विचारा. या पुस्तकातील वचनांविषयी
त्याला विचारा. आपल्या पूर्वजांनी परमेश्वराचे म्हणणे न
जुमानल्यामुळे परमेश्वराचा आपल्यावर कोप झाला आहे.
आपल्या पूर्वजांचे वर्तन या पुस्तकातील वचनांना अनुसरुन
नव्हते."

22हिल्कीया आणि राजाचे सेवक* हुल्दा या संदेष्टीकडे
गेले. हुल्दा ही शल्लूमची बायको. शल्लूम ताकहतचा
आणि ताकहत इस्त्राचा मुलगा. इस्त्रा राजाच्या वस्त्रागाराचा
प्रमुख होता. हुल्दा यरुशलेमच्या नवीन भागात राहात
होती. हिल्कीया आणि राजाचे सेवक यांनी तिला सर्व
हकीगत सांगितली. 23हुल्दा त्यांना म्हणाली, "इस्राएलचा
परमेश्वर देव याचे म्हणणे असे आहे: 'राजा योशीयाला
म्हणावे: 24परमेश्वर म्हणतो, 'या प्रदेशावर आणि इथे
राहणाऱ्या लोकांवर मी अरिष्ट आणणार आहे. यहूदाच्या
राजाला जे पुस्तक वाचून दाखवण्यात आले. त्यातील
मजकुरात आहेत ती सर्व संकटे त्यांच्यावर ओढवतील.

25माझ्याकडे पाठ फिरवून इतर देवतांपुढे त्यांनी धूप
जाळला म्हणून मी असे करणार आहे. आपल्या दुष्कृत्यांमुळे
लोकांनी मला कुध्द केले आहे. या क्रोधाचा अंगार
त्यांच्यावर बरसेल आणि तो शांत होणार नाही.'

26"पण यहूदाचा राजा योशीया याला सांग. त्यानेच तुला
माझ्याकडे पाठवले आहे की तू नुकतेच जे ऐकलेस
त्याविषयी इस्राएलाचा परमेश्वर देव म्हणतो: 27'योशीया,
पश्चात्तापाने तू माझ्यापुढे विनम्र झालास. खेदाने आपले
कपडे फाडलेस. तू रडलास. तू मृदू अंत:करणाचा
असल्यामुळे 28तुझ्या पूर्वजांकडे मी तुला नेईन* तुला
शांत मरण येईल. या प्रदेशावर आणि लोकांवर जी संकटे
कोसळतील ती तुला पाहायला लागणार नाहीत.'" हिल्कीया
आणि राजाचे सेवक या सर्वांनी हा निरोप राजाला येऊन
सांगितला.

29तेव्हा राजा योशीयाने यहूदा आणि यरूशलेममधील
सर्व वडीलधाऱ्यांना भेटीसाठी एकत्र बोलावले. 30राजा
परमेश्वराच्या मंदिरात गेला. यहूदातील सर्व प्रजा,
यरुशलेममधील सर्व थोर तसेच सामान्य माणसे, याजक
आणि लेवी हे सर्व राजासोबत होते. परमेश्वराच्या मंदिरात
सापडलेल्या कराराच्या ग्रंथातील सर्व वचने तेथे राजाने
त्यांना वाचून दाखवली. 31मग राजा उभा राहिला. त्याने

---

**आसापाची पडीक खेडी** येथे अर्थाचा पुरा उलगडा होत नाही.

**राजाचे सेवक** हिब्रू लेखनामध्ये "राजाचे सेवक" हे शब्द नाहीत.

**पूर्वजांकडे मी तुला नेईन** याचा अर्थ "योशीयाला मरण येईल."

परमेश्वराशी करार केला. परमेश्वराला अनुसरायचे, त्याचे आज्ञा, नियम आणि विधी पाळायचे त्याने कबूल केले. हे सर्व त्याने मन:पूर्वक करायचे मान्य केले. नियमशास्त्रातील वचनांप्रमाणे वागायचे कबूल केले. 32मग त्याने यरुशलेम आणि बन्यामिन मधील लोकांना ही या करारपालनात सामील करून घेतले. यरुशलेमचे लोक आपल्या पूर्वजांच्या देवाचा करार पाळू लागले. 33इस्राएलमध्ये वेगवेगळ्या देशांमधल्या विविध मूर्ती होत्या. पण त्या सर्व अनिष्ट मूर्ती योशीयाने फोडून तोडून टाकल्या. इस्राएल लोकांना त्याने परमेश्वर देवाची सेवा करायला लावले. आणि योशीया जिवंत असेपर्यंत लोक आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याचीच उपासना करत होते.

## योशाया वल्हांडणाचा सण साजरा करतो

35 राजा योशीयाने यरुशलेमात परमेश्वराप्रीत्यर्थ वल्हांडणाचा उत्सव केला. पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी वल्हांडणाचा यज्ञपशू कापला गेला. 2परमेश्वराच्या मंदिराची कामे पार पाडण्यासाठी योशीयाने याजक नेमले आणि त्यांच्या कार्यात त्यांना प्रोत्साहन दिले. 3इस्राएल लोकांना शिक्षण देणाऱ्या आणि परमेश्वराच्या सेवेसाठी शुचिर्भूत होणाऱ्या लेव्यांना योशीया म्हणाला, "दावीद पुत्र शलमोनाने बांधलेल्या या मंदिरात पवित्र करारकोश ठेवा. दावीद इस्राएलचा राजा होता. यापुढे पवित्र करारकोश वारंवार खांद्यावरून वाहू नका. परमेश्वर देवाची सेवा करा. देवाची प्रजा म्हणजे इस्राएलचे लोक त्यांची सेवा करा. 4आपापल्या घराण्यांप्रमाणे तुमचा जो क्रम ठरला आहे त्यानुसार मंदिरातील सेवेसाठी सिध्द व्हा. राजा दावीद आणि त्याचा मुलगा राजा शलमोन यांनी आखून दिल्याप्रमाणे आपापली कर्तव्ये पार पाडा. 5आपापल्या घराण्यांच्या वर्गवारीप्रमाणे, भाऊबंदांबरोबर पवित्र स्थानी उभे राहा. म्हणजे तुम्हाला आपापसात सहकार्य करता येईल. 6वल्हांडणाचे यज्ञपशू कापा, परमेश्वरासाठी स्वत:चे पवित्रीकरण करा. इस्राएल बांधवांसाठी यज्ञपशू तयार ठेवा. परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे सर्व काही यथासांग पार पाडा. या आज्ञा परमेश्वराने आपल्याला मोशेमार्फत दिल्या आहेत."

7वल्हांडणासाठी योशीयाने 30,000 शेरडे मेंढरे यज्ञपशू म्हणून इस्राएल लोकांना दिली. या खेरीज 3000 बैल दिले. हे पशुधन त्याच्या खाजगी मालमत्तेतील होते. 8या उत्सवा निमित्त योशीयाच्या सरदारांनीदेखील लोकांना, लेवींना आणि याजकांना पशूंचे आणि वस्तूंचे मुक्त वाटप केले. मुख्य याजक हिल्कीया, जखऱ्या आणि यहीएल हे मंदिराचे प्रमुख कारभारी होते. त्यांनी 2,600 शेरडे मेंढरे आणि 300 बैल एवढे पशू वल्हांडणाचे बळी म्हणून याजकांना दिले. 9कोनन्या आणि त्याचे भाऊ शमाया व नथनेल यांनी तसेच हशब्या, ईयेल व योजाबाद यांनी लेवींना 500 कोकरे मेंढरे व 500 बैल वल्हांडणाचे यज्ञपशू म्हणून दिले. कोनन्या इत्यादी मंडळी लेव्यांची प्रमुख होती.

10वल्हांडणाच्या उपासनेची सर्व सिध्दता झाल्यावर याजक आणि लेवी आपापल्या जागी स्थानापन्न झाले. तशी राजाज्ञाच होती. 11वल्हांडणाचे कोकरे मारली गेली. लेवींनी त्या पशूंची कातडी काढून रक्त याजकांना दिले. याजकांनी हे रक्त वेदीवर शिंपडले. 12त्यांनी मग हे पशू परमेश्वराला होमार्पण करण्यासाठी वेगवेगळ्या घराण्याच्या लोकांकडे स्वाधीन केले. हा अर्पणाचा विधी मोशेच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे करायचा होता. 13लेवींनी वल्हांडणाच्या यज्ञपशूंचे मांस विधिवत भाजले. पातेल्यांत, हंड्यांत आणि कढ्यांमध्ये त्यांनी ही पवित्रार्पणे शिजवली आणि तत्परतेने लोकांना ती नेऊन दिली. 14हे काम उरकल्यावर लेवींना स्वत:साठी आणि अहरोनचे वंशज असलेल्या याजकांसाठी मांस मिळाले. कारण हे याजक होमबली आणि चरबी अर्पण करण्यात रात्र पडेपर्यंत गुंतले होते. 15आसाफच्या घराण्यातील लेवी गायक राजा दावीदाने नेमून दिलेल्या आपापल्या जागांवर उभे होते. आसाफ, हेमान आणि राजाचा संदेष्टा यदुथून हे ते होत. प्रत्येक प्रवेशद्वारावरील द्वारपालांना आपल्या जागा सोडायची गरज नव्हती कारण त्यांच्या लेवी बांधवांनी वल्हांडणाच्या सणाची त्यांच्यासाठी करायची सगळी तयारी केली होती.

16तेव्हा राजा योशीयाच्या आज्ञेनुसार परमेश्वराच्या उपासनेची सर्व तयारी त्या दिवशी पूर्ण झाली. वल्हांडणाचा उत्सव झाला आणि परमेश्वराच्या वेदीवर होमबली अर्पण करण्यात आले. 17सर्व उपस्थित इस्राएल लोकांनी वल्हांडणाचा आणि बेखमीर भाकरीचा सण सात दिवस साजरा केला. 18शमुवेल संदेष्ट्याच्या काळापासून हा सण एवढ्या मोठ्या प्रमाणात साजरा झाला नव्हता. इस्राएलच्या कुठल्याच राजाच्या कारकीर्दीत हे झाले नव्हते. राजा योशीया, याजक, लेवी, यहूदा आणि इस्राएलमधून आलेले लोक आणि यरुशलेमची प्रजा यांनी वल्हांडणाचा उत्सव थाटामाटाने केला. 19योशीयाच्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी हा वल्हांडणाचा उत्सव झाला.

## योशीयाचा मृत्यू

20योशीयाने मंदिरासाठी सर्व चांगल्या गोष्टी केल्या. पुढे मिसरचा राजा नखो, फरात नदीजवळच्या कर्कमीश नगराविरुध्द लढण्यासाठी सैन्यासह चालून आला. योशीया त्याला लढाईसाठी सामोरा गेला. 21पण नखोने आपल्या वकीलांमार्फत त्याला कळवले की, "राजा योशीया, मला तुझ्याशी कर्तव्य नाही. मी तुझ्याशी लढायला आलेलो नाही. माझ्या शत्रूंवर चालून आलो आहे. देवानेच मला त्वरा करायला सांगितले. परमेश्वराची मला साथ आहे तेव्हा तू त्रास घेऊ नकोस. तू मला विरोध केलास तर देव तुझा नाश करील." 22पण योशीया मागे हटला नाही. त्याने नखोला तोंड द्यायचे ठरवले. आणि वेष पालटून तो

लढाईत उतरला. देवाच्या आज्ञेविषयी नखोने जे सांगितले
ते योशीयाने ऐकले नाही. तो मगिद्दोच्या खोऱ्यात युध्दासाठी
सज्ज झाला. 23या लढाईत योशीयावर बाणांचा वर्षाव झाला.
तो आपल्या सेवकांना म्हणाला, “मी घायाळ झालो आहे,
मला इथून घेऊन जा.”

24तेव्हा सेवकांनी योशीयाला त्याच्या रथातून उतरवून
त्याने तिथे आणलेल्या दुसऱ्या रथात बसवले आणि
योशीयाला त्यांनी यरुशलेमला नेले. यरुशलेममध्ये
योशीयाला मरण आले. त्याच्या पूर्वजांना पुरले तेथेच
योशीयाला पुरण्यात आले. योशीयाच्या मृत्यूने यहूदा आणि
यरुशलेमच्या लोकांना फार दु:ख झाले. 25यिर्मयाने
योशीयाप्रीत्यर्थ शोकगीते लिहिली आणि गायिली. ती
विलापगीते आजही इस्राएलचे स्त्रीपुरुष गातात. योशीयाची
ही गीते गाण्याचा पायंडाच पडला आहे. विलापगीताच्या
पुस्तकात ही लिहिलेली आहेत.

26–27आपल्या कारकिर्दीत योशीयाने ज्या इतर गोष्टी
केल्या त्या ‘इस्राएल आणि यहूदा राजांचा इतिहास’ या
पुस्तकात अथपासून इतीपर्यंत नोंदवलेल्या आहेत. त्याची
परमेश्वरावरची निष्ठा आणि त्याचे आज्ञापालन याविषयी
त्यात लिहिले आहे.

## यहोआहाज, यहूदाचा राजा

36 यहूदाच्या लोकांनी यरुशलेमचा नवा राजा म्हणून
यहोआहाजाची निवड केली. यहोआहाज हा
योशीयाचा मुलगा. 2तो यहूदाचा राजा झाला तेव्हा तेवीस
वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये तीन महिने राज्य केले.
3त्यानंतर मिसरचा नखो याने यहोआहाजला कैद केले.
नखोने यहूदाच्या लोकांवर 3 3/4 टन चांदी आणि 75
पौंड सोने एवढा दंड बसवला. 4यहोआहाजचा भाऊ
एल्याकीम याला नखोने यहूदा-यरुशलेमचा राजा केले.
यानंतर नखोने त्याचे नामांतर करून यहोयाकीम असे
ठेवले आणि यहोआहाजला मिसरला नेले.

## यहूदाचा राजा यहोयाकीम

5यहोयाकीम पंचविसाव्या वर्षी यहूदाचा राजा झाला.
त्याने यरुशलेममध्ये अकरा वर्षे राज्य केले. यहोयाकीमने
परमेश्वर देवाच्या दृष्टीने वाईट गोष्टी केल्या. त्याने
परमेश्वर देवा विरूध्द पाप केले.

6बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने यहूदावर हल्ला
केला. त्याने यहोयाकीमला कैद केले आणि त्याला पितळी
बेड्या ठोकल्या. तशा अवस्थेत त्याला नबुखद्नेस्सरने
बाबेलला नेले. 7नबुखद्नेस्सरने परमेश्वराच्या मंदिरातील
काही वस्तू हस्तगत करून त्या बाबेलला नेल्या आणि
स्वत:च्या घरात ठेवल्या. 8यहोयाकीमच्या इतर गोष्टी,
त्याची दुष्कृत्ये आणि त्याचे अपराध हे सर्व ‘इस्राएल व
यहूदी राजांचा इतिहास’ या पुस्तकात लिहिलेले आहेत.
यहोयाकीमच्या जागी त्याचा मुलगा यहोयाखीन राज्य करु
लागला.

## यहूदाचा राजा यहोयाखीन

9यहोयाखीन यहूदाचा राजा झाला तेव्हा अठरा वर्षांचा
होता. यरुशलेममध्ये त्याची कारकीर्द तीन महिने आणि
दहा दिवस होती. परमेश्वराला अमान्य असलेले वर्तन
करून त्याने पाप केले. 10राजा नबुखद्नेस्सरने वर्षारंभी
काही सेवक पाठवून यहोयाखीनला परमेश्वराच्या
मंदिरातील बहुमोल खजिन्यासह बाबेलला आणवले.
यहोयाखीनच्या नातलगांपैकी सिद्कीया याला
नबुखद्नेस्सरने यहूदा व यरुशलेमचा राजा केले.

## यहूदाचा राजा सिद्कीया

11सिद्कीया यहूदाचा राजा झाला तेव्हा एकवीस वर्षांचा
होता. त्याने यरुशलेममध्ये अकरा वर्षे राज्य केले.
12परमेश्वराच्या दृष्टीने निंद्य असे त्याचे वर्तन असे.
परमेश्वराचे आदेश संदेष्टा यिर्मया याच्याकडून येत असत.
त्याच्यापुढेही सिद्कीया विनम्र झाला नाही आणि यिर्मयाचे
त्याने ऐकले नाही.

## यरुशलेमचा विनाश

13सिद्कीयाने नबुखद्नेस्सर विरुध्द उठाव केला.
नबुखद्नेस्सरने पूर्वी सिद्कीया कडून स्वत:शी
एकनिष्ठतेची शपथ वाहवली होती. सिद्कीयाने तेव्हा
देवाची शपथ घेऊन तसे वचन दिले होते. पण तरीही
सिद्कीयाने आडमुठेपणा केला आणि आपला आयुष्यक्रम
बदलून इस्राएलच्या परमेश्वर देवाचे आज्ञापालन करायचे
नाकारले. 14शिवाय याजकांचे प्रमुख, आणि यहूदातील
वडीलधारी मंडळी यांचे दुराचरण वाढत चालले आणि
त्यांनी अधिकाधिक पातके केली. ते परमेश्वराच्या बाबतीत
अप्रामाणिक झाले. इतर देशांची अमंगळ कृत्यांची उदाहरणे
त्यांनी समोर ठेवली. या प्रमुखांनी यरुशलेममधल्या
परमेश्वराने पवित्र केलेल्या मंदिराची धूळदाण केली.
15त्यांच्या पूर्वजांच्या परमेश्वर देवाने लोकांना सावध
करण्यासाठी पुन्हापुन्हा संदेष्टे पाठवले. आपल्या प्रजेविषयी
आणि मंदिराविषयी त्याच्या मनात करुणा होती म्हणून
परमेश्वर असे वागला. त्यांचा अथवा मंदिराचा नाश होऊ
नये असे परमेश्वराला वाटत होते. 16पण या परमेश्वराच्या
प्रजेने मात्र संदेष्ट्यांची टर उडवली. त्यांनी देवाच्या
संदेष्ट्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. देवाच्या संदेशांची
हेटाळणी केली. अखेर देवाचा क्रोध अनावर झाला.
आता त्याचा संताप थोपवता येणे अशक्य झाले. 17तेव्हा
बाबेलच्या राजाला देवाने यहूदा व यरुशलेमवर स्वारी
करायला लावले. बाबेलच्या राजाने मंदिरात असलेल्या
तरूणांनाही ठार केले. यहूदा व यरुशलेममधील लोकांवर
त्याने दयामाया दाखवली नाही. लोकांना जिवे मारताना

तरूण–वृध्द, स्त्री–पुरुष, रोगी–निरोगी असा भेदाभेद
बाळगला नाही. देवानेच नबुखद्नेस्सरला यहूदा व
यरुशलेमच्या लोकांना शासन करायची मुभा दिली होती.
18देवाच्या मंदिरातील सर्व चीजवस्तू त्याने बाबेलला नेली.
इतकेच नव्हे तर राजाच्या व सरदारांच्या किंमती वस्तूही
नेल्या. 19नबुखद्नेस्सरने व त्याच्या सैन्याने मंदिराला आग
लावली, यरुशलेमची तटबंदी उद्ध्वस्त केली, राजा आणि
सरदार यांच्या मालकीची घरे जाळली. यरुशलेममधील
प्रत्येक मौल्यवान वस्तू लुटून नेली किंवा नष्ट केली.
20अजूनही हयात असलेल्या लोकांना नबुखदनेस्सरने
बाबेलला नेऊन गुलाम केले. पुढे पारसाचे राज्य येऊन
त्यांनी बाबेलचा पराभव करेपर्यंत हे गुलाम तेथेच राहिले.
21अशाप्रकारे, यिर्मयाकडून इस्राएल बद्दल परमेश्वराने
जे वदवले ते प्रत्यक्षात आले. परमेश्वर यिर्मयाद्वारे म्हणाला
होता: “हे ठिकाण सत्तर वर्षे निर्मनुष्य आणि उजाड राहील.
लोकांनी न पाळलेल्या शब्बाथच्या भरपाईसाठी असे
होईल.”

22कोरेश पारसाचा राजा असताना पहिल्याच वर्षी
परमेश्वराने त्याला एक फर्मान काढायला प्रेरणा दिली.
यिर्मयाच्या तोंडून वदवलेली भविष्यवाणी प्रत्यक्षात
येण्यासाठी परमेश्वराने त्याला ही स्फूर्ती दिली. कोरेशने
आपल्या दूतांकरवी राज्यभर असा संदेश पाठवला की,

23पारसचा राजा कोरेश म्हणतो: स्वर्गातील परमेश्वर
देव याने मला या पृथ्वीचा सम्राट केले आहे. त्याच्यासाठी
यरुशलेममध्ये मंदिर बांधायची जबाबदारीही माझ्यावर
सोपवली आहे. आता तुमच्यापैकी देवाला मानणारे सर्वजण
निर्धास्तपणे यरुशलेमला जाऊ शकता. परमेश्वर देव
तुमच्या बरोबर असो.

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**

- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from:
http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from:
http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html